
# तिला सावरताना . . .

ऋषिकेश मठपती



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# तिला सावरताना

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

एक अनवट प्रेमकथा

# तिला सावरताना

## लेखक : ऋषिकेश मठपती

# तिला सावरताना

लेखक - ऋषिकेश मठपती
फोन नंबर - 7972076796
ईमेल - mathapati278@gmail.com
इनस्टाग्राम - @rushi.278
पत्ता - १७/२ कल्याण नगर भाग -१, जुळे सोलापूर, सोलापूर (413003)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

whatsapp: 9987737237

प्रकाशन : ३१ डिसेंबर २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# मनोगत -ऋषिकेश मठपती



ई साहित्यच्या वाचकांना माझा नमस्कार. मी ऋषिकेश मठपती. ई - साहित्य प्रतिष्ठान' वर माझे हे पहिलं पुस्तक.

शाळेमध्ये शिकत असताना मला माझ्या घरात सुधा मूर्ती यांचं ' बकुळा ' हे पुस्तक हाती पडलं. हे पुस्तक वाचण्यासाठी मला केवळ दोन दिवस लागले. तेंव्हापासून मला वाचण्याची आवड निर्माण झाली. शाळेमध्ये वहीच्या मागच्या पानावर छोटी कथा लिहिण्यास सुरुवात केली. वर्गातले मित्रमैत्रिणी मनोरंजासाठी वाचत असे. त्यानंतर शाळेतील परीक्षा, अभ्यासामुळे लिहिण्यातून जरा लांबलो होतो. सांगलीमध्ये शिक्षण घेत असताना पुन्हा एकदा लिहिण्यास सुरुवात केलो. त्यापासून ते आतापर्यंत लिहिण्याचा प्रवास माझा चालू आहे.

आजकालच्या युवा पिढीला नशा करणे म्हणजे एक प्रकारचं फॅशन म्हणून येते. याच फॅशनमुळे कित्येक जण स्वतःच्या आयुष्याकडे दुर्लक्षित करतात. दारू, ड्रग्स वैगरे घेऊन ते थोड्यावेळासाठी मजेत राहतात खरे पण त्याचा परिणाम खूप उशीर जाणवतो. अश्याच एका मुलीची कथा या कादंबरीत लिहिलेली आहे. नशेमुळे ते

शारिरीक आरोग्य तर गमावतातच मानसिक आरोग्यही गमावतात. काहीजण दुसऱ्याच्या बळजबरीने नशेच्या दुनियेत शिरतात. याच दुनियेतून त्यांना बाहेर काढण्यासाठी कोणीतरी त्यांच्यावर प्रेम करणारा किंवा करणारी हवी असते. नशेत धुंद असलेल्या त्या लोकांना सावरावे लागते. अशीच एका मुलीला सवरण्याची कथा या कादंबरीत दिलेली आहे.

या पुस्तकासाठी खूप लोकांचा आधार मला मिळाला. सर्वात आधी माझ्यासारख्या नवीन लेखकांना संधी देण्यासाठी ' ई – साहित्य प्रतिष्ठान ' यांच मनःपूर्वक धन्यवाद. त्यानंतर मला लेखनासाठी वेळोवेळी स्फूर्ति व मार्गदर्शन देण्यासाठी श्री सचिन दिक्षित सर यांचेसुद्धा मनःपूर्वक धन्यवाद. माझ्या पुस्तकासाठी मुखपृष्ठ तयार करण्यासाठी कुमारी श्रुतिका कुदरी (B. Sc Chemistry, B. Ed) यांनासुद्धा मनःपूर्वक आभार..

ऋषिकेश मठपती (M. Sc Mathematics)

फोन नंबर - 7972076796


ईमेल - mathapati278@gmail. com

## अर्पणपत्रिका

हे पुस्तक माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांना, मला लिहिण्यासाठी स्फूर्ति देणाऱ्यांना व माझ्या सर्व शुभचिंतकांना अर्पण..

**कथाभाग सारांश**

स्वतःच्या कामावर प्रामाणिक प्रेम असणारा अर्णव एक सुशिक्षित मुलगा... याच्या जीवनात एक वेगळेच वळण येते, जेंव्हा तो मॉडर्न, एकटी राहणारी, स्टायलिश आणि स्वतःच्याच धुंदीत असणाऱ्या पूजाला भेटतो. नशेच्या धुंदीत असणारी पूजाला सावरण्यासाठी अर्णवच्या एकतर्फी प्रेमाची गरज भासते. त्याची मदत रचना आणि रवी हे दोघे करतात. कथेत एक वेगळेच ट्विस्ट येते, जेंव्हा पूजाचे बाबा तिच्या आयुष्यात पुन्हा येतात. अर्णवला त्याचं प्रेम भेटेल का? सोपं आहे का एवढं?


Love is patient.
Love is kind.
It does not envy
or boast.
It is not proud,
rude, or self-seeking.
It is not easily angry
and keeps no record
of past mistakes.
It does not delight
in evil.
It rejoices in the tur
truth.

# तिला सावरताना

ही कादंबरी काल्पनिक असून या कादंबरीतील स्थळे, व्यक्ती व घटना काल्पनिक आहेत. त्यात कोणाच्याही भावना दुखाविणे हा हेतू नाही. कोणाही स्थळ, व्यक्ती वा घटनेशी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध नाही. तसा तो आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

चिमणीच्या किलबिलाटामुळे सकाळच्या त्या वातावरणात प्रसन्नता पसरत होती. सोमवारची सकाळ होती. अलार्म कित्येकदा वाजून गेला याचा हिशोबच लागत नव्हता. सकाळचे ९ वाजून गेले होते. अर्णवचे डोळे गाढ झोपेतून जागे झाले. घड्याळ बघताच अर्णव असा जागा झाला, जसा की युद्ध सुरू होणार आहे आणि शेवटचा सैनिक तोच बाकी आहे. घड्याळ बघून तो गडबडीत उठला. आज त्याला लवकर पोहचायच होत म्हणून तो बाथरूममध्ये गेला आणि गाणे गात शॉवर घेऊ लागला. त्याची ती सवयच होती. काही वेळातच तो बाथरूममधून बाहेर आला आणि तयार होऊ लागला. रात्री उशिरा झोपी गेल्याबद्दल स्वतःला शिव्या घालत तो बाईक काढला आणि ऑफिसला अगदी वेगाने जाऊ लागला. कितीही वेगाने गाडी चालवला तरी त्याला शेवटी अर्धा तास उशीर झालाच. कधीही उशिरा न पोहचलेला तो आज मात्र उशिरा पोहचला होता.

रवी - " आज सूर्य कुठून उगवला ग रचना?"

रचना चिडवत म्हणाली - " उत्तरेकडून वाटतं... "

त्याची चेष्टा उडवत दोघेही हसले.

अर्णव - " काय करायचं शेवटी चुकी माणसांकडूनच होत असते. तुमच्याकडून थोडीच होणार आहे.. "

आता हसायची वेळ अर्णवचा होती. तो मात्र हि संधी सोडून देणाऱ्यांपैकी नव्हता. तो मोठ्यांनी हसू लागला. दोघे त्याला अस बघत होते जसे की त्याला तळून आताच्या आता खाणार आहेत.

रचना - " पुरेपुरे आता कामाला लागा. कामचोर सगळे. "

सगळे कामात मग्न झाले. अर्णवला तस त्याच काम म्हणजे त्याची एक प्रियसी असल्यासारखीच होती. एकदा का तो मग्न झाला तर थेट जेवण्याच्या वेळेलाच उठणारा होत. तेवढ्यात जसिका जी आदरातिथ्य म्हणून काम करत होती. तिचा फोन त्याच्या टेबलावर आला.

जसिका -" बॉस तुला बोलवत आहेत अर्णव "

अर्णव - "का?"

जसिका - " माहिती नाही डिअर"

जसिक एक ऑफिस सांभाळणारी स्त्री होती. खूप सुंदर आणि ऑफिसमधल्या सगळ्यांची खूप काळजी घेणारी. पण ती विवाहित स्त्री होती. बॉसच्या केबिनमध्ये जात अर्णव म्हणाला.

अर्णव - " मे आय कम इन सर? "

बॉस - " येस कम इन अर्णव. बस बस "

तो खुर्चीवर बसताच बॉस म्हणाले.

बॉस - " अर्णव... तू खूप मेहनती आहेस आणि आपल्याला एक नवीन प्रोजेक्ट मिळाला आहे. हा प्रोजेक्ट आता पर्यंतचा सर्वात मोठा प्रोजेक्ट आहे. त्यामुळं मी तुला हे प्रोजेक्ट हेड करायची संधी देत आहे. "

हे ऐकताच त्याच्या तोंडावर खुशीची झलक दिसत होती. तो खूप उत्सुक वाटतं होता.

अर्णव -" thank you sir "

बॉस - " तू आणि तुझा ग्रूप मिळून लवकरात लवकर या प्रोजेक्ट्चा रिपोर्ट तयार करा "

अर्णव - " हो सर. "

बॉस - " आणि हा अजून एक.. एक नवीन मुलगी ऑफिसला जॉईन होणार आहे. ती खूप स्मार्ट अँड मेहनती आहे. तिला पण तुझ्या ग्रूपमध्ये ऍड कर "

अर्णव - " ओके सर. अँड थंक यू सर "

तो खुशीतच बाहेर आला. जेवढं मोठं प्रोजेक्ट, तेवढं मोठं नाव होणार अस त्याला माहिती होत. त्याला बघताच जसिका म्हणाली

जसिका - " खूप खूष आहे डिअर.. काय झाल?"

अर्णव - " नवीन मोठा प्रोजेक्ट करायचं आहे आणि मी लीड करणार आहे. "

जसिका - " बेस्ट ऑफ लक डिअर"

जसिका हस्तान्दोलन करत म्हणाली. तिला धन्यवाद म्हणत तो कामाला लागला. तो त्याच्या टेबलावर जाऊन काम करू लागला. त्याला खुशीत बघून रचना त्याच्या टेबलाजवळ येत म्हणाली

रचना - " क्या हुआ जनाब?. खूप खुश दिसत आहात आपण”

अर्णव - " नवीन प्रोजेक्ट मिळाला आहे. मी लीड करणार आहे आणि आपल्याला ते पूर्ण करावं लागणार आहे”

रचना - " ओहो.. क्या बात है?... अरे मग मीटिंग घे.”

अर्णव - " अजून नाही. आज एक नवीन मुलगी ऑफिस जॉईन करणार आहे आणि तिला आपल्याला आपल्या ग्रूपमध्ये घ्याव लागणार आहे. ती आल्यावरच मीटिंग घेऊ आपण.”

नवीन मुलगी येणार असं ऐकताच रवी अर्णवच्या टेबलाजवळ येत म्हणाला.

रवी - " कोण येणार आहे. कशी आहे ती?"

रचना - " आला बघ राजेश खन्ना "

रचना म्हणाली. मग ते दोघे टाळी देत हसू लागले.

अर्णव - " आणि ऋचा कुठं आहे अजून आली नाही? "

" आज तिला बर वाटत नाहीये. ती फोनवर सांगत होती " रचना म्हणाली

ऋचा एक शांत, सरळ मुलगी. ती सुद्धा मिस नाही तर मिसेस होती म्हणजे तीच लग्न झालं होत. आपण बरं आणि आपलं काम बरं अस तीचा स्वभाव होता.

अर्णव आणि रचना नवीन प्रोजेक्ट संबंधी प्राथमिक अंदाज घेत होते. रवी मात्र ऑफिसमध्ये येणारी नवीन मुलगी कशी असणार याचाच विचार करत खुर्ची हलवत बसला होता.

रवी - " रचना.. एक विचारू?"

रचना -" प्रोजेक्ट संबंधी असेल तर विचार.. त्या नवीन येणारी मुलगी कशी आहे असं विचारू नको "

रचना त्याला ओळखून होती, म्हणून ती जाणून होती कि तो काय विचारणार आहे.

रवी - " छी... अर्णव तुला तर माहिती असेल ना? "

अर्णव - " नाही रे... मला काम करू दे. "

तेवढ्यात ऑफिसचा दरवाजा उघडल्याचा आवाज आला आणि तिचे आगमन झाले. गोरीपान, डोळ्यात काजळ, मॉडर्न कपडे घातलेली, जीन्स टाईप शॉर्टवर आणि कानात हेडफोन्स घातलेली, एका हातात सिगरेट, एका हातात पर्स, सिगरेटचा धूर सोडत जणु काही ट्रेन असल्यासारखीच, मोठी हिल्स घालून कॅट वॉक करत, असं वाटतं होतं कि जणू अप्सरा नव्या विश्वात आली असावी. ती एका अभिनेत्रीपेक्षा काही कमी दिसत नव्हती.

जसिकाजवळ येत, एक झुरका घेऊन तीने धूर सोडला.

जसिका -" तुम्ही सिगरेट इथे पियू शकत नाही डिअर. आरोग्याला हानिकारक आहे ".

ती धूर सोडत म्हणाली- " माहिती आहे. हे माझं आरोग्य आहे आणि हे माझं आयुष्य आहे. "

जसिका - " ओके... तुझे नाव काय डिअर?"

जसिका अजूनसुद्धा शांतपणे बोलत होती.

ती - " पूजा शर्मा... मी नवीन आहे इथे. आज माझा पहिला दिवस आहे. "

जसिका - " ओह... बॉस तुझी वाट पाहत आहेत डिअर. तू जाऊन भेटू शकतेस. "

ती आत गेली. तिला आता जाताना बघताच रवी जसिकाजवळ आला.

रवी - " जसिका... ती आहे का नवीन मुलगी?... नाव काय तीच?"

जसिका - " हो... पूजा शर्मा.. का?"

रवी - " काहीही नाही गं, सहजच"

जसिका - " पण ती खूपच मॉडर्न दिसतेय. सिगरेट ओढत होती आणि मॉडर्न ड्रेस... आय होप ती चांगली असावी. "

रवी - " आजकाल असेच असतात गं, मॉडर्न मुली. काही पण म्हण सुंदर तर आहे ती "

जसिका -" हा.... ते तर आहे. काजळ खूप शोभत तिला"

रवी - " चल बाय. लंचला भेटू"

जसिका -" बाय"

काहीवेळाने पूजा ऑफिसमधून बाहेर आली आणि अर्णवच्या टेबलाजवळ आली. तो त्याच्या प्रियसीसोबत मग्न होता म्हणजे कामात मग्न होता.

पूजा - " तू अर्णव का?"

अर्णव - " येस"

अर्णव तिच्याकडे न बघताच म्हणाला.

पूजा -" ओके... मी पूजा. "

एवढं बोलून ती अजुन एक सिगरेट तोंडात ठेवून पर्समध्ये काहीतरी शोधू लागली. रागात येऊन ती अर्णवला म्हणाली.

पूजा -" तुझ्याकडे लायटर आहे का?"

अर्णव -" मी सिगरेट नाही पित "

तो कामात इतका मग्न होता की तिच्याकडे न बघताच म्हणाला. ती त्याच्या टेबलावरून उठली आणि बाहेर गेली तेव्हा त्याला जाणवलं की ' कोण तर मला लायटार मागितला आणि ते सुद्धा एक मुलगी. कोण आहे ही?'

ती बाहेर जाऊन आली आणि ऑफिसमध्ये सिगरेट पियु लागली. रवी तिच्या जवळ आला.

रवी - " हाय.. आय एम रवी.. "

पूजा त्याला असं पाहिली जसं कि तो तिला भिक मागायला आला असावा.

पूजा - " मग मी काय करू?"

रवीचा तर पार चेहराच पडला. नंतर परत नव्या उत्सुकतेने म्हणाला.

रवी - " मी पण याच ऑफिसला आहे. मी तुझ्या ग्रूपमध्ये आहे "

पूजा - " ओह.... मी पूजा "

रवी हसत म्हणाला.

रवी - " मग आम्ही तुला पू म्हणू शकतो "

पूजा - " खूपच फालतू जोक होता. "

असं म्हणतच तो हसू लागला. पण ती रागात त्याला पाहिली.

रवी - " सॉरी.... "

पूजा - " गो टू हॅल.. "

तिथेच असलेली जसिका जोरात हसू लागली. पूजा तर केव्हाची निघून गेली होती. रवी जसिका जवळ येत म्हणाला " काय पोरगी आहे ही?... आग आहे नुसता... हा एक मात्र आहे, जसिका, ती सुंदर तर आहे खूप... काजळ तर... हाय मै तो मर ही जाऊंगा, जसिका... कुछ करो?"

जसिका - " आग से प्यार करोगे तो जल जाओगे "

पूजा सिगरेटचा धूर सोडत अर्णवच्या टेबलाजवळ आली.

पूजा - " मीटिंग घ्यायची का?"

----------------------------------------

दुपार होत आलेली होती. पूजा, रचना, रवी आणि अर्णव कॉन्फरन्स रूममध्ये मीटिंगसाठी जमले. ऋचा आजारी असल्याने ती आज आलेली नव्हती. अर्णव प्रोजेक्ट हेड असल्याकारणाने त्यालाच मीटिंग हेड करावी लागणार होती. मीटिंगची सुरुवात अर्थातच अर्णव करू लागला.

अर्णव - " वेलकम टू ऑल फॉर थिस मीटिंग. सर्वात प्रथम आपल्याला मिळालेला प्रोजेक्ट आपल्या कंपनीला खूप पुढे घेऊन जाऊ शकतो. तर हा प्रोजेक्ट आपल्याला लवकरात लवकर आणि उत्तमरित्या पार पाडायचा आहे. चुकीला माफी नाही. "

रवी - " काय फिल्मी डायलॉग मारतो रे?... मुद्यावर ये ना?"

रचना -" गप रे रव्या... अर्णव पुढे बोल. "

अर्णव - " ओके... तर आपल्याला लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी आपल्याला नवीन सॉफ्टवेअरवर काम करायला पाहिजे. तर प्लॅन असा आहे की

रचना आणि पूजा तुम्ही डाटा गोळा करा आणि त्यानंतर मी आणि रवी त्या प्रोजेक्ट वर काम करू. इस इट ओके?"

रवी - " पण ऋचाचं काय?"

अर्णव - " ऋचा प्रोजेक्टची रिपोर्ट तयार करून देईल? "

रचना -" हा ओके. "

पूजा - " एक मिनिट.. रचना आणि मी फक्त डाटा का गोळा करावे?. मी पण प्रोजेक्ट करू शकते ना?. आणि तुम्हीही डाटा गोळा सगळे करू शकता. मग आम्ही लेडीजच का गोळा करायचा?"

पूजाला राग आलेला पाहून अर्णव तिला शांत करू पाहत होता.

अर्णव -" अगं तसं नाही... "

ती ऐकूनच घेत नव्हती. ती पुढे बोलतच होती.

पूजा -" का तुम्ही आम्हा महिलांना कमी लेखत आहात?... का सगळे क्रेडिट फक्त तुम्हीच घेणार आहात काय?... असचं असतं समाजात कोणी एक मुलगी वर

येत असेल तर काही मुलांना सहनच होत नाही.... समानता कुठे अस्तित्वातच नाही.. आणि तुम्हा मुलांना तर फक्त मुलगी म्हणजे चुली भांडी करणारी, सगळे सहन करून गप्प बसणारी आणि फक्त मुलबाळ सांभाळणारी असं वाटतं असणार ना?"

अर्णव हातवारे करून तिला थांबवण्याचा प्रयत्न करू लागला होता. पण ती मात्र बुलेटट्रेनसारखी बोलत होती.

पूजा -" आता बघा, मला गप्प बसू पाहत आहेत. रात्री कोणी एका ठिकाणी जावं म्हणल की कोणी एकटा येतो आणि रेपचा प्रयत्न करतो. या जगात मुलींना जगायचं मुश्किल झालेलं आहे. तुम्ही मूल मात्र लग्नात हुंडा मागता आणि त्यांच्या आईवडिलांचा जगणं मुश्किल करून ठेवता. जर एका मुलीवर बलात्कार झाला असेल तर कारण सांगता की ' मुली कमी कपडे घालतात, मग बलात्कार तर होणारच ना.. चूक तर मुलीचीच आहे.. '... आता इथं ऑफिस मध्ये पण तसचं होत आहे. समान संधी एका मुलीला लाभतच नाही... असा किती वेळ चालणार?"

कॉन्फरन्स रूममध्ये आता वातावरण गरम झालं होत. रवी आणि रचना फक्त पूजाकडे पाहत होते. तीच बोलणं ऐकुन अर्णवचा पारा चढला.

अर्णव -" पुरे झालं आता.... मी फक्त एवढ्यासाठी सांगत होतो की हे सॉफ्टवेअर फक्त मला आणि रविलाच ऑपरेट करता येतं.... आणि तुम्हाला शिकवायला कमीत कमी ३ महिने लागतील आणि तेवढा आपल्याकडं वेळ नाहीये.

आणि कुठला मुद्दा कुठे घेऊन गेलीस आणि काय??... हो समान संधीचे वाक्य तर तुम्ही म्हणुच नका. एका बसमध्ये महिलांच्या सीट वर तुम्ही बसता कारण तो तुमचा हक्क आहे आणि पुरुषांच्या सीटवर पण बसता??. का? इथे आमचा हक्क नाही का?.. इथं कुठ जात तुमची समानता???... मुलींना पिक्चर बघायचं असतं तर तिकीट काढताना मात्र मुलांना पाठवता... इथं कुठ जाती तुमची समानता? मान्य आहे की हुंडा घेणारे मुले एकदम निच असतात पण हे कितपत योग्य आहे की तुम्ही मुली मुलाचा पगार बघून लग्न करता. ते हुंडा होत नाही काय? आता दिल्लीच उदाहरण बघा ना. आता मुलींना किंवा महिलांना फुकट मेट्रोमध्ये प्रवास करायला मिळेल, म्हणजे एक गरीब मजूर पैसे देऊन जायचं आणि एक श्रीमंत मुलगी फुकट फिरणार.. इथं कुठ गेली तुमची समानता? आणि कारण काय म्हणाव की मुलींच्या सेक्युरिटी साठी हे नियम आहेत... मान्य आहे की बलात्कार करणारे सैतान असतात. मी तर म्हणतो त्यांना रस्त्यावर मारा. पण कित्येक मुली बलात्काराच्या नावाखाली मुलांना ब्लॅकमेल करतात, माहिती का? आणि आम्हाला शिकवतात समानता.. शी. "

आता अर्णवला खूप राग आलेला होता. रागात तो खूप काही बोलून गेला होता. इतक्यात जसिका आली.

जसिका - " जेवणाची वेळ झाली. "

सगळ्यांना शांत पाहून ती पुढे म्हणाली

जसिका -" काय झालं?"

अर्णव रागाच्या भरात फाईल जोरात आदळून बाहेर गेला. सगळे अजून कॉन्फरन्स रूममध्येच होते. पूजा तर अर्णवच बोलणं ऐकून विचारात पडली होती. रचना आणि रवी तर चिडीचूप झाले होते. अर्णव तणतणीत ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये गेला. जिथे ते सगळे रोज घरून आणलेला डब्बा खात असत. अर्णव रागाने अजुन बाहेर पडला नव्हता आणि स्वतःशीच बडबड करत होता. " काय समजते ही स्वतःला... "

इतक्यात मागून आवाज आला " पूजा शर्मा समजते.... "

ती त्याच्यापुढे एका पेयाची बाटली देत म्हणाली.

अर्णव - " मला नकोय.. ”

रागात अर्णव तिला म्हणाला.

पूजा - " बघ... नाहीतर मी कुणाला सहजा कोक ऑफर करत नाही... "

नाईलाजाने त्याने पेयाची बाटली घेतली

अर्णव - " धन्यवाद... "

पूजा - " ओह... मराठीत आभार मानत आहात. "

अर्णव - " हो... "

तो अजुनही रागातच बोलत होता. थोड्यावेळाने त्या दोघात एक वेगळीच शांतता पसरली.

पूजा -" सॉरी... मी जास्तच बोलून गेले. ”

अर्णव -" ओह... तुम्हाला सॉरी पण बोलता येत तर?"

पूजा -" हो येत तर.. मी जरा जास्तच बोलत असते ना?"

अर्णव -" ह्म... आणि मी पण सॉरी... एवढ बोलायचं नव्हतं मला.... '

पूजा -" सो.... आय एम पूजा... (ती हाथ पुढं करत म्हणाली).... फ्रेंड्स????"

अर्णव - " माहिती मला.... (तो हस्तांदोलन करत म्हणालो).... अँड आय एम अर्णव. "

मग त्यांच्यात काही क्षणासाठी नजराला नजर भिडली गेली. मग काही क्षणासाठी ते दोघं जग विसरून गेले होते. तेवढ्यात....

रवी -" अरे... मी पण इथे बसू शकतो का? "

ते दोघे दचकलेच आणि त्या दोघांचे हात अजून तसेच हस्तआंदोलन करत होते. ते पाहताच अर्णव लगेच हात काढून घेतला. तेवढ्यात जसिका आणि रचना त्यांचे डब्बा घेऊन आले.

जस्मिन -" मैत्री झाली वाटतं दोघात.. "

रवी -" मैत्री नाही अजून खूप काही "

रचना -" गप रे तू...... (रवीला मारत रचना म्हणाली)

रवी - " मस्करी केली गं... कशाला मारलीस?"

अर्णव - " सॉरी गाईज... मीटिंग फुकटात गेली.... "

पूजा -" मी काय सॉरी नाही बोलणार.... म्हणजे सॉरी बोलून फॉर्मलिटी कशाला. आता.. कामाला लागू की?.. "

रचना -" खरंय पू.. "

रवी अचानक हसू लागला.

जसिका -" काय झालं रवी?... "

रवी -" ती हिला पू म्हणाली. "

रचना -" तुझं खूप झालं हं आता.... "

ती आणि रवी आता हाणामारी करत होते. मारपीट म्हणण्यापेक्षा ती त्याला मारायलाच उठली होती. सगळे हसत होते. पण ती (पूजा) मात्र नाही.

अर्णव -" हे... खूप झालं आता चला टिफीन खाऊयात... खूप काम आहे अजून... "

पूजा - " तुम्ही चालू करा.... आय एम ओके... तुझ्याकडं लाईटर आहे का?... (ती अर्णवला विचारत होती.)"

अर्णव -" का तू टिफीन नाही आणत?... आणि एवढं सिगरेट पित जाऊ नकोस. "

पूजा -" नसेल तर नाही म्हणून सांग ना... कशाला भाषण देता रे. तुला भाषण द्यायला खूप आवडत वाटतं? ऑफिसमध्ये पण आणि इथेपण... "

अर्णव -" मित्र म्हणालीस ना... म्हणून म्हणालो मित्र मानत असेल तर ये आणि टिफीन खा बघू... नाही तर अजून मोठा भाषण द्यावं लागेल मला "

जसिका -" हाय डिअर... कम ऑन... लेट्स टेक थीस... अँड नो सिगार. सिगरेट पित जाऊ नकोस. (जसिका तिला डब्बा देऊ लागली.)

अर्णव -" हा... ये बघू"

पूजा -" ओके... "

ते सगळे डब्बा खाऊ लागले. जेवण्याचा वेळ संपला. सगळे कामाला लागले. मात्र पूजा मात्र थोड्यावेळाने आली.

अर्णव -" तू सिगरेट पिऊन आली ना?"

पूजा -" येस. "

अर्णव -" आय नो दॅट.... आम्ही सांगितल्यावर तू थोडीच थांबवणार आहेस हे सगळं.... "

पूजा -" यू नो दॅट ना.... सॉरी... "

परत सगळे कामात व्यस्त झाले. कधी ५:३० वाजले कळालेच नाही.

रवी -" अर्णव... काही काम आहे का?... म्हणजे मी जातो नाहीतर थांबेन तुझ्यासाठी... "

अर्णव -" नाही... तू जा.... आणि हा उद्या लवकर पाहिजेल तू इथे. कुठलाही कारण नको मला.. "

रवी -" हो बॉस. येतो लवकरच.. बाय अर्णव आणि पू "

पूजा -". बाय बाय... "

पूजा रागातच त्याला बाय केली.

रचना -" अर्णव.. मी पण जाते रे.. माझं तर अर्ध काम झालंय. काही काम आल तर फोन कर.... "

अर्णव -" हो बाय... "

रचना -" बाय अर्णव... बाय पूजा... "

पूजा -" बाय... टेक केअर... "

६:१५ वाजत आले होते.

अर्णव -" चला एकदाच संपलं आजच काम... "

तो सगळं टेबल आवरून निघू लागला. खाली येताच मागून आवाज आला " अर्णव... "

मागे वळून बघितलं तर पूजा होती.

अर्णव -" अरे... तू गेली नाही का अजून?"

पूजा -" नाही गेले.... मला वाटल कोणतीतरी मुलगी तुला काही करेल म्हणून थांबले. "

अर्णव -" काहीपण काय?... तू गाडी नाही आणत?"

पूजा -" मला नाही आवडत गाडी चालवायला... "

अर्णव -" का?"

पूजा -" असचं... "

अर्णव -" चल मग सोबत जाऊ या. "

पूजा -" खरंच?"

अर्णव -" हो... "
ते दोघे बाहेर आले. ती पर्समधून परत सिगरेट काढली.

अर्णव -" बस कर ना आता... किती पित असतीस सिगरेट?"

पूजा -" असचं... "

अर्णव -" एक दिवस बिना सिगरेटच राहून दाखव बघू... "

पूजा -" अशक्य... "

अर्णव -" प्रयत्न करायला काय हरकत आहे?"

पूजा -" पण का करायचं?"

अर्णव -" बरं एक काम करू... आपला प्रोजेक्ट जर उत्तम झालं तर तू एक दिवस सिगरेट न पिता राहायचसं... बोल मंजूर?"

पूजा -" आणि नाही उत्तम झालं तर तू मला बिअर पियू घालायचं. "

अर्णव -" तू बिअर पण पितीस?"

तो चकित होऊन विचारला.

पूजा -" हो मग, नाय तर काय?"

अर्णव -" ओके.... ठीक आहे.. "

आम्ही बाहेर आलो. तसा अंधार होत आला होता.

पूजा -" ऐक ना?. "

अर्णव -" बोल... "

पूजा -" आज काम आहे का काय?"

अर्णव -" नाही गं... का?"

पूजा -" आज मला कंपनी पाहिजे होती... "

अर्णव -" कशासाठी?"

पूजा -" खूप दिवस झाले रे... एकटीच बसत असते मी चौपाटीवर... आज तू पण जॉईन हो ना?"

अर्णव -" होईन पण.. मला काहीही होणार नाही ना?"

पूजा -" नाही नाही... "

ती हलकीशी स्मित करत म्हणाली.

चौपाटीवर पोहचताच मन प्रसन्न वाटतं होत. म्हातारे लोक, लहान मुले, प्रेम करणारे जोडपे तिथे फिरत होते. सगळे आपापल्या कामाचे ताण विसरायला इथे येत असत. कोणी भेळच आस्वाद घेत होते, तर कोणी तर समुद्राच्या पाणीमध्ये खेळत होते. ते दोघे मात्र समुद्राकडे तोंड करून बसले होते.

पूजा -" मस्त वाटत ना?"

अर्णव -" हो.. "

ती परत सिगरेट काढून पीयू लागली.

अर्णव -" धूम्रपान हानिकारक आहे... "

तो तिच्या तोंडातून सिगरेट काढून फेकला.

पूजा -" आय नो यार.... "

अर्णव -" तुला एक विचारू?"

पूजा -" ह्म्म.. "

अर्णव -" तुला ही सवय कधी पासून लागली?"

पूजा -" सांगीन रे परत कधी तरी आता मला मस्त एन्जॉय करू देत हे निसर्ग.... "

तेवढ्यात पाऊस आला. सगळे लोक पळू लागले. कुठं आसरा मिळेल तिथे थांबू लागले. तो देखील पळू लागला. तिथे असलेल्या ऊसाची गाडीजवळ येऊन थांबला. पण ती मात्र हलली नव्हती. ती मनोसक्त भिजत होती. तिचे ते ओले केस खूपच छान वाटत होते. ती जरी मॉडर्न,सिगरेट आणि ड्रिंक करणारी असली तरी तिचं मन खूप छान होत. तिचे गुलाबी ओठ आणि त्या डोळयावरचे काजळ तर अर्णवचं लक्ष खेचून घेत होत.

पूजा मात्र त्यालाच बोलवत होती. तो मात्र नकार दर्शवत होता. पण ती पळत आली आणि त्याला पाऊसात घेऊन गेली. ते दोघेही आता भिजू लागले. त्याचं लक्ष तिच्यावरून हटतचं नव्हतं. काहीतरी नक्कीच घडत होत.

पाऊस कधीच थांबून गेला होता, पण पूजाला मात्र अजून भिजावेसे वाटतं होते. अर्णव तर पूर्णच भिजून गेला होता.

पूजा -" यार..... लवकरच थांबला पाऊस... शे... "

अर्णव-" अरे पाऊस आहे तो.. थांबणारच ना. "

पूजा -" अजून थोडा वेळ असायला पाहिजे होता. "

अर्णव -" तुला पाऊस खूप आवडतो वाटतं?? "

पूजा -" हो... लहानपणापासूनच... "

एक तर पाऊस होऊन गेला होता आणि त्याला कुठूनतरी भजीचा वास आला.

अर्णव -" हे.... इथं कुणी तरी भजी तळत आहे वाटतं. "

पूजा -" हो... इथेच एक टपरी आहे... "

अर्णव -" चल की जाऊ?"

पूजा -" आता?"

अर्णव -" मग कधी जायचं?... अगं सगळे पाऊस होत असताना भजीचा आस्वाद घेतात.. मी पण पावसात भिजून भजीचा आस्वाद घेतो. चल ना यार "

पूजा -" ओके... चल मग. "

त्या टपरीवर खूप गर्दी होती. भजी जशी तळून बाहेर येत होती तशी ती लगेच संपून जात होती

.

पूजा - " भैय्या. दोन प्लेट भजी द्या आणि गरम पाहिजे अहं.... आणि सिगरेट आहे का? "

अर्णव -" परत.. "

पूजा -" हो.... पाऊस पडला नी लागली तलब. " ती हसतच बोलून गेली.

अर्णव -" ओके. तुझी चॉइस... "

अर्णवला समजून गेलं होतं की हिला समजून काहीही उपयोग नाही.

पूजा -" सॉरी... मला याची गरज आहे... "

दोघांचे ऑर्डर आली. तसे दोघेही भजीची मजा घेत होते. नंतर चहाचा सुद्धा आस्वाद घेतले. दोघांचे मन भरून गेल्यावर ते दोघे चालत निघाले.

अर्णव -" तू कशी जाणार? "

पूजा - " म्हणजे?"

अर्णव -" म्हणजे चालत का बस नी?"

पूजा -" सहसा मी चालत जात असते. जवळच राहते ना मी, म्हणून. "

अर्णव-" कोण कोण राहतात तुझ्यासोबत?"

पूजा -" एकटीच राहते मी. "

अर्णव -" मग आईबाबा कुठे राहतात?"

पूजा -" आई तर लहानपणीच वारली. बाबा माहिती नाही कुठे आहेत? माझं संपर्क नाही त्यांच्याशी. "

अर्णव -" का?"

पूजा -" काही नाही रे. सोड ना तू हे सगळं. दुसरं काहीतरी बोल ".

पूजा जाणून बुजून विषय टाळत होती.

अर्णवने घड्याळ्यात पहिले.

अर्णव -" अरे बापरे ७:०० वाजले. उशीर होईल. मला बस पकडायची आहे. चल बाय.... "

पूजा -" बाय. "

अर्णवला रूमवर येता येता ८ वाजून गेले होते. जेवणाचा डब्बासुद्धा आलेला होता. पण काहीही खायची त्याची इच्छा नव्हती. त्याचं मनच लागत नव्हतं. जिकडे बघावे तिथे पूजाच दिसत होती. तीचं ते बिंदासपणे भिजणं, तिचे ते मधुर हसणं, तिचे ओले झालेले केस, त्याचा हाथ घेऊन पावसात घेऊन जाणं, तसाच तो बेड वर झोपला, वर पंखा फिरत होता. पण त्याच लक्ष तर वेगळीकडचं होत.

--------------------------------------

कोवळी ऊन रूमच्या खिडकीतून आत येत होती. पाऊस कधीचा थांबला होता. काल पूजाच्या आठवणीत कधी त्याला झोप लागली हे त्यालाही कळल नाही. त्याला अजून एक गोंधळ विचार येत होता की त्याला जो जाणवतोय ते प्रेम आहे का आकर्षण?? त्याची एक सवय होती. कितीही लवकर उठला तर त्याला बेड वरून १ तास तरी खाली उतरायला लागत असे. तो उठून फ्रेश झाला. कमरेला टावेल गुंडाळून बाथरूम मधून बाहेर येत होता. तेवढ्यात त्याचा फोन वाजला. रचनाचा त्याला फोन आला होता.

रचना -" हॅलो. अर्णव ऐक ना. तू येशील ना लवकर? "

अर्णव -" लवकर म्हणजे किती लवकर येऊ? "

रचना - " तू जितकं लवकर येऊ शकतो, तितक्या लवकर ये? "

तेवढ्यात त्याला मोठ्यांनी शिंक आली.

रचना - " काय रे. बरा आहेस ना तू?"

अर्णव-" काही नाही ग. काल झोप झाली नाही.... आणि???"

रचना -" आणि???? "

अर्णव-" काल खूप भिजलो पावसात... "

त्याला अजुन एक शिंक आली.

रचना - " काय??. अरे तुला तर पाऊस आवडत नाही ना. "

अर्णव - " काही नाही गं, काल ती पूजा आहे ना?"

रचना - " तीच काय?"

अर्णव -" ती काल भिजत होती पावसात... "

रचना - " म्हणून तुला सर्दी झाली होय? "

अर्णव - " नाही गं. आम्ही ऑफिस सुटल्यावर फिरत गेलो होतो. तिथे पाऊस आला. मी तर आसरा घेतला. पण ती तर बिंदास पणे भिजत होती आणि मला सुद्धा ती ओढुन पावसात घेऊन गेली. म्हणून मीही खूप भिजलो. "

रचना - " अरे अरे. आमच्या मागे खूप काही चाललयं तर.. "

अर्णव - " अगं तसं नाही गं. पण तिला फिरायच होतं, मला नाही. "

रचना - " आम्ही जेंव्हा बोलतो तेव्हा तर नाही म्हणतोस आणि झोप का नाही झाली तुझी?? "

अर्णव -" तुला खरं सांगू. रात्रभर तिचाच विचार करत होतो गं. तिचे ते ओले केस, तिचे ते वर बघून डोळे बंद करून बिंदास पणे भिजणे. पण मी खूप गोंधळात आहे गं, माझं हे प्रेम आहे का आकर्षण?"

रचना - " मला माहिती नाही, पण तु वेडा मात्र झालास? "

अर्णव -" का गं?"

रचना - " तू आला होतास बाईकवरून पण बाईक विसरून गेलास. "

त्याची चूक लक्षात येताच तो डोक्याला हात लावला.

अर्णव - " आई शपथ. खरंच की गं, एक तर कामात व्यस्त आणि वरून पूजा चालत होती म्हणून मी पण बाईक विषयी विसरूनच गेलो. "

रचना - " म्हणून म्हणाले लवकर ये. बघूच कसा येतोस तू?. "

अर्णव - " ऐक ना. माझ्या घरी येऊन मला पण घेऊन जा ना, प्लीज. "

रचना- " आता आठवण आली होय माझी, जा नाही येणार मी "

रचना त्याला चिढवत होती.

अर्णव - " प्लीज ये ना, प्लीज.. प्लीज... प्लीज. "

अर्णव तिला खूप विनंती करत होता.

रचना - " बरं मग आज मला लंच तुझ्याकडून पाहिजे... "

अर्णव- " बरं चालेल. "

रचना - " आणि हो टॉवेल वर बसू नकोस. तयार हो पटकन "

अर्णवला कळत नव्हतं की तिला कस समजलं की तो टॉवेल मध्ये आहे.

अर्णव- " तुला कसं कळाल की मी टॉवेल मध्ये आहे म्हणून?"

रचना - " दारात उभा असलेला माणसासोबत फोन वर बोलतोस का तू?.. "

तो टॉवेल सावरत मागे वळला. ती हसतच होती

अर्णव - " अगं तू इतक्या लवकर इथं.. कसं?"

रचना - " अरे मी ऑफिसला निघणार होते.. पण वॉचमेनचा फोन आला. मग कळलं कि तू बाईक ऑफिसमध्ये विसरला आहेस. म्हणून मग थेट इथेच आले. "

अर्णव -" बरं झालं तू आलीस. मग माझी तर काय खैरचं नव्हती. मी तयार होतो. तू बस... तुला चहा पाहिजे का?"

रचना - " नको बाबा. अजून विष पीन, पण तुझा चहा नको. "

अर्णव - " खूपच चांगला विनोद होता. "

रचना - " मग हसं आणि विसरून जा. "

काहीवेळाने दोघेही ऑफिसला निघाले. ज्या स्कूटीला तो शिव्या घालत होता, त्याच स्कुटीवरून तो आज ऑफिसला जात होता.

रचना - " तुला एक विचारू? "

अर्णव -" हा. "

ती गाडी चालवत विचारत होती.

रचना -" तू खरचं गोंधळात आहेस?"

अर्णव -" हो गं. "

रचना -" काळजी करू नकोस. वेळ आल्यावर कळेल तुझे तुलाच उत्तर. "

दोघेही ऑफिसला पोहचले. तिथे सगळे कामात होते. बाईकला काहीही झालेलं नव्हतं. ऋचा सुद्धा आली होती.

अर्णव -" हाय ऋचा. कशी आहेस?"

ऋचा -" मस्त.. तू?"

अर्णव -" मी पण.. आज बहुतेक जसिका आली नाही वाटतं?"

ऋचा -" हो. "

मग पूजा आली. सिगरेटचा धूर सोडत, हेडफोन्स वर गाणे ऐकत ती येत होती.

पूजा -" हाय. "

अर्णव -" हाय. "

पूजा - " कालच्या दिवसासाठी थँक्स. कायम आठवणीत राहील कालचा दिवस. "

अर्णव -" वेलकम. "

अर्णव लाजतच उत्तर दिला. रचना त्या दोघांकडे पाहत हसत होती. रवी सुद्धा आला. सगळे कामात व्यस्त झाले. नवीन प्रोजेक्ट पूर्ण करायची होती. वेळ जास्त उरलेला नव्हता. त्यामुळे सगळे कामाला लागले.

कामामध्ये १ महिना कसा गेला कळलेच नाही. त्यात अर्णव आणि पूजा रात्री फोन वर बोलत असत. खूप मेहनतीने प्रोजेक्ट संपुष्टात आला.

सगळे बॉसला प्रोजेक्ट दाखवले. प्रोजेक्टचे ग्राहक आले होते. त्यांच्यासमोर अर्णवने सादर केला. मग बॉस आणि ग्राहकांमध्ये मीटिंग झाली.

जसिका नुकतीच ऑफिसला आली होती. जसिका तेवढ्यात बाहेर आली.

जसिका -" सगळयांना बॉस नी बोलावलंय. "

रवी -" का? "

जसिका -" काळजी करू नका. आत मध्ये जा. "

सगळे खूप टेन्शनमध्ये होते. पण पूजा मात्र बिंदास होती. ती मस्त गाणे ऐकत बसली होती. सगळे आत जाऊ लागले. तेवढ्यात ती सुद्धा आली.

बॉस -" सो. अभिनंदन सगळ्यांचं आपला प्रोजेक्ट क्लाएंटला आवडला आहे आणि आपला प्रोजेक्ट लवकरच चालू होणार आहे. "

सगळे खूप खुश झाले.

बॉस -" तर याच संदर्भात मी पार्टी ठेवली आहे. माझ्या फार्म हाऊसवर सगळे यायचं बर का? पार्टी उद्या आहे. लेट्स पार्टी... "

सगळे एकदमच हो म्हणाले.

रवी -" सर तिथे चांगलं देशी मिळत ना?"

त्या विनोदावर सगळे हसू लागले. सगळे बाहेर आल्यावर खूप खुश होते पण पूजाच्या चेहऱ्यावर ना खुश दिसत होती, ना दुखी होती. एकदम वेगळेच नमुना होती ती.

अर्णव -" पूजा आज तुला मी सोडू?"

पूजा -" खरचं??"

अर्णव -" हो ".

पूजा -" बरं, चल मग.. "

ती मागे बसली. तिचा न कळता लागलेला स्पर्श त्याला आनंद देत होता. तिचे ते कर्ली केस. बहुतेक ती नुकतीच पार्लरला गेली असणार. तिचे केस तसे नव्हते आणि केसाच्या खालच्या बाजूला केलेला लाल रंग तर त्याच मन खेचून घेत होता.

पूजा -" थांबव इथे. "

अर्णव -" का काय झालं?"

पूजा -" माझं घर आलं. "

अर्णव -" तू इथ राहतेस?"

पूजा -" हो. तिसऱ्या मजल्यावर. येणार का?"

अर्णव-" नाही, नको, उशीर होईल. बाय "

पूजा -" ओके बाय. "

दुसऱ्यादिवशी ऑफिसमध्ये अर्णव आला. सगळे आले होते. त्याची नजर फक्त पूजाला शोधत होती. रचना तेवढ्यात मागून आली.

रचना -" तिला शोधत आहात वाटतं?"

अर्णव -" हो. तुला काय करायचंय?"

रचना -" काही नाही. पण तुमच्या माहिती साठी. ती आज आली नाही... "

अर्णव -" का?"

रचना -" माहिती नाही. फोन करून तूच विचार ना?"

त्याने लगेचच खिशातून फोन काढला आणि तिला फोन लावला. ती उचलत नव्हती.

अर्णव - " उचलत नाहीये. "

रचना -" नको काळजी करू... येईल ती आज पार्टीला... "

तो फक्त रात्रीची वाट पाहत होता. त्याचा दिवस आज खूपच वाईट जात होता, कामात मनचं लागत नव्हतं, जेवणसुद्धा केले नव्हते. आता त्याला पुष्टी झालेली होती की तो प्रेमात होता. तो प्रेमात पडला होता. कधी एकदा तिला सांगावं असं त्याला वाटतं होत. वाट पाहत होता आजच्या रात्र ची...

तो खूप नटूनथटून तयार झाला. आज कसल्याही परिस्थितीत तिला तो प्रेमाची कबुली देणार होता. जाताना त्याने एक गुलाब घेतला. फार्महाऊसवर पोहचला. तिथे सगळेजण आले होते. सगळे खूपच मस्त दिसत होते. पण त्याची नजर तर फक्त तिलाच शोधत होती. पण तिथे ती दिसतच नव्हती.

अर्णव -" अरे रवी. पूजा आली का?"

रवी -" नाही रे. "

रचना नुकतीच दारात आली होती. रचना त्याला पाहून हात हलवत होती. ती खूपच सुंदर दिसत होती.

रचना -" अरे वा. खूपच मस्त दिसत आहात आपण आणि गुलाब.. मला का? "

त्याच्या हातून ती गुलाब हिसकावून घेतली.

अर्णव -" तुला नाहीये ते... , पूजाचं कॉल आला होता का?"

तो परत गुलाब घेतला. ती नाराजीने म्हणाली

रचना -" नाही. का?"

अर्णव -" मी ५० वेळा ट्राय केला पण उचलत नाहीये ती. "

रचना -" थांब मी ट्राय करते. "

रचनाने फोन लावला. फक्त रिंगच वाजत राहीली.

रचना -" उचलत नाहीये ती.... "

अर्णव -" अग. आज मी तिला प्रपोज करणार होतो.... "

रचना -" खरंच?? मस्तचं की.. ”

अर्णव -" काय मस्त. ती आलीच नाहीये अजून... "

रचना -" काळजी करू नकोस. येईल ती. "

" तिला काय झालं असेल?... का उचलत नाहीये कॉल ती?... काही झालं तर नसेल ना?... मला कबुली द्याची होती तिला आज... बर असेल ना ती?.. ". असे अनेक प्रश्न त्याच्या मनात येत होत्या. तो वाट पाहत बसला होता.

तेवढ्यात तिचा फोन आला. वेळ न घालवता अर्णव लगेचच घेतला.

अर्णव -" हॅलो. अगं कुठ आहेस पूजा तू?. हॅलो... तुझा आवाज येत नाहीये. हॅलो. "

कदाचित अर्णवला आवाज येत नव्हता.

पूजा -" ह ह ह. हॅलो. मी येऊ नाही शकत रे. "

अर्णव -" अगं कुठ आहेस तू? काही झालं आहे का?"

पूजा -" ह ह अहं. मी नाही येऊ शकत रे. "

तिचा मोबाईल हातातुन खाली पडल्याचा आवाज अर्णवला आला.

अर्णव -" हॅलो. पूजा काय झाल सांग की.. शेट कट झाला कॉल... "

त्याच हृदय धडधडत करत होते, जसा की बुलेट ट्रेन धावत असावी. काही झाल तर नसेल ना तिला??... असे अनेक प्रश्न त्याच्या मनात येत होते. तो विचार करतच होता कि इतक्यात रचना त्याच्यासाठी पेय घेऊन आली.

रचना - " हे... काय झालं? हे घे.. "

अर्णव -" अग पूजाचा कॉल आला होता... "

रचना -" ओहो... मग कुठं जाणार आहे भेटीला?"

अर्णव -" अगं ती येणार नाहीये. तिचा आवाज पण खूप विक येत होता. मला खूप भिती वाटतीय रचना... तिला काही झालं तर नाही ना?"

रचना -" काळजी करू नकोस. काहीही झालं नसेल. आपण तिच्या घरी जायचं का?"

अर्णव -" हो चल आणि रवीला पण घेऊन जाऊ. "

रवी तर आपल्याच रंगात होता. एक मुलीसोबत प्रेमाचे बोलणं बोलत होता. तिचा हात त्याच्या हातात घेऊन एकदम रोमँटिक मूडमध्ये तिला पटवत होता.

रवी -" तुझे डोळे किती सुंदर आहेत? माहिती आहे का?"

ती -" ओह.. खरच. "

ती लाजत म्हणत होती.

रवी -" हो. तुझे केस तर घायळच करून टाकणारे आहेत. तुझे ते हसणे, तुझी अदा, हाये हाये मार ही डालोगे. तुझे हात तर खूपच मऊ आहेत ग असं वाटतं कि तुझा हात नेहमी माझ्याच हातात असावा. तुझे डोळे तर मोरनी सारखेच आहेत. "

ती -" चल झूठा.. "

ती लाजत हसत होती आणि रवीला हलकीशी मारत होती.

रवी -" सची.. तुझे पाय ही खूप सुंदर आहे. "

मागून रचना येत म्हणाली.

रचना -" आणि त्याच पायात असलेलं हिल्स पण खूप छान वाजतात. पहायचं का?"

रवी -" नो नो.. मी फक्त तिच स्तुती करत होतो.. "

रचना -" स्तुती तर माझं पण करत होतास ना.... "

ती -" तू हिला ओळखळतोस? "

रवी -" नाही नाही.. हिला नाही ओळखत मी.. कोण आहे तू?"

रचना -" असा का करतोस रवी. सांग की आपल लग्न ठरलयं म्हणून आणि हे पण सांग ना कि मै तरी बच्चे कि मा बननेवाली हुं.. "

रवी -" काय??. काहीतरीच काय. "

ती तडक्यात उठून म्हणाली.

ती -" तुला गर्लफ्रेंड असून माझ्यावर ट्राय करत होतास.... यू यू..... "

असं म्हणत ती रवीच्या तोंडावर पाणी फेकली आणि उठून गेली. हे बघताच रचना हसू लागली.

रचना -" तुला असचं पाहिजेल. "

रवी -" तू बोलू नकोस माझ्याशी चांगला मूड खराब केलीस. "

रचना -" इथं अर्णव टेन्शन मध्ये आहे आणि तुला मूडचे पडलय. "

रवी -" का. काय झालं?"

रचना -" पूजा अजून आली नाही. तिचा कॉल वर काही तरी गडबड असल्यासारखं वाटतंय. आपल्याला जाव लागेल तीच्याघरी, चल गाडी काढ. "

रवी -" अगं पण तुला तिच घर माहिती का?"

अर्णव -" मला माहिती आहे. "

रवी -" पण तीच काय पडलाय तुम्हाला "

रचना -" अरे असा काय बोलतो.. अर्णव प्रेम करतो तिच्यावर.. तो आज तिला आज सांगणार पण होता. "

रवी -" वाहा रे वाहा. अरे तुझ्यासाठी जीव देणारा मी आणि मला नाही सांगितलस.. एका मुलीच्या प्रेमात मला विसरलास. "

अर्णव -" तसं नाही रे.... "

रचना -" अर्णव तुझी खेचतोय तो... रवी चल पटकन... "

रवी -" ओके, गाडी काढतो, तुम्ही बाहेर भेटा. "

रचना आणि अर्णव दोघे बाहेर आले. रवी लवकरच गाडी घेऊन आला. थोड्यावेळात सगळे तिच्या अपार्टमेंट खाली आले. अर्णव लगेच गाडीबाहेर आला. रवी गाडी पार्क करायला गेला. त्याच्या मागोमाग रचना सुद्धा बाहेर आली आणि दोघे अपार्टमेंट मध्ये गेले. थोड्यावेळाने रवी सुद्धा आला. वॉचमेनने पूजाचा फ्लॅट दाखवला. सगळे तिच्या फ्लॅट बाहेर येऊन उभे झाले. दरवाजा उघडाच होता. तिघे आत गेले. रचना किचन मध्ये गेली. हे दोघ तिच्या बेडरूमकडे आले. बेडरूम उघडली तर सगळीकडुन धूर बाहेर येऊ लागला होता. हा धूर आगीचा नव्हता तर सिगरेटचा होता. त्या धुरामुळे त्यांना स्पष्ट दिसतही नव्हतं. ते जसे आत गेले तश्या अर्णवच्या पायाला बिअरच्या बाटल्या लागल्या. अजुन आत गेल्यावर खाली एक नव्हे तर कमीतकमी १० बाटल्या पडलेल्या होत्या. फक्त बिअरच नव्हे तर व्हिस्की, रम अजून खूप सारे दारूच्या बाटल्या खाली पडल्या होत्या. अजून पुढे गेल्यावर ते पाहिले तर पूजा बेडवर नशेत पडली होती. तिच्या हातात कसलीतरी डायरी होती.

अर्णव -" रचना. पूजा इथे आहे. लवकर ये. "

रचना लगेचच आली. ती आत येताना खोकत होती.

रचना -" अरे. एवढे सिगरेट पिली हिने आणि एवढ्या बाटल्या.. आईशपथ.. "

रवी -" मानायला पाहिजे लगा.... दम खूप आहे हिच्यात.... "

रवी चेष्टेच्या मूड मध्ये होता.

रचना -" अरे काहीही काय बडबडतोस..... "

अर्णव तिच्या बेडवर जाऊन तिच्या नाकाजवळ हात नेला. तिचे श्वास चालूच होते. तेव्हा कुठे त्याचा जीव भांड्यात पडला.

अर्णव -" तुमच्या दोघांचं काय चाललय. सिरियस नेस नाही का? हिला हॉस्पिटलला घेऊन जावं लागेल.... "

रवी -" हो हो चल. तुम्ही दोघं उचला. मी गाडी काढतो. "

पूजाचा मोबाईल आणि डायरी अर्णव रचनाला दिला आणि तिला उचलून खाली जाऊ लागला. रचना घर बंद करून येऊ लागली. खाली जाऊन अर्णव मागच्या सीट वर पूजाला घेऊन बसला. रचना पुढच्या सीटवर बसली. वेळ न घालवता ते लवकरच हॉस्पिटलला पोहचले.

रवी पळतच डॉक्टरला बोलवायला गेला. अर्णवने पूजाला स्ट्रेचर वर झोपवले. डॉक्टर लवकरच आले.

डॉक्टर -" हिला घेऊन चेक अप रूम मध्ये घेऊन चला. तुमच्यापैकी कोणीतरी सोबत चला. "

रचना तिच्या कडे असलेला मोबाईल आणि डायरी अर्णवकडे देऊन गेली. अर्णव आणि रवी बाहेरच थांबले

रवी -" काळजी करू नको यार. काही नाही होणार. "

त्याला खूपच भीती वाटत होती. भीती म्हणण्यापेक्षा मनात वेगळीच भीती निर्माण झाली होती. अर्ध्या तासानंतर डॉक्टर बाहेर आले. रचनाने बाहेर बसलेल्या दोघांना डॉक्टरच्या केबिन मध्ये बोलवले.

डॉक्टर-" केस खूप गंभीर आहे. खूपच नशा केल्या मुळे ती कोमात गेली आहे. माहिती नाही कधी बाहेर येईल. तुम्ही त्याचे कोण?"

रचना -" आम्ही सगळे तिचे ऑफिस सहकारी आहोत. "

डॉक्टर -" तिच्या घरचे कोणी नाही का?"

रचना -" ती एकटीच राहते. "

डॉक्टर -" ओके... मी काही इंजेक्शन लिहून देतो तुम्ही आणून द्या. "

अर्णव -" सर. ती बरी तर होईल ना?"

डॉक्टर -" होईल.. काळजी नका करू. पटकन ते इंजेक्शन आणा. "

सगळे बाहेर आले. रचना आणि रवी इंजेक्शन आणायला बाहेर गेले.

अर्णव तिथेच बाहेर बसून होता. त्याला स्वतःलाच कळत नव्हतं की काय चाललंय. तो जिच्यावर प्रेम करत होता. तिची अवस्था खूपच गंभीर होती. त्याला माहिती नव्हतं कि तो काय करत होता. पण त्याला फक्त एकच पाहिजे होत की ती बरी झाली पाहिजे..

त्याच्या हातात मोबाईल आणि कसलीतरी डायरी होती. तो मोबाईल चेक केला कि कोणी नातेवाईक चा मोबाईल नंबर तर मिळेल का पण तो फोन तो लॉक होता. तो डायरीचा पहिला पान उघडला.

डायरीच्या पहिल्या पानावर तिचा फोटो होता. गिटार घेऊन उभी असलेली ती खूपच सुंदर दिसत होती. दुसऱ्या पानावर लिहिलं होत की ' जर ही डायरी तुम्हाला सापडला तर तुमचा मूड ऑफ होईल, म्हणून परत करावी. '

अर्णवने डायरी वाचावयास घेतली.

२८ जून २०१८ -

आज सकाळी उशिराच उठले. दररोजच्या सारखं आज पण पप्पा बाय न बोलताच गेले. सकाळी एकटीलाच नाश्ता करून खावा लागला. पण करावे तर काय? आई लहानपणीच गेली तेंव्हापासून पप्पापासून मी तेवढी क्लोज नव्हते. पप्पा बिझनेसमध्ये व्यस्त असायचे. मला देण्यासाठी त्यांच्याकडे सगळं काही आहे फक्त वेळ सोडून. आज कॉलेजचा पहिला दिवस.

आजचा दिवस खूप बेकार गेला आणि घरीसुद्धा बोर होतोय खूप. आज बाई पण नाही आली. तिच्याजवळ मी माझं मन मोकळं करत असते. ती माझी खूप काळजी घेते. पप्पांना तर वेळ नसतो मग मी एकटी काय करणार?

२ जुलै २०१८-

आज मी त्याला पाहिले. कॉलेजमध्ये त्याची खूप चर्चा असते. प्रेम नाही म्हणता येणार. पण आकर्षित तर तो आहे हे मात्र नक्की. तो क्लासमध्ये माझ्या जवळ येऊन बसला.

' राहुल ' त्याचं नाव. त्याच्याशी बोलताना खूप छान वाटतं. असं वाटत कि बोलतच राहावे. आम्ही दोघे कॅफे मध्ये कॉफी पिलो. कॉफी झाल्यावर त्याने माझा मोबाईल नंबर मागितला. पण मी त्याला नाही दिला. कारण थोडा तो तडपणे दो उसे..

१५ जुलै २०१८-

आज तो मला लाँग ड्राईव्ह साठी घेऊन गेला होता. खूपच मस्त वाटल त्याच्यासोबत.. त्याच्या बाईकच्या बॅक सीटवर बसून मी आणि तो हवेला चिरत जात होतो. बीच वर पोहचल्यावर अचानक पाऊस आला. मला तर पाऊस म्हणजे खूप म्हणजे खूप आवडतो. आम्ही दोघेही खूपच भिजून गेलो होतो. मी कधी त्याच्या मिठीत गेले मला कळलच नाही. तेवढ्यात त्याने गुडघ्यावर बसून मला प्रपोज केले. मी वेळ न घालवता त्याला हो म्हणाले. मी चूक तर नाही केले ना?.

३० जुलै २०१८-

आज मी पहिल्यांदा सिगरेट ओढले. तो कॅन्टीनमध्ये त्याच्या मित्रासोबत सिगरेट ओढत होता. मी त्याला थांबवू लागले. तर तो म्हणाला कि त्याच्या मित्रांची गर्लफ्रेंड पण ओढतात अस म्हणतच तो मला जबरदस्तीने सिगरेट ओढावयास आग्रह करू लागला. पहिला मी नको म्हणाले. मग मी पण एक कश घेतले. पहिला खोकला लागला. मग मात्र एक सिगरेट ओढली. मी चुकीच तर नाही करत आहे ना?... हाच प्रश्न मला अजूनसुद्धा पडतोय...

१७ ऑगस्ट २०१८-

आज मी खूप रागात आहे. कारणच तसं आहे. आज मला तो ड्रग्स घेत असताना सापडला. मी रागात त्याला थोबाडीत मारली. तो रागा रागात तिथून निघुन गेला. काही असो, पण तो चुकिचं करत होता.

२० ऑगस्ट २०१८-

न राहून आज मी त्याला भेटले. तो खूप रागात होता. मला ड्रग्स घे म्हणाला. नाहीतर मला विसर...... माझं मन आणि प्रेम या दोघांमध्ये युद्ध सुरू झाले होते. पण प्रेम जिंकल शेवटी, मला ते ड्रग्स घ्यावचं लागलं. मला वाटलं माझ्या इगो पेक्षा प्रेम इंपॉर्टन्ट आहे. म्हणून मी घेतले. मी चूक तर नाही केले ना?.

२३ सप्टेंबर २०१८-

आज मी व्होडका सुद्धा ट्राय केले. राहुलच्या मित्राच्या पार्टी मध्ये त्याने हट्ट केला म्हणून मीही ट्राय केले. जेंव्हा मी घरी आले. तेंव्हा पप्पा मला असं बघितल्यावर मला काही सुद्धा नाही म्हणाले.. त्यांना वेळच नाही मिळाला. ते आणि त्यांचं बिझिनेस त्यांनाच माहिती.....

२ ऑक्टोंबर २०१८-

आज पप्पांना राहुल बद्दल कळालं.. मला खूप रागावले. माझं कॉलेज सुद्धा बंद झालं. एका रूम मध्ये मला कोंडून गेले. मी राहुल ला सगळं काही सांगितले. त्याला सांगितले कि आपण पळून जाऊ. तो हो म्हणाला. आम्ही आता ट्रेन नी खूप लांब जाणार जिथं कोणीच नसणार, फक्त तो आणि मी. बाकी कोणीच नाही.

३ जानेवारी २०१९ -

जीवन कसं असतं ना? सगळे डॉक्युमेंट आणि काही पैसे घेऊन मी तर घरून पळाले. स्टेशन वर आल्यावर त्याला फोन लावले तर तो बंद होता. मी काही विचार न करता त्याच्या घरी धावत धावत गेले तर घराला कुलूप होते. घरी तर मी चिठ्ठी सोडून आले होते कि ' मला शोधू नका. जर प्रयत्न केलात तर माझं मृत शरीर बघाल ' आणि आज मी इथं स्टेशन वर आहे. पण कोणत्याच ट्रेनची वाट बघत नव्हते. माझं जीवनाची ट्रेन तर कधीची निघून गेली होती. इकडं आड आणि तिकडं विहीर अशी परिस्तिथी झाली. आत्महत्या करावं वाटत आहे.

६ फेब्रुवारी २०१९ -

आज मला चांगली जॉब मिळाला. पण माझं अर्धा वेळ तर दारूत जातो. काल मला कळलं माझे पप्पानीं माझे १३ वे केलें. त्यांच्याशी खूप वाईट वागले ना मी. खूप कॉल केले पण ते मात्र अजून रागात आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. हॅपी बर्थडे पप्पा.

आय लव यू..

१२ फेब्रुवारी २०१९ -

आज मी अर्णवला भेटले. खूप चांगला आहे तो. बाकीचे सहकारी सुध्दा खूप छान आहेत.

१५ फेब्रुवारी २०१९ -

आज मला पप्पा दिसले. मला त्यानीं सुद्धा बघितले. मला न बघण्यासारखं करून कार मध्ये बसून जात होते. मी कारच्या मागे धावत गेले. पळत पळत मी पडलेच. प्लीज पप्पा माफ करा मला.

------------------------------

डायरी वाचत असताना अर्णवच्या डोळ्यात पाणी येऊ लागल होतं. खूप काही तिने सहन केलेले त्याला जाणवत होते. त्याला खूप वाईट वाटत होत. तेवढ्यात रवी आणि रचना दोघे औषध घेऊन आले. नर्स बाहेर येऊन म्हणाली.

नर्स -" डॉक्टर तुम्हाला बोलवत आहेत. "

सगळे डॉक्टरच्या केबिनमध्ये गेले.

डॉक्टर -" बसा बसा... "

डॉक्टर रिपोर्ट फाईल बघत होते.

रचना -" डॉक्टर... काही परिस्तिथी गंभीर आहे का?"

डॉक्टर -" हा.. गंभीर परीस्थीती आहे"

अर्णव -" काय झालं डॉक्टर?.. "

डॉक्टर - " ती खूपच अल्कोहोलिक आहे, म्हणजे मला वाटत ती खूप दारू पिते. "

रचना आणि रवी दोघेही " काय? " असे उद्गार काढले.

डॉक्टर -" येस.... ती सध्यातर कोमात गेलेली आहे.... "

रवी -" ही तर लेडी कबीर सिंग आहे कि... "

रवी हळूच म्हणाला.

रचना त्याच्याकडे रागाने पाहिली.

अर्णव -" किती वेळ लागेल कोमातून बाहेर यायला?"

डॉक्टर - " सांगता येत नाही... १ दिवस लागेल नाहीतर १ वर्ष सुद्धा लागू शकतं.. १ सेकंद सुध्दा लागू शकतं... "

तेवढ्यात नर्स पळतच केबिनमध्ये आली.

नर्स -" डॉक्टर... पेशंटला अटॅक्स् येत आहेत.... "

डॉक्टर -" ओह माय गॉड.. चला लवकर... "

तिघे सुद्धा त्यांच्या मागे गेले.

डॉक्टर -" तुम्ही प्लीज बाहेरच थांबा... "

अर्णव तिला बाहेरूनच बघत होता. तिला झटके येत होते. डॉक्टरांनी लगेचच ट्रीटमेंट सुरू केली. तिला असं बघून त्याला तिची काळजी वाटू लागली.

' हिने खूप काही सहन केलं आहे. का कुणास ठाऊक? पण मला ही आवडू लागली होती. पण अश्या अवस्थेत मी त्याला सोडू शकत नाही ' असे विचार त्याच्या मनात येऊ लागले.

डॉक्टरानी इंजेक्शन दिल्यावर ती गप्प झाली. डॉक्टर बाहेर आले.

अर्णव -" डॉक्टर काय झालं?.. "

डॉक्टर -" तिला खूपच मानसिक धक्का बसला आहे. तिला सावरावं लागणार आहे. तिला सांभाळा. "

एवढे बोलून डॉक्टर गेले. तो आय सी यू मध्ये डोकावून पाहू लागला तर ती शांतपणे झोपली होती.

रचना -" अर्णव, काळजी नको करुस. ती होईल बरी. "

अर्णव-" पण तिच्याबद्दल खूप वाईट वाटतंय रचना. एकटीच आहे ती या शहरात. तिकडे वडील असून सुद्धा नसल्यासारखे आहेत आणि इथे तिला फक्त आपणच आहोत. कधी वाटतं तिच्यासोबत राहावं, तिला सांभाळावं. तिच्या सोबत आयुष्य घालवावं. पण असल्या अवस्थेत कसं?? "

न कळत त्याच्या डोळ्यातून पाणी आलं.

रचना -" हे... काही नाही झालं रे... तिला सांभाळू आपण... ओके??"

तो फक्त मान हलवला आणि होकार दिला.

१ महिन्यानंतर

आज सकाळी पण काकूला डब्बा करायला वेळ झाला.

अर्णव -" काकू. पटकन डब्बा द्या. तिचा जेवणाचा वेळ होईल आता.. "

काकू -" हो हो... आणतेच बघ... "

बेड नंबर ८.

ती अजून कोमात होती. तो फक्त तिच्या परत येण्याची वाट पाहत होता. तिला जेवण भरवत त्याला सुद्धा एक प्रकारचं आनंद मिळत असे. हो ती फक्त लिक्विड अन्न घेत होती. डॉक्टर दररोज येत असत आणि चेक करून जात असे. पण परिणाम काहीच नाही. पण मनात एक आशा होती. ती परत येणार, तो तिला प्रपोज करणार आणि पुर्ण जीवन तिच्यासोबत घालवणार.

पुजाला भेटायला रचना आणि रवी सुद्धा येत असत.

रचना -" मला अर्णवला अस बघवत नाही रे रवी. "

रवी -" प्रेमात असचं असतं रचना. सगळं काही त्याग करावं लागत. काहीही अपेक्षा करायचं नसतं. १ महिना झाला. त्याने हॉस्पिटलला आपलं घर करून

ठेवलंय. इथंच राहतोय, इथंच ऑफिसचे काम करतोय. तिला सांभाळत असतो. यार..... अर्णव मानलं यार तुझ्या प्रेमाला... "

कधी नाही ते रविला सुद्धा वाईट वाटत होत.

रचना -" पूजा खूप लकी आहे. "
अर्णव त्या दोघांकडे पाहत म्हणाला.

अर्णव -" अरे तुम्ही कधी आला?"

रचना -" आताच.... "

अर्णव- " चला... आलात तर डॉक्टर कडे जाऊ.. "

सगळे केबिन मध्ये गेले.

अर्णव -" डॉक्टर काही फरक वाटतंय का?"

डॉक्टर -" नाही... मला वाटतं तुला सुद्धा आशा सोडून द्यावं लागेल. खूप वेळ झाला. तू वेळ आणि पैसा वेस्ट करतोयस. "

अर्णव -" डॉक्टर तुम्हाला नाही कळणार. तीच मन माझ्या सोबत रोज बोलत असतं. ती येणार फक्त वाट बघावं लागेल. "

तेवढ्यात नर्स आली.

नर्स -" डॉक्टर.... ती उठली.... पटकन चला... "

ते पळतच बाहेर गेले.

नर्स असं म्हणताच अर्णव तर जोरात पळत सुटला. तो तिच्या जवळ येऊन उभा राहिला. तिचे सुंदर डोळे इकडे तिकडे पाहत होते, जणूकाही हे तिला नवीनच होत. डॉक्टर तिला चेक करत होते.

डॉक्टर -" ह्म्.... आता कसं वाटतंय पूजा?"

पूजा -" थोड डोकं दुखतोय. "

डॉक्टर -" बरी होशील आणि काळजी घ्यायला हवी... "

पूजा -" अरे... काल कशी झाली पार्टी?"

सगळे एकमेकाकडे बघत होते. " ती पार्टी होऊन तर आता १ महिना झाला होता. म्हणजे हिला काहीच आठवत नाहीय. " रवी तिची परिस्थीती पाहत म्हणाला.

रचना -" छान. मस्त झाली. "

ती दोघांकडे पाहत डोळे मारली.

पूजा -" १ मिनिट... मी तर माझ्या घरी होते. इथं कसे आले?. आणि ती माझी डायरी कुठे आहे? कुणी वाचले तर नाही ना?... "

ती हळू हळू आठवत होती. रचनाने तिला तिची डायरी दिली.

पूजा -" Oh! thank you! काल तर मी माझ्या रूम मध्ये होते. इथं कोण आणले मला?. "

सगळे अजुन तिची कंडीशन बघून चकित झाले होते.

रचना - " हे बघ पूजा. तू पार्टीच्या रात्री तुझ्या रूम मधेच होती. पण तू बिअर आणि सिगरेट च्या नशे मध्ये होतीस. आम्ही सगळे तुला कॉल करत होतो. तू रिसिव्ह करत नव्हतीस. म्हणून आम्ही तुझ्या घरी आलो होतो. तू बेशुध्द पडली होतीस. आम्ही तुला इथे आणल.. आणि अजुन एक. तू १ महिनापासून कोमात होतीस... "

पूजा -" काय?????"

ती आश्चर्याने म्हणाली.

अर्णव -" हो... आणि सॉरी मी तुझी डायरी वाचली... आम्हाला सगळं कळलायं. "

पूजाच्या आता लक्षात आलं. तिच्या गालावर आता अश्रू वाहू लागले. हळू हळू ती परिस्थीती जाणून घेत होती. तिला रडु कोसळलं. ती अर्णवला मिठी मारत रडु लागली.

पूजा -" Thank you.... तुम्ही मला हॉस्पिटलमध्ये आणल्याबद्दल. "

तिघेही तिला सावरण्याचा प्रयत्न करू लागले. तिला दिलासा देत होते. डॉक्टरांनी अर्णवला इशारा देत बोलवले. तो त्यांच्यासोबत केबिनच्या बाहेर आला.

डॉक्टर -" अर्णव.. ती आता बरी वाटत आहे. पण ती याच्यापुढं कोणतीही नशा केली तर तिचा जीव धोक्यात येऊ शकतो. काळजी घ्यावी लागेल. तुम्ही उद्या जाऊ शकता. पण एकाच अटीवर किती आता सावरायला हवं.. तिला अधूनमधून खूप त्रास होणार, पण तुम्हाला सांभाळावं लागणार. ती ड्रग्स घेत होती. तिला कंट्रोल

करायला अवघड जाणार आहे. फक्त तिची काळजी घ्यायला हवी. आणि माझी ट्रीटमेंट चालू असू द्या... "

अर्णव -" काळजी नको डॉक्टर. आम्ही आहोत तिला सावरायला.... thank you doctor.. "

आता कुठं ती नॉर्मल दिसत होती. तो परत बेडजवळ येऊन बसला. रचना आणि रवी तिला नॉर्मल करत होते. रवी तिला हसवत होता. तिला हसताना पाहत त्याला समाधान वाटत होत. ती हसताना खूप सुंदर दिसत होती. तिच्या गालावरची खळी अर्णवला पहिल्यापासूनच घायाळ करत होते.

अर्णव -" पुरेपुरे... पूजा तुला आता काहीतरी खायला हवं... "

रचना -" हो... तुला माहिती का पूजा. तू कोमात असताना दररोज तुला अर्णव भरवत होता... "

पूजा -" खरचं... किती गोड अर्णव... "

एवढं बोलून ती त्याला मिठी मारली. तिच्या मनात कदाचित तो नव्हता. पण त्याला असं वाटत होत की तिच्या याच मिठीत पूर्ण जीवन काढावं.

पूजा -" आणि आजपण मला तूच भरवणार ना?"

अर्णव -" नक्कीच.... "

तो तिला एकेक घास भरवत होता. एकदम ती त्याच्या बोटाचा चावा घेतली.

अर्णव -" आऊच..... "

सगळे हसू लागले.

पूजा -" सॉरी सॉरी... "

तिचे जेवण संपताच. ती म्हणाली

पूजा -" thank यू अर्णव. माझं सिगरेट कुठ बघितला का?"

रचना -" पूजा.... तूला आता कधीच ते सिगरेट मिळणार नाही. "

अर्णव -" हो... जस्ट कंट्रोल यार... तुला सोडावं लागणार आता. "

पूजा -" काळजी नका करू. जोक करत होते. "

रवी -"बस हा आता. आता जस्ट टेक युवर मेडिसिन्स अँड टेक रेस्ट... "

अर्णव -" हो... "

तो तिला गोळ्या देत म्हणाला. तीने गोळ्या घेतल्या..

अर्णव -" आता झोप बघू.. "

पूजा -" अरे... एक महिना झालं झोपेतच आहे... किती झोपू अजुन. "

अर्णव -" डॉक्टरांनी सांगितलंय... झोप बघू... "

तिला कसं तरी झोपवण्यात आलं. गोळी परिणामकारक असल्याने ती लगेचच झोपी गेली.

रचना -" डिस्चार्ज कधी मिळणार?.. "

अर्णव -" उद्या... "

रवी -" अजुन काय म्हणाले?"

अर्णव -" तिला आता खूप सांभाळावं लागणार... "

रचना -" आम्ही आहोत तुझ्यासोबत.. "

उद्याचा दिवस उजाडला. तिघे तिला घेऊन तिच्या घरी आले. आधीच तिच्या घराची साफसफाई झाली होती. तिथे एक सुद्धा बिअर, दारूच्या बाटल्या, तेच काय तर एक सिगरेटचा तुकडा सुद्धा ठेवला नव्हता. कित्येक दिवस हॉस्पिटलमध्ये राहून आता ती घरी आली होती. घरात शिरताच ती पूर्ण घराला पाहत होती.

अर्णव -" पूजा तुला एक विचारू... "

पूजा -" चार विचार... "

अर्णव -" मी इथे काही दिवस राहू शकतो का?. म्हणजे माझं फ्लॅट च रेन्युएशन चालू आहे ना म्हणून... "

पूजा -" ह्म्म्म... फक्त एकाच अटीवर. "

अर्णव -" कोणत्या?"

पूजा -" तुला घरचं स्वयंपाक करावा लागेल... काय आहे ना मला ते जमत नाही ना म्हणून. "

तो तिला खोटी कारणं सांगून घरी राहण्यास आला होता. त्याला फक्त तिची काळजी असल्याने इथे राहावं लागणार होत. रचना आणि रवी त्याच सामान घेऊन आले होते.

रात्रीच्या जेवणाची तयारी झाली होती. ते दोघे जेवून घेतले. ती गोळ्या घेऊन झोपी गेली.

रात्रीचे १ वाजत आले होते. ती अचानक उठली. अर्णव दुसऱ्या रूममध्ये झोपला होता. तिने त्याला हाक मारली. आवाज ऐकताच अर्णव जागा झाला. तो पटकन तिच्या रूममध्ये आला. ती अंग चोरून बसली होती. तो तिला स्पर्श करताच कळलं की तिला ताप आला आहे आणि ते ताप वाढतच होत. तिला खूप त्रास होत होता.

अर्णव -" काळजी करू नकोस पूजा... मी आहे ना... "

तिला खूप त्रास होऊ लागला. ती तडपडत होती. तिचे शरीर आता आगाची भट्टी झालेली होते. त्याला काही सुचत नव्हतं.

पूजा -" काहीतर कर अर्णव. सहन नाही होत रे आता.. "

ती आता रडत होती. तो तिला घेऊन बाथरूम मध्ये गेला. बाथ टब मध्ये पाणी सोडले आणि तिला त्यात झोपवले. तिने त्याचा हाथ घट्ट पकडली होती. आता तिचं ते तडपडण बंद झालं होत. तिला आता बर वाटत होत. १ तासानंतर तिला तिथेच झोप लागली. तिने त्याचा हात तिच्या डोक्याखाली ठेवलं होता. त्याला उठता येणार नव्हतं. पण तिला झोपेत बघून त्याला खूप समाधान वाटत होत. ती झोपेत खूप सुरेख दिसत होती. तिला तो असं अख्ख जीवन भर बघू शकत होता इतकं ती सुरेख दिसत होती. तिला बघता बघता तो सुद्धा तिथेच झोपी गेला.

---------------------------------

सकाळ झाली. ती उठली. त्याचा हाथ अजुन तिच्या डोक्याखाली होता.

पूजा -" अर्णव... अरे अर्णव... उठ.... "

तोसुद्धा जागा झाला.

अर्णव -" आता कसं वाटतंय तुला?. "

पूजा -" आता छान वाटतंय. सॉरी... काल माझ्यामुळे तुला त्रास झाला.. "

अर्णव -" अरे. सॉरी कशाला?.. जर मला असं झालं असतं तर तू सुद्धा काहीतरी केलेच असतीस कि... "

पूजा -" तरी पण यार.... "

अर्णव -" काही नको बोलुस... "

ते दोघेही आता शांत झाले होते. दोघेही एकमेकांच्या डोळ्यात बघू लागले. तिच्या डोळ्यात बघताना त्याच मन जोरात धडधडत होत. तिचे ते ओले केस, आणि कपाळावर त्या केसाची बट आलेली होती, जेंव्हा ती तिच्या इवल्याशी ती बट बोटांनी कानामागे घेत होती ते पाहून तर तो पार पिघळून गेला होता.

दोघेही आता फ्रेश झाले होते. ती आज ऑफिस जॉईन करणार होती. ऑफिसमध्ये पोहचताच ऑफिसमधील सगळे सहकारी तिचे स्वागत करत होते. खास करून बॉस, ते पण तिचे स्वागत करत होते. सगळे खूपच खुश दिसत होते.

दुपारच्या जेवणाची वेळ चालू होती. अचानक पूजा काम करता करता खाली कोसळली आणि कडकडू लागली. हे पाहताच अर्णव, रवी आणि उठले. ते सगळे तिला बाहेर घेऊन गेले. तिला खूप थंडी वाजत होती. अर्णव अर्धा रजा काढून तिला घरी घेऊन गेला. ती खूपच कडकडत होती. तिचे दात वाजत होते. घरी गेल्या गेल्या तो तिला स्वेटर घातला तरी ती कडकडत होती. अजुन ३ ब्लँकेट तो तिला घातला. ही थंडी बाहेरून नव्हे तर आतून लागून होती. तिला हे सहन करावं लागणार होत. तिला त्याने मांडी वर घेतले, ती आता रडकुंडीला आली होती. तिची ही परिस्थिती बघून त्यालासुद्धा भीती वाटत होती. ती आता रडु लागली होती. तिचा त्रास वाढतच होता. डॉक्टरांना कॉल केल्यावर त्यांनी सांगितले की झोपेचे गोळया द्या. त्याने तिला

गोळी दिली. थंडीमुळे ती तोंड उघडतचं नव्हती. तरी त्याने तिला कसे तरी विनवणी करून गोळी दिली. ती आता झोपली होती. त्याच्या मांडीवर ती झोपी गेली होती.. तिची ही परिस्थिती पाहून त्याच्याही डोळयातून अश्रू आले. ' देव कुठंही असेल तर प्लीज मला तिचं हे दुःख मला दे... तिला या अवस्थेत मला बघवत नाही. ' अशी विनवणी तो मनोमन करू लागला.

१५ दिवस होऊन गेले. आताशी ती बरी झाली होती. पण आधीमधी तिला अटॅक येत होते. पण तो तिला काहीही होऊ देत नव्हता..

उद्या ८ फेब्रुवारीचा दिवस होता. तिचा वाढदिवसाचा दिवस आणि नेमके त्याच दिवशी प्रपोज डे सुद्धा होता. उद्याचा दिवस तिच्यासाठी खूप चांगला जाणार होता. तिच्या आयुष्यातील खूपच चांगला दिवस होणार होता. कारण तो तिला त्याच्या प्रेमाची कबुली देणार होता.

सकाळची वेळ होती. आज तिचा दिवस होता, मात्र त्याला वाटतं होत कि हा दिवस त्याचाच आहे. तिचा वाढदिवस खूप वेगळ्या प्रकारे साजरा तो करणार होता. म्हणून त्याने लवकर अंघोळी अटपली. सकाळचा नाश्ता केला आणि तयार झाला. आज त्याचा मूडसुद्धा खूप मस्त होता.

तो तयार झाल्यावर थेट तो तिच्या बेडरूममध्ये कॉफी घेऊन गेला. पूजा अजुन झोपली होती. ती झोपताना खूपच सुंदर दिसत होती. त्याच मन तर करत होत की आयुष्यभर असाचं तिचे हे रूप त्याच्या मनात भरवून ठेवावं. तिच्या केसाची एक

लट तिच्या कपाळावर खूपच छान दिसत होती. तिच्या त्या सुंदर चेहऱ्याची रूप बघण्याच्या नादात त्याच्या अंगावर गरमागरम कॉफी त्याच्या अंगावर पडली.

अर्णव -" अरे... शे. "

त्याचा तो आवाज ऐकताच ती उठली.

पूजा -" काय चाललयं अर्णव तुझं? "

ती डोळे चोळत म्हणाली.

अर्णव -" काही नाही ग. तुझ्यासाठी कॉफी आणली होती. पण सांडली... सॉरी. "

पूजा -" काहीही हा तुझं, अर्णव "

ती हसत म्हणाली.

अर्णव -" थांब अजुन एक कप आणतो. पण सर्वात आधी, वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.. "

पूजा -" अस विश करायचं असतं का?"

अर्णव -" मग कसं?"

तीने त्याच्याजवळ येऊन त्याला मिठी मारली.. तो तर दचकलाच.

पूजा -" हे असं करायचं असतं.. "

त्याने सुद्धा आता तिला मिठीत घेतले. त्याला एका नवीनच स्वर्गात आल्यासारखं वाटलं. तिथं फक्त ती आणि तोच असावे अशी त्याची इच्छा होत होती. ही पकड कधीच सुटू नये असं त्याला वाटत होतं.

एकदमच ती म्हणाली

पूजा -" अर्णव सोडशील का मला आता?"

अर्णव -" ओह... सॉरी सॉरी.. "

ती हसतच राहीली.

तिला कित्येक दिवसानंतर मन भरून हसताना तो पाहत होता. तिच्या गालावर हसताना पडलेली खळी तिला अजुन सुंदर बनवत होती. तिचे ते मोकळे केस आणि त्यातली एक बट तिच्या गालावर येत होती आणि ती तिच्या नाजुक हातानी कानामागे घेत होती. ते अजून त्याला तिच्या प्रेमात पाडत होते. ती त्याच्या डोळ्यासमोर हात फिरवत त्याला जाग करत होती.

पूजा - " कुठं लक्ष आहे तुझं?"

अर्णव -" कुठं नाही. चल उठ तयार हो. आज मस्त प्लॅन केलेला आहे. "

पूजा -" कसला?"

अर्णव -" तू फक्त तयार तर हो मग सांगतो आणि हे ड्रेस घे, आज हेच घालणार आहेस.. आणि हा रचना आणि रवी सुद्धा येणार आहेत. "

पूजा -" ओके बाबा. "

ती तयार होण्यासाठी गेली. त्याने रचना आणि रवीला बोलावून घेतले. पूजा आवरून आली. ती सलवार कमीजमध्ये एक सुंदर परी दिसू लागली होती. त्याला वाटत होत की तिला काजळ चा टिक्का लावावा.

रचना -" वाढदिवसाच्या शुभेच्छा. "

पूजा -" थँक्स... "

एवढं बोलून रचनाने तिला मिठीत घेतली.

रवी -" वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा पूजा "

पूजा -" धन्यवाद... "

अर्णव -" चला जायचं का?"

पूजा -" कुठं?"

रचना -" अगं तू चल तर मग कळेल तुला?"

पूजा -" अगं पण ऑफिस??"

रवी -" काळजी नको. बॉसला सांगितलंय की आम्ही नाही येणार म्हणून. "

अर्णव -" मग छानच झालं. "

रचना -" अगं चल.. "

असं म्हणत ती पूजाला ओढतच घेऊन जाऊ लागली. रवी गाडी घेऊन आला होता. ते सगळे गाडीमध्ये बसले. रवी गाडी चालवत होता. पुढे रवी आणि रचना बसले होते. अर्णव आणि पूजा मागच्या सीट वर बसले होते. रवीने एका मंदीरापुढे गाडी थांबवली.

रवी -" चला उतरा... "

पूजा -" इथं का?"

रचना -" कशाला म्हणजे?"

पूजा -" म्हणजे मंदीरामध्ये कशाला?"

रवी -" वाढदिवसाची सुरुवात इथुनच करायचे असते ना?"

पूजा -" पण... "

ती चाचपडत म्हणाली.

अर्णव -" मला माहिती आहे, पूजा तू का नको म्हणत आहेस ते. तु नास्तिक आहेस म्हणून ना. मी पण आहे, पण म्हणतात ना की मंदिर मध्ये एक वेगळाच वातावरण असते म्हणून, त्यासाठी तू चल तर... "

पूजा -" बरं.. तुम्ही सांगत आहात तर चला मग.. "

ते सगळे त्यांचे पादत्राणे बाहेर काढले आणि आत गेले. तिथे बरीच गर्दी होती. अगरबत्तीचा वास आणि त्या घंटानादाचा आवाज ऐकुन मनात समाधानाची भावना निर्माण होत होती. पूजाला आता खरं समाधान वाटत होत. तिच्या चेहऱ्यावर न कळत एक ताजेपणा आला होता, जो खूप दिवस झाले आलेला नव्हता.

तिथे खूप जण होते. पूजाच लक्ष मात्र वेगळीकडेच गेल. एक लहानशी मुलगी वर असलेली घंटा वाजवण्याचा प्रयत्न करत होती. ती उड्या मारून घंटा वाजवण्याचा प्रयत्न करत होती. ते पाहताच पूजा तिथे गेली आणि तिला उचलून घंटपर्यंत नेले, ती मुलगी तिच्या लहान हातानी जोरात घंटा वाजवली. त्या घंटेचा आवाज मंदिराच्या आवारात वाजू लागला. त्या मुलीच्या चेहरा आनंदीत पाहून बाकी सुद्धा आनंदित होते. पूजाने तिला खाली उतरवले.

ती -" thank you दीदी... "

पूजा -" तुझं नाव काय आहे?"

ती -" माझं नाव श्वेता आहे. "

पूजा -" खूप गोड. तुझे आईवडील कुठे आहे?"

श्वेता -" मला आईवडील नाहीत. "

पूजा -" ओह सॉरी. मला माहिती नव्हतं.. मग तू कोणासोबत आलीस?"

श्वेता -" मी आमच्या मॅडम सोबत आले. ते बाहेर वाट बघत असतील. मी जाऊ??"

पूजा -" असचं जाणार. तुझ्या दिदिला पप्पी नाही देणार का?. तुझ्या दिदीच आज वाढदिवस आहे... "

श्वेता -" हॅपी बर्थडे दीदी.. "

असं म्हणत ती पूजाच्या गालावर पप्पी दिली. पूजाने सुद्धा तिला गालावर लाडाने पप्पी दिली.

श्वेता -" बाय बाय... "

पूजा -" अरे थांब... "

पुजाने तिच्या पर्स मधून काही चॉकलेट काढून तिला दिली.

श्वेता -" thanks दीदी... बाय... "

पूजा -" बाय... "

ती हात हलवत जाऊ लागली. पूजा तिला पाहत काही वेळ तिथेच थांबली.

अर्णव -" कसं असत ना. त्या बिचारीला हे सुध्दा माहिती नाही की तिचे आईवडील कोण आहेत. तरी सुद्धा ती किती खुशीत आहे आणि आपण एवढं काही असताना त्याची किंमत जाणून घेत नाही. "

पूजाच्या डोळ्यातून न कळत अश्रू वाहू लागले. तिला आता तिच्या वडीलाची आठवण येत होती. तिला सुद्धा लहानपणी तिचे वडील तिला मंदिरात घेऊन जात होते. ते दिवस तिला आठवत होते.

ते सगळे आता निघू लागले. पूजा अजुन सुद्धा तिच्या आठवणीत होती. बाकीचे सुद्धा तिला काही न विचारण्याच ठरवल होतं.

आता गाडी अर्णवने चालवायला घेतली. अधून मधून तो आरश्यामध्ये तिला बघत होता. ती खिडकीमधून बाहेर पाहत होती. तिचे मोकळे केस तिच्या चेहऱ्यावर येत होते, तिच्या नाजुक बोटांनी ती कानामागे घेत होती.

अर्णवने गाडी थांबवली. गाडीच्या झटकेमुळे पूजा तिच्या आठवणीतून बाहेर आली. ते सगळे खाली उतरले. गाडी अनाथ आश्रमाखाली उभी होती. पूजा बाकीच्यांना न बघता आत जाऊ लागली. रचना तिला थांबवत होती पण अर्णवने तिला इशारे करून अडवू नको अशी खुण केली.

पूजा आत गेली. ते तिघे सुद्धा तिच्या मागे गेले. तिथे लहान मुले बाहेर खेळत होते. अचानक एक आवाज आला.

" दीदी "

ती श्वेता होती. पूजा तिला पाहून खूप खुश झाली. तिला पळतच मिठी मारली आणि रडु लागली.

श्वेता -" दीदी काय झालं रडायला. आज तुझा बर्थ डे ना... तू रडू नको बघू?"

पूजा - " काही नाही ग... "

तेवढ्यात तिथे मॅडम आले.

अर्णव -" मॅडम तुम्हाला मी कॉल केला होता ना?. "

मॅडम -" हो... "

रचना -" आम्ही इथे दान करायला आलो आहोत. "

मॅडम -" ओ. नक्कीच चला. "

पूजा -" आम्ही आजचा दिवस राहू शकतो का?"

अर्णव -" हो. आणि एक सरप्राइज आहे. "

पूजा -" काय?"

तीने त्याच्याकडे पाहिले. तेवढ्यात सगळी मुले एक केक घेऊन पुढे आली. सगळे मुले हॅपी बर्थडे गुणगुणत येऊ लागली. ते बघून तिला भरून आलं. तीने वेळ

न घालवता केक कापला. सगळे वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होते. सर्वात आधी तीने केक श्वेता ला भरवला. बाकीच्या मुलांना ती स्वतः भरवू लागली. रवी हे क्षण कॅमेरात कैद करत होता.

त्यानंतर ती मुलांसोबत खेळू लागली. त्यांच्यासोबत पकडापकडी, लगोरी आणि बाकीचे खेळ खेळू लागली. तिच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. जणूकाही ती सुद्धा एक लहान मुलगी असावी अशी. मुलांना सुद्धा ती आवडू लागली. नंतर सगळ्यांना तीने स्वतः जेवायला वाढले. सगळे खूप मजेत होते. शेवटी या चौघांनी एकत्र जेवण केले.

दुपारी सगळ्यांनी 'तारे जमीन पर ' हा सिनेमा पाहिला. संध्याकाळ होत आली होती. निघण्याची वेळ आली होती. सगळे जायला निघाले.

त्यात पूजा तयार नव्हती. तिला जाताना पाहताच श्वेता रडु लागली.

पूजा -" नको रडु... मी येईन परत... "

श्वेता -" नक्की ना.. "

पूजा -" हो.. "

असे बोलून तीने तिला मिठीत घेतले. सगळी मुलं हात हलवत त्या सर्वांचा निरोप घेऊ लागले. ते सुद्धा बाय करत निघाले. पुजाच मन अजुन तिथेच रमत होत.

अर्णवने गाडी बीच वर थांबवली. तिथे सुर्य झोपी जात होता. खूप सारी मुल खेळत होती. पूजा मात्र समुद्राकडे पाहत हरवून गेली. रचना आणि रवी यांनी ठरल्याप्रमाणे केक आणले.

बाकी सगळे -" हॅपी बर्थडे डिअर पूजा... "

पूजा -" सर्वांना थॅंक यू.. "

सगळयांनी मिळून पुजाचा वाढदिवस खूप मजेत साजरा केला. रवी आणि रचना काहीतरी जेवण्यासाठी मागवायला गेले.

पूजा अजुन सुद्धा समुद्राकडे पाहत होती. पाहतच ती म्हणाली.

पूजा -" हा सगळा प्लॅन तुझा होता ना?"

अर्णव -" हो... "

पूजा -" थँक्स अर्णव. आज माझा दिवस खूप चांगला गेला. फक्त तुझ्यामुळे... "

त्याने खिशातून गुलाब काढला. हीच योग्य वेळ होती त्याला त्याच्या प्रेमाची कबुली देण्यासाठी.

अर्णव -" पूजा.. मला काहीतरी बोलायचं आहे. "

तीच लक्ष अजुन समुद्राकडेच होते.

पूजा -" बोल ना.. "

अर्णव -"खूप दिवसापासून तुला एक गोष्ट सांगायची होती... आय आय लव.... "

तेवढ्यात तीच्या मोबाईलची रिंग वाजला. तीने तिच्या पर्स मधून फोन काढला.

पूजा -" हॅलो... बाबा... काय झालं?"

ती खूप घाबरलेली दिसत होती.
पूजा चकित झाली होती.

पूजा -" कुठं? बरं मी येते... "

अर्णव -" पूजा... सगळं ठीक आहे ना?"

ती अजुन शॉकमध्येच होती. त्याच्या बोलण्याकडे तीच लक्ष नव्हतं. त्याने तिला हलवत विचारले.

अर्णव -" पूजा.. ठीक आहे ना?"

ती शून्यात बघत होती. ती गप्प होती. न कळत तिच्या गालावरून अर्श्रू वाहू लागले. त्याच्याकडे बघून ती म्हणाली

पूजा -" अर्णव... बाबाला... "

अर्णव -" काय झालं बाबांना?"

तिला आता रडु कोसळलं. ती त्याच्या मिठीत रडु लागली. तेवढ्यात रवी आणि रचना आले. तो त्यांना डोळयांनीच शांत बसायला सांगितलं. पूजा आता शांत होत होती.

अर्णव -" पूजा. रडू नकोस. हे बघ काय झालं सांग?"

ती शून्यात बघू लागली.

रचना -" पूजा... काय झालं?"

पूजा -" बाबा..... बाबांना अटॅक आलायं.. ते इथेच आहेत.. "

अर्णव -" काय???"

पूजा -" मला जावं लागेल... "

रवी -" तुला नाही आपल्याला जावं लागेल. "

अर्णव -" हो.. आम्ही सुद्धा येतो... "

रचना -" काळजी करू नकोस पूजा... सगळं काही ठीक होईल. "

सगळे पूजाचे बाबा जिथे अडमीट होते त्या हॉस्पिटलला पोहचले. शोधत असताना त्यांना कळलं कि बाबा आय सी यू मध्ये आहेत. ते आता आय सी यू च्या बाहेर उभे होते. तेवढ्यात डॉक्टर बाहेर आले.

पूजा -" डॉक्टर काय झालं बाबांना?"

डॉक्टर - " तू पूजा ना?"

पूजा -" हो... "

डॉक्टर -" काळजी करायची गरज नाहीये.... ते आता सध्यातरी बरे आहेत. पण त्यांना सध्या काही त्रास देऊ नका... नाही तर... "

अर्णव -" नाहीतर???... "

डॉक्टर -" त्यांचा हा तिसरा अटॅक होता.. काळजी घ्या त्यांची.. "

पूजाच्या गालावरून पुनः एकदा अश्रू वाहू लागले. ती रडत रडत खाली बसली. रचना त्याला सांभाळू लागली.

रचना - " काळजी करू नकोस यार... सगळं काही ठीक होईल... "

रवी -" हो... नको काही काळजी करुस... "

डॉक्टरांनी काही औषधे लिहून दिलेले रचना आणि रवी आणायला गेले. अर्णव आणि पूजा एका बाकावर आय सी यू च्या त्या वॉर्डासमोर एक शब्दही न बोलता बसले होते. तिचे त्या डोळयाच्या पापण्या अजूनही ओल्याच होत्या. तिचे गुलाबी ओठ आता देवाला प्रार्थना करीत होते. कधीही देवाला न मानणारी ती आता अक्षरशः देवाला साकडे घालत होती. ' का भोगत आहे ती एवढं??तिच्या त्या परिस्थितीला पाहून देवाला तर काय वाटतं असेल कुणास ठाऊक??' हा प्रश्न अर्णवच्या मनात येत होता.

दोन दिवस झाले ती काहीही न खाता तसेच त्या बाकावर बसली होती. जेंव्हा जेंव्हा डॉक्टर तपासायला यायचे तेंव्हा मात्र झटकन उठून त्यांच्याकडे जात असत.

सकाळची वेळ होती. पूजा त्या लहानशा बाकावर झोपलेली होती. कधी नाही ते तिला आता झोप लागलेली होती. तेवढ्यात डॉक्टर सकाळच्या वेळी तपासून बाहेर आले.

अर्णव -" डॉक्टर... काय झालं?"

डॉक्टर -" ते आता शुध्दीवर वर आले आहेत. तुम्ही त्यांना भेटू शकता... "

अर्णव -" थँकस डॉक्टर.... पूजा पूजा... अगं उठ लवकर बाबा शुद्धीवर आलेत. चल लवकर.. "

बाबा हे शब्द ऐकताच ती पटकन उठली. वेळ न घालवता ती उठली आणि पळतच आतमध्ये गेली. सगळे आत गेले तर ते आता शुध्दीवर आले होते.

पूजा -" बाबा.... "

पूजा रडत रडत त्यांच्या पायाजवळ येऊन बसली. बाबानी तिच्याकडे पाहिले आणि रागात म्हणाले.

बाबा -" पूजा... तू इथं काय करत आहेस.. बाहेर जा"

पूजा -" प्लीज बाबा ऐका ना. माफ करा ना मला... "

बाबा -" बावळट.. तुला कळत नाही का??? बाहेर जा.. "

पूजा त्यांच्या पाय घट्ट पकडून कपाळ पायावर टेकवत म्हणाली.

पूजा -" प्लीज प्लीज बाबा... माझं कोणीच नाही इथे... प्लीज... "

सगळ्यांना तिची कीव येऊ लागली. का भोगत आहे ती हे सगळं...

बाबा -" तुला एकदा सांगितलेलं कळत नाही का?... माझी पोरगी तर माझ्यासाठी कधीच मेली.. "

एवढं ऐकुन पूजा रडतच बाहेर पळत गेली. रचना आणि रवी तिच्या मागे पळत गेले. अर्णवला मात्र त्यांचा खूप राग आला. म्हणून तो बोलू लागला.

अर्णव -" का? असं काय केलं तिनं की तुम्ही तिचा एवढा तिरस्कार करता? तुमची मुलगी ना ती!"

बाबा -" तू कोण? हा आमच्या कुटुंबाचा प्रश्न आहे... "

अर्णव -" मी तिचा एक असा मित्र आहे की तिला असले कर्म भोगताना पाहू शकत नाही. "

बाबा -" ऐक.. तू कोणीही असो. तू ही बाहेर जा. "

अर्णव - " नाही जाणार आम्ही.. का तुम्ही असं वागता तिच्याशी?"
न राहून ते बोलू लागले.

बाबा -" कोणत्या बापाची पोरगी सिगरेट, दारू पीत असते?"

अर्णव -" हं. ??"

बाबा -" मी विचारतो की कोणत्या बापाची पोरं इतकं दारू आणि सिगरेट पीत असतात?"

अर्णव -" म्हणजे?"

बाबा -" लहानपणापासून मी तिला नाजुकश्या फुलासारखं जपले होते. एकलुती एक होती ती. कोणत्याही गोष्टीची कमी पडू दिली नाही. जसं जशी ती मोठी होत गेली तसं तशी ती माझ्यापासुन दुर होत गेली. जेंव्हा मला कळालं की ती राहुल नावाच्या एका मुलाशी लग्न करू पाहत आहे. तेंव्हा मला लक्षात आले कि ती तर माझ्यापासून खूपच दूर गेली आहे. तिच्या रूम मधून सिगरेटचे पाकीट सापडले, काय वाटले असेल मला एक बाप म्हणून कधी विचार केलाय... कॉलेजमधून कळालं की ती ड्रग्ससुद्धा घेऊ लागली होती. एवढं सगळं असून सुद्धा मी काहीही करू शकत नव्हतो. मग शेवटी अशी वेळ आली की ती घर सोडून पळून गेली. तीने हा सुद्धा विचार केला नाही की पुढच्याच दिवशी माझा वाढदिवस होता. सकाळी उठताच मला एक चिठ्ठी सापडली ‘ मला शोधू नका, जर शोधायचा प्रयत्न केलात तर माझं मृत शरीर तुम्ही पहाल. ’ ती मला एकटी सोडून निघुन गेली. "

अर्णव -".. तुम्ही तुमच्या परीने विचार केलात की ती अशी वागली, तशी वागली. पण तुम्ही एक विचार करायला विसरलात. तुम्ही कधी विचार केला का ती अशी का वागली?"

बाबा -" का?"

अर्णव -" तुम्ही बिझनेसमध्ये व्यस्त होता. मान्य आहे की तुम्ही तिच्यासाठीच काम करत होतात. त्या कामामध्ये तुम्ही हे विसरलात की तिला सुद्धा एकटं वाटत असेल ना? तीने का राहुल नामक एका मुलाशी लग्न करत असलेली गोष्ट तुम्हाला नाही सांगितली? "

सगळे अगदी शांत होऊन त्याच्याकडे पाहत होते.

अर्णव -" ती एक अशी मुलगी आहे की तुमची साथ न मिळाल्याने अगदी दुःख गिळून एकटीने दिवस काढले आहे. कोणतीही मुलगी आपल्या बाबाची साथच मागत असते. पण जेंव्हा ती मिळत नाही मग ती कोणत्या ना कोणत्या माणसामध्ये तिचा साथीदार शोधत असते. राहुल नामक तिला साथीदार मिळाला खरा पण तो चुकीचा चॉइस ठरला. त्याच्यामुळेच तिला वाईट गोष्टींच्या सवयी लागल्या. पण म्हणतात ना की प्रेमामध्ये सगळे आंधळे होतात. तीचं सुद्धा असच झालं. ती प्रेमात आंधळी होऊन तो जे म्हणेल तेच करत होती. जेंव्हा तो सोडून गेला तेंव्हा तिच्याकडे ना बाबाची छाया होती ना आईची माया, ना प्रियकराचे प्रेम... असल्या मनःस्थितीत

ती हारली नाही, तीने तुम्हाला कित्येक वेळा कॉल केला होता पण तुम्ही तर तुमच्याच रागात होतात. एवढं राग सुद्धा काय उपयोगाचा जो आपल्याच मुलीला दूर ठेवेल. "

बोलता बोलता त्याच्या डोळ्यात अश्रु कधी आले हे त्याला सुद्धा कळलं नाही.

अर्णव -" प्रत्येक दिवशी ती जेंव्हा उठत असते ना त्या दिवशी ती तुमची कशी माफी मागावी याचाच विचार करत असते. प्लीज, माफ करा तिला. "

तिच्या बाबानां आता रडु कोसळलं. त्यांना कळून चुकलं की आपण सुद्धा पूजाशी थोडोसे चुकीचं वागलो. ते रडत रडत त्याला म्हणाले.

बाबा -" कुठं... कुठं आहे माझी पूजा?"

रवी आणि रचना दोघंही बाहेर जाऊन पाहू लागले. खूप वेळानी ते परत आले.

रवी -" अर्णव.... अर्णव... पूजा बाहेर दिसत नाहीये"

अर्णव - " काय?... ????"

रचना -" हो... पूर्ण हॉस्पिटल शोधलं पण ती कुठेच दिसत नाही. "

बाबा -" कुठं... कुठं गेली माझी पोर... "

अर्णव -" रवी... चल गाडी काढ ती घरी गेली असेल... रचना तू इथेच अंकल सोबत थांब. आम्ही तिला शोधायला जातो काही कळालं तर नक्कीच आम्ही कळवतो. "

रचना -" हो... नक्की कळवा.. "

रवी आणि तो गाडीमध्ये बसले आणि थोड्यावेळात ते घरी पोहचले. पण घराला कुलूप होती. शेजारी विचारल्यावर कळाल की ती घरी आलीच नाही. गेली तर कुठं ही...

अर्णव -" रवी... तू गाडी घेऊन तुमच्या घरी जा तिथे असेल तर मला लगेच कळव. मी ऑफिसमध्ये चेक करतो. "

रवी -" ठीक आहे. काळजी घे... "

रवी गाडी काढून त्याच्या घरी निघाला. तो ऑटो घेऊन ऑफिसला निघाला. ऑफिसमध्ये गेल्यावर कळालं की ती तिथं पण नाही आलेली. गेली कुठं ही पोरगी...

हे मात्र तो विचार करू लागला. पूजा जर दुःखीत असेल तर ती एकाच ठिकाणी गेली असेल.

संध्याकाळची वेळ होत होती. तो त्या ठिकाणी पोचला. नाव होत " नाईट पार्टी क्लब... " तो आत शिरताच एका टेबलावर त्याला पूजा दिसली. टेबलावर कमीत कमी १० ग्लासेस मोकळे पडले होते. एका हातात सिगरेट आणि एका हातात दारूचा ग्लास ती घश्यात मोकळी करत होती. का असं करत आहे ती? अस विचार तो करत होता..

तिच्या पुढील खुर्चीवर बसत तो म्हणालो.

अर्णव -" पूजा... तू काय करत आहेस?"

पूजा पूर्ण नशेत होती. ती वर पाहत म्हणाली.

पूजा - " ओ.... हाय अर्णव. बघ मी किती खुश आहे ते "

ती हसू लागली.

अर्णव - " काय चाललय तुझं पूजा?"

पूजा -" तुला माहिती अर्णव. माझी लाईफ म्हणजे एक कॉमेडी झालीय. कोणीही येत आणि कोणीही जात. "

ती हसू लागली. हसत हसत मधेच ती रडु लागली.

पूजा -" अर्णव. यार.. मी पूर्णपणे तुटलीय अर्णव... "

अर्णव -" काहीही झालेलं नाहीय पूजा... चल बघू घरी... "

ती परत हसत त्याला म्हणू लागली.

पूजा - " ओह. गोड अर्णव.... तू खूप चांगला आहेस... का... म्हणजे का तू माझ्या लाईफ मध्ये आहेस?"

अर्णव -" म्हणजे?"

पूजा -" जो कोणी माझ्या आयुष्यात येतो ना... तो कधी माझ्या आयुष्यातून लांब होतो मलाच कळत नाही. "

ती खूपच नशेत होती. त्याची नजर इतरत्र गेली. त्या क्लबमध्ये बाकीचे लोक फ्लोअर वर नाचत होते. बहुतेक सगळे त्याच्याच वयातील होते. मग त्याच लक्ष काही मुलांवर गेलं जे पूजाला वाईट नजरेने पाहात होते. तेवढ्यात पूजा म्हणाली.

पूजा - " हे... स्वीटू अर्णव. चल नाचू.. "

अर्णव -" नको नको... "

पूजा -" चल रे तू.. "

एवढं बोलून ती फ्लोअर वर गेली आणि नशेत नाचू लागली. तो लांबूनच तिला नाचताना पाहत होता. तीने नाचताना तिच्या अंगावरील ओढणी काढून त्याच्याकडे फेकली. ती अशी नाचत असताना आजूबाजूची मुले तिला चिटकून नाचू लागले. तुम्ही जिच्यावर प्रेम करता तिला तुम्ही या अवस्थेत पाहू शकणार नाही, अश्या अवस्थेत ती होती. तिला पाहून त्याला वाटतं होतं की का... का आयुष्य तिच्यासोबत असं खेळत आहे?. ती मुले तिला नको त्या ठिकाणी स्पर्श करत होते. ते पाहून तो लगेचच उठून तिच्याजवळ गेला. तिचा हात धरुन परत त्यांच्या टेबल जवळ असलेल्या खुर्ची वर तिला बसवले. ती खुर्चीवर बसताच म्हणाली.

ती -" काय यार स्वीटू अर्णव... मज्जा येत होती ना.. "

एवढं बोलून ती टेबेलावरचे सगळे ग्लास परत चेक करत होती. तिला कुठल्याही ग्लासमध्ये दारू न सापडल्याने ती वेटरला बोलवली.

पूजा -" वेटर.. अजून एक ग्लास आण. "

अर्णव -" पूजा. खूप झालं आता. चल... "

पूजा -" अरे... अभी तो पार्टी शुरू हुई है... "

तो रागात येऊन वेटरला म्हणाला.

अर्णव -" वेटर... दोन ग्लास आण... "

पूजा -" का?"

अर्णव -" आज मी पण पिणार... बघू काय आहे यात... "

पूजा -" तू आणि पिणार... "

ती जोरात हसू लागली.

अर्णव -" बघू की.. "

वेटर दोन ग्लास घेऊन आला. तो नाक बंद करून एका घुटमध्ये अख्खा ग्लास संपून टाकला. पूजा त्याच्याकडेच बघत होती आणि नशेत हसत होती.

अर्णव -" वेटर... अजुन एक ग्लास आण... "

एक ग्लास, दोन ग्लास करत करत ६ वा ग्लास व्हिस्कीचा पिऊ लागला. पूजा त्याच्याकडे पाहत होती. पण आता मात्र सीरियस होऊन बघत होती.

पूजा -" हे हे... अर्णव. ठीक आहेस ना?"

तो आता पूर्ण नशेत होता.

अर्णव -" बघ... पिऊन दाखवलं ना... "

पूजा अडखळत त्याला म्हणाली.

पूजा -" का... का करत आहेस असं?"

तो ग्लास मधला शेवटचा घोट घेऊन ग्लास ठेवत जोरात म्हणाला.

अर्णव -" कारण.... कारण.. मी तुझ्यावर प्रेम करत आहे वेडी... "

पूर्ण क्लब शांत झाला होता. पण तेवढ्यात ती टेबलावर कोसळली. क्लबमधले सगळे त्याच्याकडे पाहत होते, पण तो मात्र तिच्या कडेच पाहत होता. त्याला आजूबाजूचे सगळे लोक गिरकी घेत असलेले जाणवू लागलं. इकडे तिकडे बघावे, तर पूर्ण क्लबच चक्कर खात असलेले त्याला जाणवलं. त्याच्या शरीरावर त्याचाच ताबा नव्हता. त्यानंतर त्याला डोकं जड वाटू लागलं. अचानक त्याचाही तोल गेला आणि तो पण कोसळला.

जेंव्हा त्याचे डोळे उघडले, तर त्याला ५ मिनिट काही कळलच नाही की तो कुठं आहे. मात्र नंतर त्याला कळाल की तो रवीच्या घरी आहे. तो बेडवर उठून बसला असता, त्याला त्याच्याजवळ पूजा झोपलेली दिसली. त्याने जेंव्हा बेडवरून उठण्यासाठी खाली पाय ठेवला तेंव्हा त्याच डोकं दुखु लागलय असे त्याला जाणवले. बेडरूम बाहेर गेला तर तिथं रवी आणि रचना दोघेही बसले होते. बाहेर जाताच ते त्याच्याकडे असे पाहत होते की तो एखादा गुन्हा करून जेलमधुन आत्ताच बाहेर आलाय.

अर्णव -" शुभ सकाळ.... "

रचना -" काल कुठं होतास?"

तो अजुन डोक्याला हात लावत सोफ्यावर बसला.

रचना -" बोल कि, काल कुठे होतास? "

रचना अजुन जरा भडकली.

अर्णव -" मी क्लबमध्ये होतो. "

रचना -" का गेला होतास तिथे?"

अर्णव -" म्हणजे?"

रवी -" म्हणजे? का गेला होतास तिथे?"

अर्णव -" कारण तिथे पूजा होती मी तिला घ्यायला गेलो होतो. "

रचना -" पूजा तिथे काय करत होती?"

अर्णव -" ती दारू पीत होती. "

रचना -" मग तू तिथे नशेत कसा काय सापडलास? "

रचना आणि रवी दोघे त्याच्यावर भडकले होते.

अर्णव -" मी सुद्धा थोडी घेतली, तिच्या बरोबर. "

तो जरा लाजिरवाणी स्वरात म्हणाला.

रचना -" का?"

अर्णव -" काय करणार मी तर.. ती ऐकायलाच तयार नव्हती. ती खूप मनातून तुटली होती आणि ती दुसऱ्या मुलांसोबत डान्स करत होती आणि ती मुलं तिच्या शरीराला नको तिथे हाथ लावत होते. "

रचना -" म्हणून तू पण पिलास??... "

अर्णव -" तिला शांत करायचा हा एकच पर्याय उरला होता. "

रचना -" पण का?. का असं करत आहेस?.. तिला जाऊ देत ना... "

अर्णव -"मी प्रेम करतो तिच्यावर.. रचना... "

रवी -" मग पुढं ती असचं ड्रिंक करत राहिली तर, तू पण ड्रिंक करणार???"

अर्णव -" हो.. मी पण तिच्यासोबत ड्रिंक करणार.... जेंव्हा ती स्वतः हुन म्हणेल की बास झालं अर्णव चल आता जाऊयात.. तेंव्हा मग मी ही तिच्यासोबत जाईन.. "

रचना -" वेडा.. वेडा झालास तू अर्णव... "

रवी -" ते काहीही असो. अर्णव ती अजुनसुध्दा उठली नाही. परत काही नवीन तर नाही झालं ना?"

रचना -" हो खरंच... "

हे असं त्यांचं बोलणे चालू असताना पूजा बेडरूममधून डोक्याला हात लावून बाहेर आली.

पूजा -" हे. तुम्ही सगळे इथे? गुड मॉर्निंग.. "

रचना -" हाय पूजा.... तू बरी आहेस ना?"

पूजा -" थोडं डोक दुखत आहे.. आणि माफ करा काल खूपच झालं होतं.. "

रचना -" तुझ्यामुळे काल अर्णवने पण ड्रिंक घेतले, कधी नव्हे ते. "

रचना जरा रागातच म्हणाली.

पूजा -" माफ कर यार अर्णव. पण का ड्रिंक केलंस तू काल?"

अर्णव -" माझा एक वसूल आहे. सगळं काही करून पहायचं. त्यात ड्रिंक करायच पण होत. "

त्याने काहीतर कारण सांगून वेळ मारून नेली.

अर्णव -" आणि ते सोड. काल तुझे वडील तुला बोलवत होते. "

पूजा -" ओह.. खरंच???... "

अर्णव -" हा... हे सांगण्यासाठी तर मी तुझ्याकडे आलो होतो. "

पूजा -" ओह..... "

ती इतकी खुशीत होती की तिने अर्णवला मिठीत घेतले. त्याला ४४० वॉल्टचा करंट बसला असे त्याला वाटून गेले. त्याला असं वाटत होत की अख्खं जीवन तिच्या याच मिठीत काढावं. ती आज खूप खुशीत होती. तिच्या त्या चेहऱ्यावर वेगळेच तेज आले होते. तिच्या त्या ओठावरची स्मित आणण्यासाठी अर्णव काहीपण करू शकत होता. हसताना अचानक तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले.

रचना -" आता का रडत आहेस??"

पूजा -" आज खूप वर्षातून मी माझ्या बाबांना भेटणार आहे..... तुम्ही खूप काही केलंय माझ्यासाठी, तुमचं ऋण मी कसं फेडू? "

रचना -" हे. आम्ही मित्र आहोत तुझे. किती मोठं गोष्ट करत आहेस तू?. आणि सगळं काही अर्णव केलय त्यांनीच तुझ्या बाबांना समजवलं मगच त्यांनी तुला माफ केले. "

पूजा -" अर्णव. तू माझा खूप चांगला मित्र आहेस.. "

एवढं बोलून परत तीने त्याला मिठी मारली. पण तीचं हे मिठीत घेणं त्याला वेगळ्याच विश्वात नेत होतं. तिच्या मनात तो एक फक्त मित्र म्हणून होता.. बाकी काहीच नाही.. बहुतेक त्याचं प्रेम तिला कधीच दिसलं नाही..

पूजा -" बरं.. तू काल क्लबमध्ये मला काहीतरी मोठ्यांनी म्हणालास का?"

त्याला कळून न कळल्यासारखं वागत होता.

अर्णव -" नाही.. तुला भास झाला असेल.. "

पूजा -" बहुतेक भासच झाला असेल.. "

रचना आणि रवी हे दोघे गप्पच त्याच्याकडे पाहत होते.

पूजा -" मी आज खूप खुशीत आहे.. रवी मी इथं फ्रेश झाले तर चालेल का?... "

रवी -" हो.. का नाही?... "

पूजा -" पण कपडे??"

रचना -" काळजी नको.... माझे कपडे घालू शकतेस... "

पूजा -" ओह... मी खूप वाट बघत होते आजच्या दिवसाची, बाबांना भेटण्याची आणि तो दिवस आलाच. आता सगळं काही चांगलं होईल... "

ऐवढे बोलून ती अंघोळीला गेली. रचना अर्णवजवळ येऊन म्हणाली.

रचना -" हे अर्णव, बरा आहेस ना?"

रवी - " कसा असेल तो रचना. अर्णव जाऊ देत ना यार.... या मुलीला तुझ्या प्रेमाची कदर नाहीये. ती फक्त तुझा उपयोग करत आहे. कसं कळत नाहीय तुला??... "

अर्णव -" रवी यार... तिच्यासाठी मी काहीही करू शकतो. भले तिला माझं प्रेम दिसो अथवा ना दिसो... "

रवी -" अरे पण... "

अर्णव -" जाऊदेत ना यार.. ती खुश आहे ना.. बसं झालं. चला हॉस्पिटलला जावं लागेल. पूजा आज तिच्या बाबांना भेटणार आहे... "

रवी आणि रचना त्याच्याकडे पाहत होते. पूजा फ्रेश होऊन बाहेर आली. ते सगळे हॉस्पिटलला निघाले. काही मिनिटात ते हॉस्पिटलला पोहचले. पूजा अगदी वेगाने जिथे तिचे बाबा होते, त्या वॉर्ड मध्ये गेली. त्यांना नुकतेच आय सी यु तून वाॅर्ड मध्ये हलवले होते, ते अजुन झोपले होते. ते तिघेसुद्धा तिथे आले. पण

अर्णवने इशारे करून रचना आणि रवीला मुद्दामच बाहेरच थांबायला सांगितले. पूजा बेडजवळच्या खुर्चीवर बसली. तिच्या डोळयातून अश्रू आले. ते म्हणतात ना की बाप लेकीचे नातच वेगळं असतं.

पूजा -" बाबा.... बघा तुमची पूजा आलीय. "

बाबानी डोळे उघडले.

बाबा -" पूजा.... "

ते सुद्धा गडबडीत बेडवरून उठू लागले. तीने त्यांना उठण्यासाठी आधार दिला..

पूजा -" बाबा सावकाश.... "

बाबा -" पूजा.... बेटा किती महिने झाले गं तुला बघून... "

एवढं बोलून त्यांच्याही डोळयातून अश्रू आले आणि ते पूजाच्या डोक्यावरून हात फिरवू लागले. फिरवता फिरवता त्यांनी तिच्या कपाळावरून, तोंडावरून पण हात फिरवला. ममतेने हात फिरवताना त्यांना गहीवरून आले.

पूजा -" माफ करा बाबा.. मी तुम्हाला सोडून गेले.. माफ करा मला. "

बाबा -" विसर गं, जे झालं ते. तू आलीस ते खूप झालं.... "

पूजा -" बाबा.... माफ केलंत ना मला???"

बाबा -" अगं बाप आहे तुझा... माफ कसं नाही करणार?.. "

रडत रडत ती जरा हसली.

बाबा - " तुझे ते मित्र कुठे आहेत??.. "

पूजा -" बाहेर आहेत ना... अरे या ना... "

तिघेही बेडजवळ आले.

बाबा -" तुम्हा सगळ्यांना धन्यवाद. तुम्ही नसता तर मला माझी मुलगी परत नाही मिळाली असती. "

अर्णव -" अहो... असं का म्हणता.. ?"

ते जरा भावुक आवाजात म्हणाले.

बाबा – “ सहजच.. ”

पूजा त्यांच्या चेहऱ्याकडे पाहत विचारली.

पूजा -" बाबा.. काय झालं??"

बाबा -" काही नाही गं... "

पूजा -" मग असं का म्हणालात तुम्ही?"

बाबा -" असंच ग... "

पूजा -" खरं सांगा बाबा काय झालं?... तुम्हाला माझी शप्पथ... "

बाबा अगदी दुखित म्हणाले.

बाबा -" माझ्याकडे आता खूप कमी वेळ उरलाय... "

पूजा -" काय?"

अर्णव -" कसं शक्य आहे... तुम्हाला अटॅक आला होता... "

बाबा -" हो.. माझ्या ह्रदयात एक मोठी गाठ आहे. ती आता मोठ होत आहे.. त्यामुळे कधीही माझं ह्रदय थांबू शकत.. "

पूजा आता रडू लागली. ती बाबांचं हात आपल्या हातात घेत म्हणाली.

पूजा -" काही होणार नाही तुम्हाला... "

बाबा -" अग. डॉक्टर स्वतः म्हणत आहेत. माझी फक्त एक शेवटची इच्छा आहे... "

पूजा -" काय?"

बाबा -" मला तुझं लग्न झालेलं बघायचं आहे.. जेंव्हा ते होईल मग मी मरायला मोकळं... "

पूजा -" असं का म्हणता बाबा. काही नाही होणार तुम्हाला... "

बाबा -" प्लीज पूजा.... करशील ना माझी शेवटची इच्छा पूर्ण. "

पूजा आता विचार करू लागली. काहीतरी निर्णय घेऊन डोळे पुसत म्हणू लागली.

पूजा - " बरं बाबा.. मी करणार तुमची शेवटची इच्छा पूर्ण.. तुम्ही ज्या मुलाशी म्हणाल त्या मुलाशी मी लग्न करणार. मी वचन देते "

रचना आणि रवी एकदमच अर्णवकडे पाहू लागले.... बाबा तर अगदी खुशीत होते. पण दुःखी होता फक्त एक जण, तो म्हणजे अर्णव.

' खूप दिवसांनी पूजाच्या त्या चेहऱ्यावर हसू उमटलं होत. खूप वर्षांनी तिला बाबा भेटले होते. सगळं काही ठीक होणार होत. खरंच सगळ ठीक होणार होत? मग माझ्या त्या प्रेमाच काय? पण काहीही असो ती खुश आहे ना, मग मी पण खुश... ' असे विचार अर्णवच्या मनात येत होते.

न कळत त्याच्या डोळयातून अश्रू येऊ लागले. का? माहिती नाही. कदाचित ती दुसऱ्या कोणाची तरी होणार होती. हृदयात अचानक त्याला पोकळी जाणवू लागली.

अर्णव - " चला. मी जातो. "

पूजा -" कुठं चाललास?"

अर्णव -" मला ऑफिसच काही काम आहे. तिथे जावं लागणार... "

रवी -" अरे पण... "

रचना मधेच त्याला तोडत म्हणाली.

रचना -" अर्णव. खरंच तू जा. काम असेल तुला... "

रवी आणि पूजा तिच्याकडे पाहत होते. कदाचित रचनाला त्याच्या मनातील व्यथा समजली असावी. तो लगेचच तिथून निघाला. खोटं बोलून तर निघाला पण जाणार कुठे?. या हृदयाच्या वेदनांना घेऊन?

---

काय होणार अर्णव आणि पूजा या दोघांच्या त्या प्रेमाचं? अर्णवने तर आपल्या प्रेमापोटी तिला आधार दिला, पण तिला कदाचित तो आधार प्रेमाचा न वाटता एका मित्राची मैत्री वाटली असावी. ती तिच्या जागी बरोबर होती, तिला अर्णवाच्या त्या प्रेमाची जाण कदाचित जाणवली नसेल... त्यात तिचीही चूक नव्हती. कोणतीही व्यक्ती दुःखात असताना त्याला फक्त एका आधाराची गरज असते. त्या आधाराला प्रेम समजणं हे खूप अवघड असतं, कारण तो आपल्या दुःखाचा अंत पहात असतो.

संध्याकाळ होत आली होती. रवी आणि रचना अजुन हॉस्पिटलमध्ये होते. पूजा तिच्या बाबांसोबत गप्पा मारत होती. कित्येक दिवसांनी दोघे एकत्र गप्पा मारत होते.

बाबा -" बघंच पूजा तू. तुझं लग्न खूप मोठ्यांनी करू... संपूर्ण शहरातील अनेक मोठे लोक तुझ्या लग्नात येणार... "

पूजा -" अरे हो बाबा.. पण पहिला मुलगा तर मिळू देत... "

दोघेही हसू लागले. रवी हळू आवाजात रचनाला म्हणाला.

रवी -" मुलगा तर गेला आहे ऑफिसला... "

पूजा -" काय???.... काय म्हणालास??... "

रवी -" काही नाही. अर्णव ऑफिसला गेला आहे असं म्हणालो. "

बाबा -" अरे हो.. खूप उशीर झाला ना त्याला जाऊन.. "

पूजा -" हो. थांब त्याला कॉल करते. "

पूजा त्याला कॉल करू पाहते, पण फोन बंद लागत होता. परत एकदा प्रयत्न केल्यावर सुद्धा फोन बंद लागत होता.

पूजा - " अगं रचना... त्याचा फोन स्विच ऑफ लागत आहे... "

रचना -" कामात असेल गं... "

पूजा -" अगं पण एवढं उशिरापर्यंत काम कुठं असत, आपल्या ऑफिसमध्ये... "

रवी -" वेगळं काम असेल... "

पूजा -" नाही रे. खरंच खूप लेट झाला आहे. "

रवी -" बरं, बरं.. काळजी करू नका.... आम्ही जाऊन बघतो... "

रचना -" हो. तू काकांची काळजी घे. आम्ही बघून येतो. काही कळालं तर कळवते. "

रवी आणि रचना गाडीमध्ये बसून ऑफिसला निघाले.

रचना -" कुठं चाललोय आपण?"

रवी -" ऑफिसला.... तिथेच गेला असेल ना तो??"

रचना -" तो तिथे गेला नाहीये... "

रवी -" मग गेला कुठे तो?"

रचना -" मला माहिती नाही. पण आपल्या मनातलं दुःख लपवायला कुठेतरी एकांतात गेला असेल. "

रवी -" गेला कुठं असेल तो?"

संध्याकाळच्या त्या गर्दीमध्ये अर्णव कुठे असेल याची शोधाशोध रवी आणि रचना करत होते. अर्णवच्या घरी जाताच त्यांना कळाले की अर्णव तिथे आलाच नव्हता.

रचना -" कुठं गेला असेल हा बावळट?"

रवी -" फोन ट्राय कर एकदा... "

रचना एकदा फोन लावू करून पाहते पण फोन बंद होता.

रवी -" काय झालं?"

रचना -" स्विच ऑफ लागतोय... "

रवी -" अरे यार... "

रचना -" का? का करतात प्रेम लोक. जर प्रेम केल्यावर अशी स्थिती होत असेल तर या प्रेमाची मला गरज नाही. पहिला दोस्त व्हा. मग कोणी एक तुम्हाला प्रपोज करणार. जर त्या प्रेमाला कबुली दाखवली तर ठीक नाहीतर तो देवदास बनणार. "

रवीला काहीतरी आठवल्या झाल्यासारखं झालं.

रवी -" प्रपोज..... चल... "

रचना -" काय???... कुठं??"

रवी -" मला माहिती आहे रवी कुठं आहे ते... "

रचना -" कुठं?"

रवी -" तू गाडीत बस तर... "

रचना गाडीत बसताच रवी गाडी मागे वळवली. अर्धा एक तासात ते बीच वर पोचले. तिथेच जिथे अर्णव पूजाला प्रेमाची कबुली देणार होता. पण त्यावेळी तिला फोन आल्याने त्याला त्याच्या प्रेमाची कबुली देता आली नव्हती. बीच तर अगदी शांत होता. फक्त बोटावर मोजण्याइतके लोक तिथं होते. रचना आणि रवी दोघंही

तिथे अर्णवला शोधू लागले. थोडे पुढे जाताच त्यांना त्याच हॉटेलमध्ये एक पार्टी चालू असताना दिसली. तिथे गेल्यास तिथे अर्णव नसल्याच त्यांना जाणवल. त्या हॉटेलमधून बाहेर येताच त्यांना समुद्राच्या वाळूत कोणीतरी एक इसम अर्णवसारखा दिसला. रचना आणि रवी पळतच त्याच्याजवळ पोहचले. तो इसम पोटावर झोपलेला होता. त्याच्याजवळ २ ते ३ दारूच्या बाटल्या पडलेल्या होत्या. त्यांना तो अर्णव असावा अशी शंका आली.

त्या बरोबर रवीने त्याला पलटवण्याचा प्रयत्न केला. पण तो खूप नशेत होता. त्याला पलटल्यावर कळालं की तो दूसरा तिसरा कोणी नसून तो तर अर्णव आहे. शंकेचे निरसन झाले पण नवीन संकट उभे राहीले. रचना त्याला उठवण्याचा प्रयत्न करू लागली.

रवी -" मला माहिती होतं. तो इथेच सापडेल. "

रचना -" अर्णव.. अरे अर्णव... उठ.. "

रचना त्याच्या गालावर मारत उठवू लागली. अर्णव डोळे उघडून दोघांना पाहिला आणि हसत म्हणाला.

अर्णव -"अरे.. तुम्ही दोघं इथं काय करताय??"

रचना -" तुला घ्यायला आलोय... "

अर्णव -" अरे.. तुम्ही पण बसा इथं. अे रवी एक बॉटल व्हिस्की आण. सगळे सेलिब्रेट करूयात... "

रवी -" कसले सेलिब्रेशन?"

अर्णव -" अरे असं का म्हणतोस? माझं प्रेम मला मिळत नसलेलं सेलिब्रेशन. कित्येक लोक प्रेम मिळाल्यावर सेलिब्रेट करतात. पण मी प्रेम न मिळाल्याने सेलिब्रेट करतोय. '

अर्णव जोरजोराने हसू लागला. हसत हसत अचानक तो रडु लागला.

अर्णव -" यार रचना.. हृदयात कसं तर होत आहे ग. का जगतोय मी असा?.. का केलं मी प्रेम. ? खरंच यार दुसरासोबत तिला बघणं, नाही सहन होणार माझं नशीबच खराब आहे.. "

तो डोळे पुसत म्हणाला.

अर्णव -" काही पण असु देत. ती खुशीत राहिली पाहिजे.... ती खुशीत राहिली पाहिजे. ती खुशीत राहिली पाहिजे... "

असं म्हणत तो खाली कोसळला. रचना आणि रवीने त्याला पकडले.

रवी -" यार.. असं का झालं. चल रचना घेऊन जाऊ आपण याला. "

रवीने लगेच कारकडे जाऊन बीच वर गाडी आणली. दोघेनी मिळून अर्णवला उचलून गाडीत बसवले. तो नशेत बडबडत होता " ती खुशीत राहिली पाहिजे... "

रवी गाडी चालवू लागला. रचना अर्णवसोबत मागच्या सीटवर बसली होती.

घर आल्यावर रवी गाडी थांबवली. दोघेही अर्णवला घेऊन घरात गेले. बेडरूमला जाण्यासाठी त्यांना जिना चढावा लागणार होता. ते दोघेही अर्णवचा हात खांद्यावर घेऊन वर जाऊ लागले. बेडरूममध्ये जाऊन त्यांनी अर्णवला झोपवले.

दोघांना अर्णवची दया येऊ लागली. रचनाने अर्णवच्या पायातले बूट काढले आणि पंखा चालू केला. रचना आणि रवी दोघेही आता दमले होते. पण दोघांना पूजा ची काडीमात्रची पर्वा नव्हती. तेवढ्यात रचनाला फोन आला. फोन बघताच तिला कळाले की पूजा तिला कॉल करत होती. रचनाने फोन उचलला.

रचना -" हॅलो... "

पूजा -" हॅलो रचना.. अर्णव कुठं आहे? काही कळालं का??.. "

रचना -" अरे हो... तो ओव्हरटाईम करत होता ऑफिसमध्ये आणि फोनची बॅटरी लो झाली म्हणून स्विच ऑफ दाखवत होता. "

पूजा -" ओ.. अरे देवा.. मी खूप घाबरले होते... त्याला फोन दे की... "

रचना -" अगं तो खूप थकला होता. म्हणून लवकरच झोपी गेला.. "

पूजा -" ओ. खरच?... झोपू देत.. "

रचना -" ह्म्म... काका कसे आहेत??.. "

पूजा -" बरे आहेत आता. चल बाय.. उद्या ऑफिसमध्ये भेटू... गूड नाईट... "

रचना -" गूड नाईट... "

फोन कट करून ती रवीकडे पाहत म्हणाली.

रचना -" पूजाचा कॉल होता... "

रवी -" मग तिला खोटं का सांगितले.. "

रचना -" मग काय सांगू तिला... की अर्णव तिच्यामुळे दारू पिऊन पडला होता बीचवर म्हणून... "

रवी खाली पाहू लागला. रचना परत म्हणाली.

रचना -" हे बघ.. कोणतीही अपेक्षा न ठेवता तो सगळं काही तिच्यासाठी केलं, पण त्याला काय मिळालं. दुःख?.. का??.. का सहन करत आहे तो?"

रवी -" प्रेम असंच असते... आंधळे... कधी कोण काय करेल सांगता येत नाही... "

रचना -" पण होणार काय याचे?"

रवी -" माहिती नाही... पण तो डायलॉग आहे ना... किसी चीज को तुम दिलं से चाहो तो पुरी कायनात उस्से तुम्हे मिलाने की कोशिश मै लग जाती है.... जर तो खरे प्रेम करत असेल तर त्याला ते प्रेम नक्की मिळेल... "

दोघेही अर्णवकडे पाहू लागले...

---------------------------------

पक्ष्यांच्या त्या किलबिलाटाने अर्णवला जाग आली. तो उठल्यावर त्याला त्याचे डोके जड वाटत होतं. का वाटू नये?. काल होताच तेवढ्या नशेत तो. त्याला काल जे काही झालं ते काहीच आठवत नव्हतं. तो बेडवरून उठला आणि हॉलमध्ये गेला. तिथे रवी आणि रचना ऑफिसला जाण्यासाठी तयार होत होते. अर्णव डोक्याला हात लावत म्हणाला.

अर्णव -" गूड मॉर्निंग गाईस... "

रवी आणि रचना त्याच्याकडे असं काही बघत होते कि त्याने खूप मोठा गुन्हा केला आहे. रचना त्यावर चिडूनच होती.

रचना -" काल कुठं होतास?"

अर्णव - " बहुतेक बीच वर होतो... "

रचना - " काय करत होतास?"

अर्णव मान खाली घालून म्हणाला.

अर्णव - " दारू पीत होतो. '

तेवढ्यात रवीचा फोन वाजला. रवी फोनवर बोलत बाहेर गेला.

रचना -" कसा निलज्ज आहेस तु, असं बोलताना काही पण वाटत नाही, चल तयार हो... ऑफिसला जावं लागेल. खूप लोड आहे कामाचा. "

अर्णव डोकं हलवून बाथरूमकडे गेला. रवी फोनवर बोलून परत आत आला.

रवी -" आपल्याला जावं लागेल. आज नवीन एच. आर. येणार आहे. "

रचना - " हम्म.. अर्णव आल्यावर जाऊयात. "

अर्णव लवकरच तयार होऊन परत आला. रचना, रवी आणि अर्णव सगळे कारमधून ऑफिसला निघाले.

रवी -" अर्णव... आपल्याला आता नवीन पोजेक्ट मिळणार आहे.. "

अर्णव खिडकी बाहेर पाहतच म्हणाला.

अर्णव -" हमम.. "

ऑफिस येईपर्यंत तो कुणाला काहीच बोलला नाही. ऑफिसमध्ये गेल्यावर जसिका म्हणाली.

जसिका -" हे... आता अर्ध्यातासात तुमची मीटिंग फिक्स झाली आहे. "

रवी -" आता लगेच... पण आम्हाला खबर नव्हती. "

जसिका -" हो... नवीन एच. आर घेणार आहे... तयार आहात ना?.. "

जासिका नेहमी प्रमाणे हसतच म्हणाली.

सगळे आपापल्या टेबलाजवळ गेले. पण अर्णवच मात्र कशातच लक्ष लागत नव्हते. कसे असेल? त्याच प्रेम त्याच्यापासून दूर जात होतं.

तेवढ्यात मुख्य दरवाजा उघडण्याचा आवाज आला. तिथून एक इसम एक बॅग आणि एक सुटकेस घेऊन येत होता आणि मागून या ऑफिसची नवीन एच. आर

आत आली. तिचे ते मोकळे सोडलेले केस, तिचे ते घारे डोळे बघितलं तर कोणी तरी घायाळ होणार हे मात्र नक्की. तिचे ते हाय हिल्स, तिची छोटी असलेली उंची थोडी का होईना मोठी करत होती, तिच्या मागोमाग दोघे फोनवर बोलत केबिनमध्ये गेले. ते लोक आत जाताच, जसिकाला फोन आला. तीने बोलून फोन ठेवला आणि म्हणाली.

जसिका -" हे गाईज... तुम्हा सगळयांना आत मीटिंगला बोलावलं आहे. "

रवी -" सगळ्यांना??"

रचना -" सगळे म्हणल्यावर सगळेच ना?"

अर्णव मात्र खूप उदास वाटत होता. त्याला मीटिंगबदल काडीचीही इच्छा नव्हती. सगळे बॉसच्या केबिनमध्ये गेले. आतले वातावरण खूपच गंभीर होता. मुख्य खुर्चीवर नवीन एच. आर बसली होती. ती मोबाईलमध्ये काहीतरी करत होती, तीच लक्ष या सगळयांवर येताच तिने त्यांना बसण्यासाठी खुण केली. सगळे आपापल्या खुर्चीवर बसले. फोनमधून डोकं बाहेर काढून ती उठली आणि सगळयांना उदेशून बोलू लागली.

" हॅलो गाईज. मी तुमची नवीन एच. आर प्रीती शर्मा.. दुर्देवाने तुमच्या ऑफिसमधील काम बघता बाकीच्या शाखेचे नी तुमच्या शाखेचे प्रॉफिटचे मार्जिन

मोठे आहे.. तुम्हाला सांगण्यात मला खेद वाटतं आहे की तुम्हा सगळ्यांचा या महिन्याचा पगार कट होणार आहे. "

सगळे एकमेकांकडे पाहू लागले. म्हणजे एक महिना पूर्ण विनापैसा काढणे म्हणजे अशक्य असं काम.

प्रीती -" तरीही या पुढे जर हीच प्रगती असेल तर नाईलाजाने मला तुम्हाला कामावरून काढावं लागेल... "

एवढं ऐकुन अर्णव आता बोलू लागला.

अर्णव -" एक मिनिट मॅडम.. सर्वात प्रथम या ऑफिसमध्ये स्टाफ खूपच कमी आहे आणि त्यामानाने प्रॉफिट चांगलाच आहे. १ महिनाच्या पगार तुम्ही बिंनधास्त कापा पण तेंव्हाच जर तुम्ही दिवसाचे ९ तासा पेक्षा कमी वेळ एका कॉम्प्युटरसमोर काढत असाल तर. आम्ही मानतो की आम्ही काही दिवसाची सुट्टी घेतली होती पण त्यासाठी तुम्ही १ महिनाच पगार काढू शकत नाही.. जर तुम्हाला माझं म्हणणं आवडलं नसेल तर बिंनधास्त मला काढून टाका.. "

एवढं बोलून तो तिथून उठून बाहेर गेला. प्रीती आणि सगळे त्याच्याकडे पाहत होते. रवी आणि रचना लगेच केबिनमधून उठून अर्णवच्या मागे गेले.

अर्णव त्याच्या टेबलावर असलेलं सर्व सामान भरू लागला.

रचना -" अरे अर्णव काय बोलून आलास??. "

अर्णव -" मग आम्ही या कंपनी साठी ९ तास देत असतो पण ती मात्र आपलं एक मात्र ऐकुन घेत नाहीत. "

तेवढ्यात जसिकाच्या टेबलावर असलेलं फोन वाजतो.

जसिका -" हॅलो.... येस मॅम... ओके मॅडम... "

जसिका फोन ठेवला आणि अर्णवच्या टेबलाजवळ येऊन म्हणाली.

जसिका -" तुम्हाला मॅडमनी केबिनमध्ये बोलावले आहे. "

रचना -" रिझाईन करायला बोलवत असेल... "

हे तिघे परत केबिनमध्ये आले. प्रीतीने त्यांना बसण्यासाठी इशारा केला.

प्रीती -" मिस्टर अर्णव.... ठीक आहे... तुम्ही खूप मेहनती आहात असं मैनेजेर सांगत होते. मी तुम्हाला एक संधी देते. पण मला या पुढील ३ महिन्यात प्राॅफिटचा चांगला मार्जीन दिसायला हवा, आहे कबूल "

रचना आणि रवीला आनंद झाला मात्र अर्णवच्या चेहऱ्यावरील एक रेषसुध्दा हलली नाही.

रचना -" थॅंक यू मॅडम.. "

प्रीती -" बरं.. कामाला लागा आता.. "

सगळे आनंदात केबिनबाहेर आले.

रचना -" चला. आता कामाला लागलं पाहिजे... आपल्याकडे फक्त ३ महिने आहेत.. "

रवी -". होईल चांगलं... "

सगळे आता जोरात कामाला लागले. अर्णवसुद्धा आता कामाला लागला होता. तो ब्रेकमध्ये सुद्धा कामच करत होता. कदाचित पूजाला विसरण्यासाठी तो कामात मग्न होत असेल.

संध्याकाळचे ६ वाजत आले होते. सगळे आपापले काम बंद करून घरी जात होते. रवी आणि रचनासुद्धा काम आटपून घरी जाण्याची तयारी करीत होते. रवी मोबाईलमध्ये काही मेसेजेस पाठवून रचना कडे वळला.

रवी -" चला... जायचं???... "

रचना -" हो खूप वेळ झाला आहे... "

अर्णव अजुन संगणकात काहीतरी काम करत होता.

रचना -" अर्णव. चल घरी जाऊ... "

अर्णव -" मला अजुन काम आहे.. तुम्ही जा मी आलोच काम पूर्ण करून... "

रचना -" अरे उद्या कर म्हणे. चल आता जावू या आणि पूजाच्या बाबांना सुद्धा बघायचं आहे.. "

पूजा हे नाव ऐकताच तो अजुनच मोठ्यांनी म्हणाला

अर्णव -" तुला कळत नाही का??. काम करून येईन मी... तुम्ही जा... "

रचना -" बरं.. तुझी इच्छा... पण बारमध्ये जाऊ नको म्हणजे झालं... "

रचना रागारागात बाहेर जाऊ लागली तिच्या मागे रवीसुद्धा जाऊ लागला. अर्णव मात्र कामात मग्न झालेला होता.

२ तास अधीक वेळ काम करून सुध्दा अर्णव मात्र कॉम्प्युटरमध्ये घुसून होता. काहींना काही करतच बसला होता. तेवढ्यात केबिनमधून प्रीती एकटी बाहेर आली. प्रीती अर्णवला अजुन काम करत असल्याचा पाहताच ती त्याच्याजवळ गेली आणि म्हणाली.

प्रीती -" सो मिस्टर अर्णव काम झालं नाही वाटत अजुन.. "

अर्णव आवाज ऐकुन थोडा दचकला.

अर्णव -" नाही मॅडम.. झालं..... "

प्रीती -" मग माझी वाट पाहत होतास काय??"

अर्णव -" नाही तस नाही.. मी आता जाणारच होतो... "

प्रीती -" अरे.. मस्करी करतेय. चल आपण सोबत जावू या... "

अर्णव -" मॅडम तुमचे पर्सनल सेक्रेटरी दिसत नाहीत.. "

अर्णव त्याचं काम आटपत म्हणू लागला.

प्रीती -" मी त्यांना वेळेवर पाठवते. मला सवयच आहे उशिरापर्यंत काम करायला. तुला पण सवय असेल??"

अर्णव -" नाही.. तुम्ही घातलेल्या कंडीशननुसार मला असचं काम करावं लागणार आहे.. "

प्रीती हसू लागली.

प्रीती -". छान. तुला कार चालवता येत?"

अर्णव -" हो... "

प्रीती -" चल मग माझ्या कार मध्ये. तू चालवं. आज मी खूप थकली आहे. "

प्रीती आणि अर्णव दोघेही पार्किंगमध्ये आले. अर्णवने गाडी पार्किंगमधून बाहेर काढली. प्रीती तिच्या बाजूला बसली. अर्णव गाडी चालवू लागला.

अर्णव -" मॅडम.. पत्ता?"

प्रीती -" ते तर तुला सांगतेच पण पहिला एका ठिकाणी जायचं आहे... तिथे चल... "

अर्णव -" कुठे??"

प्रीती -" चल तर तुला सांगते.. "

प्रीती तिला दिशा दाखवत होती. तो त्या दिशेने जात होता.

प्रीती -" बस आता लेफ्ट ला घे... "

डाव्या बाजूला वळताच अर्णवने गाडीला थांबवले. तो ते ठिकाण पाहून दचकला, कारमधून उतरला. कारण हे तेच ठिकाण होते, जिथे तो पूजाला प्रेमाची कबुली देणार होता.

प्रीती -" चल. "

अर्णव -" इथे???"

प्रीती -" चल तर चल... "

असं बोलत प्रीती अर्णवचा हाथ धरून त्याला बीचवर घेऊन जाऊ लागली. त्या शांत अश्या संध्याकाळच्या वेळी त्या समुद्राच्या बीचवर फक्त प्रीती आणि अर्णव हे दोघेच होते.

प्रीती -" चल बूट काढ?"

अर्णव -" मॅडम???"

आधीच तो हे ठिकाण पाहून उदास झालेला होता.

प्रीती -" बूट काढ म्हणले ना! तर काढायचं... "

अर्णव -" बरं... "

अर्णव बूट काढत होता आणि प्रीती हिल्स काढून त्या दोन्ही हील्सना खांद्यावर घेऊन थांबली. अर्णवसुद्धा बूट काढून तयार झाला.

प्रीती -" चल.... या ठिकाणी मोकळ्या पायांनी फिरायची मजाच वेगळी असते.. "

अर्णव-" ह्म्म्.. "

काहीवेळ दोघेही शांतपणे चालत होते. एकमेकांशी ते काहीच बोलत नव्हते. दोघेही त्या बीचवरच्या येणारी हवेची मंद झुळूक अनुभवत होते. जणूकाही ती हवा त्यांना काहीतरी सांगत असावी. कोणीतरी ही शांतता मोडायची होती म्हणून अर्णव म्हणाला

अर्णव -"तुम्ही कधी पासून इथे येत आहात?"

प्रीती -" काय म्हणालास तू?"

अर्णव -" मी म्हणालो की तुम्ही कधी पासून इथे येत आहात?"

प्रीती -" तू मला ‘तुम्ही’, म्हणत जाऊ नको बरं.. "

अर्णव -" पण तुम्ही माझे बॉस आहात?"

प्रीती -" ते ऑफिसमध्ये, बाहेर तू मला प्रीती म्हणू शकतोस.. "

अर्णव -" ह्म्... "

काही मिनिटे अशीच शांतपणे गेली.

अर्णव -" सांग ना... "

प्रीती -" काय?"

अर्णव -" तू कधी पासून इथे येत आहेस... "

प्रीती -" खरं सांगू का खोटं?"

अर्णव -" खोटं.. "

प्रीती -" आताच फर्स्ट टाइम मी इथे आले... "

अर्णव -" आता खरं.. "

प्रीती - " पहिल्यांदा... मी लहानपणी इथे बाबा सोबत आले होते... "

एवढं बोलून ती गप्प झाली. अचानक ती शून्यात पाहू लागली.

अर्णव -" मग?"

प्रीती -" मग इथे एक टपरी होती. त्या ठिकाणी मस्त चहा मिळत असे. त्या टपरीवर एक काका होते. ते रोज मला चहा सोबत बिस्किटे द्यायचे. पण... "

अर्णव -" पण?... "

प्रीती -" पण.. माझ्या वाढदिवसाच्या दिवशी जेंव्हा मी इथे परत आले. तेंव्हा ती टपरी बंद होती. का बंद होती???... काय झालं? माहिती नाही. पण मला असं वाटत होत की माझी लहानपणाची एक आठवणच या समुद्रात वाहून गेली आहे... "

प्रीती समुद्राकडे पाहत होती.

अर्णव -" ह्मम्... मग त्या आठवणीत इथे येतीस???"

प्रीती -" हा पण, नाही पण... "

अर्णव -" म्हणजे???"

प्रीती -" म्हणजे एका आठवणी साठी मी इथे येत नाही.. "

अर्णव -" मग अजुन कसली आठवण आहे इथली?"

प्रीती -" काही आठवणी, न आठवलेल्याच बरं... "

अर्णव -" पण त्याच आठवणी घेऊन तू इथे येत असशील. "

प्रीती -" ह्मम्म.. "

अर्णव -" मग सांग कोणत्या त्या आठवणी आहेत?"

प्रीती - " मी जेंव्हा दहावीत होते, तेव्हा माझं शिक्षण इथल्या जवळच्याच शाळेत झालं. माझ्या क्लास मध्ये एक मुलगा होता.. रोहित नाव होतं त्याच... "

प्रीती पुन्हा शांतपणे समुद्राकडे पाहत होती. तिच्या चेहऱ्यावर एक वेगळीच स्मित पसरलेली होती.

अर्णव -" ओह गूड... मग?"

प्रीती -" आमची दिवाळीची सुट्टी सुरू होणार होती. शाळेत शेवटचा पेपर होता. मी या बीच वरून जात होते. तो माझ्या मागून सायकलवरून येत होता. अचानक तो मला थांबवून घेतले. मला अचानक काय झालं कळालच नाही. तो म्हणाला ' मला तुला काहीतरी सांगायचं आहे. ' मी बोल म्हणण्याचा अगोदरच तो म्हणाला ' प्रीती.... आय लाईक यू... तुझे ते घारे डोळे मला खूपच घायाळ करत असतात... तुझी ती गोड स्माइल माझ्या हृदयाच्या अगदी खोलवर जात असते. प्लीज.. माझं प्रेम स्वीकार कर... ' एवढं बोलून तो गुढग्यावर बसला आणि मला गुलाब देऊ लागला. मी खूप घाबरले होते. काय करू काय नको असं झालं होतं... परत माझी ही स्थिती बघून तो पुन्हा म्हणाला ' घाबरु नकोस... तुझं उत्तर मला दिवाळी संपल्यावर सांग.. पण नक्की सांग. ' एवढं बोलून तो माझ्या हातात गुलाब देऊन गेला. मी त्याच्या पाठमोऱ्या आकृती कडे बघत होते. "

अर्णव -" इंटरेस्टिंग... मग पुढे??.. तू काय उत्तर दिलेस.. "

प्रीती -" मी त्या दिवसापासूनच मनाने त्याचीच झाले होते. रात्री झोप येत नसे. माझी दिवाळी कशी गेली हे सुद्धा मला कळालं नाही. मी अक्षरशः आरश्यात पाहून लाजत होते. ती वेळच तशी होती किंवा ते वय तसंच होत, माहिती नाही, पण मस्त वाटत होती ती फिलिंग. मी कधी एकदा त्याला भेटते आणि त्याला होकार देत असं झालं होत. जेंव्हा माझी शाळा सुरू झाली, तेंव्हा मी त्याला इथेच भेटून होकार दिला होता. तो तर पार वेडाच झाला होता. मग आम्ही एकत्र शाळेत जायचो. कधी कधी

तर आम्ही शाळा चुकवून फिरायला जायचो. मग असेच दिवस जात होते. थोड्याच दिवसात बोर्डाची परीक्षा सुरू होणार होती. "

अर्णव - " मग?"

प्रीती -" मग काय... लागले सगळे अभ्यासाला आणि शाळेत सगळे गंभीर झाले, त्या सगळ्यात आम्ही पण होतो. परीक्षा सुरू होण्याच्या अगोदर काही दिवस रोहित शाळेला आला नाही. मला वाटल अभ्यास करत असेल. मी रोज शाळेत यायचे. पण तो मात्र काही येत नव्हता. मग मला खूप भीती वाटू लागली. काही झालं तर नसेल ना???... त्या टेन्शनने माझं अभ्यासात लक्ष लागत नव्हतं. परीक्षा सुरू होण्यासाठी अजुन दोन दिवस होते. अचानक माझी मैत्रीण मला एक पत्र देऊन गेली. ते त्याचेच पत्र होते. त्यात त्याने निरोप पाठवला होता की ' प्लीज आज मला बीच वर येऊन भेटशील काय?'.... मग मी अचानक खूप खुश झाले. कित्येक दिवस त्याला बघितले नव्हते. आज त्याला परस्पर भेटणार होते. माझ्या मनात कित्येक प्रश्न होते. "

अर्णव -" कदाचित तो सॉरी म्हणायला बोलावलं असेल.. "

प्रीती फक्त एक स्मित देऊन पुढे बोलू लागली.

प्रीती -" मला सुध्दा असंच वाटत होतं. पण जेंव्हा तिथे गेले तेंव्हा वेगळच घडले. "

अर्णव -" काय घडलं?"

प्रीती -" तो माझ्याकडे पाठ करून उभा होता. मी त्याला हाक मारली. तो मागे वळाला. मी त्याला कित्येक दिवसापासून पाहण्यासाठी तरसले होते. तो म्हणाला ' तू आलीस. मला वाटल नव्हतं तू येशील. हे बघ... मला वाटतं तुझी आणि माझी साथ फक्त इथं पर्यंतच होती. मी आता दुसऱ्या शहरात जात आहे. कदाचित मी कधीच नाही भेटणार तुला... '.... तो जेंव्हा हे बोलत होता, तेव्हा माझ्या डोळ्यातून अश्रू येत होते. काय झालं. कसं झालं. काहीच माहिती नव्हतं... मी त्याला विचारलं... ' माझं काही चुकलं का??... प्लिज सांग ना... काही चुकल असेल तर सॉरी... प्लीज प्लीज यार नको सोडून जाऊस मला.... ' मी त्याचा हात पकडून विनंती करत होते... तो म्हणाला ' प्लीज.. मला विचारू नकोस.. काय झालं... कसं झालं... फक्त मी तुला आता भेटू शकणार नाही.. ' एवढं बोलून तो जाऊ लागला. त्याने एकदाही मागे वळुन सुद्धा नाही बघितले. तेव्हा मी याच बीच वर बराच वेळ रडत बसले होते. "

अर्णव -" ह्म मम... मग असं सारे घडलं तर??"

प्रीती -" हो... "

काही मिनिट दोघेही शांत चालत होते. नंतर अचानक प्रीती म्हणाली.

प्रीती - " हे तिथे बघ एक बार आहे. चल तिथे जाऊ... "

अर्णव -" नको नको.. रात्र खूप होत आहे.. आपल्याला जावं लागणार.. "

प्रीती -" तू मुलगा आहेस ना.. चल की जाऊ.. "

प्रीती अर्णवचा हात पकडून त्या बारमध्ये घेऊन जाऊ लागली. तो बार खूप गजबजलेला होता. प्रीती आणि अर्णव खुर्ची वर बसले. प्रीतीने लगेचच व्हिस्की ची ऑर्डर दिली. ती अर्णवला विचारले की तु काय घेणार.

अर्णव -" मला काही नको... "

प्रीती - " अरे घे रे... काही नाही होत.. "

अर्णव - " नको नको... तूच पी मी फक्त कॉल्ड ड्रिंक घेईन. "

दोघांची ऑर्डर आली. दोघे सुद्धा पित होते.. प्रीती मात्र एका मागे एक ग्लास पित होती. अर्णव मात्र तिलाच पाहत बसला. त्याचा मात्र एक ग्लास सुद्धा संपला नव्हता. सात ग्लास झाल्यावर ती एकदमच टेबलवर आदळली.

अर्णव एकदम दचकला.

अर्णव -" अरे यार. ही पोरगी आहे का कोण आहे? आता कोण घेऊन जाणार हिला?आणि हीच घर कुठं आहे माहितीच नाही? "

अर्णव तिचा पर्स पाहू लागला. त्यात तीच कार्ड त्याला सापडलं. त्यावर घरचा पत्ता होता. तो तिला खांद्यावर घेऊन जाऊ लागला. घेऊन जाताना ती काहीतरी बडबडत होती. " रोहित तू का गेलास. कशाला गेलास?. " अर्णव तिला कार मध्ये बसून तिच्या घरी घेऊन जाऊ लागला. अधून मधून तो तिला पाहत असे. ती आता झोपली होती.

कार आता तिच्या घराच्या समोर उभी होती. तो तिला घेऊन बाहेर आला. तिच्या पर्समधून चावी काढली.

अर्णव - " नशीब चावी तर सापडली. "

प्रीतीला घेऊन अर्णव तिच्या बेडरूममध्ये गेला. तिला तिच्या बेडवर झोपवले. तिच्या पायातले हिल्स काढले आणि फॅन ऑन केला. तो बेडवर बसून म्हणू लागला.

अर्णव -" बहुतेक ही सुद्धा एकटीच राहत असेल. "

तो उठला. तेवढ्यात प्रीतीने त्याचा हात पकडला.

प्रीती - " प्लीज ना... रोहित... जाऊ नको ना सोडुन.. "

ती झोपेतच बडबडत होती. तो तिचा हात हळुवारपणे सोडवू लागला. मग त्याने तिच्याकडे पाहिले आणि मनात म्हणू लागला. ' कदाचित सगळ्यांची अवस्था माझ्यासारखीच झाली आहे. '

तेवढ्यात अर्णवचा फोन वाजला. फोनवर पूजाच नाव दिसत होतं.

अर्णव -" हॅलो... पूजा एवढ्या रात्री... "

पूजा -" काही नाही रे... तुला एक बातमी द्यायची होती. "

अर्णव -" बोल की. "

पूजा -" माझं लग्न ठरलंय अर्णव.. मी खूप खुश आहे.. "

अर्णव एवढं ऐकून खालीच बसला.

पूजा -" हॅलो... हॅलो अर्णव... हॅलो... काय झालं???.. अर्णव बोल ना... "

त्या गडबडीत मोबाईल मात्र खाली पडला होता आणि त्याच्या डोळयात पाणी येऊ लागलं होत.

----------------------------------

सकाळ होत आली होती. पण ती सकाळ अर्णवसाठी काही वेगळेच वळण घेऊन आली होती. सूर्याची किरणे आकाशाची भेट घेत होती. पण अर्णवच्या आयुष्यात मात्र अंधारच पसरलेला होता. एकच प्रश्न त्याच्या मनात येत होत की ' का??... का माझ्यासोबत अस होत आहे. ??' त्याच उत्तर मात्र त्याला मिळत नव्हत.

प्रीतीला जाग आली. अर्णव मात्र बेडच्या खाली एकटक पाहत बसलेला होता. प्रीती बेडवर बसलेली होती.

प्रीती -" अर्णव... "

अर्णव मात्र तिच्या हाकेला उत्तर देत नव्हता. प्रीतीला जरा वेगळच वाटत होत.

प्रीती -" अर्णव... तू ठीक आहेस ना???"

अर्णव तरी सुद्धा लक्ष देत नव्हता. प्रीती त्याच्या खांद्याला हलवत म्हणाली.

प्रीती - " अर्णव... "

अर्णव जरासा दचकून जागा झाला. तो प्रीतीकडे पाहत म्हणाला.

अर्णव - " संपल... "

प्रीती -" काय???... "

अर्णव -" सगळंच... "

एवढं बोलून तो प्रितीच्या गळयात पडून रडु लागला. प्रीती तिला सावरत म्हणाली.

प्रीती -" शश... शांत हो बघू... काही संपणार नाही... "

प्रीती त्याला दिलासा देत म्हणाली. अर्णव आता शांत होत होता. त्याला कळून चुकलं की तो प्रितीच्या मिठीत होता. तो लगेच मागे झाला.

प्रीती -" तू बरा आहेस ना?... "

अर्णव अजूनसुद्धा गप्प होता. प्रीती त्याला बघून म्हणाली.

प्रीती -"थांब.. मी कॉफी बनवून आणते. मग आपण बोलू... "

प्रीती किचनमध्ये गेली. तो मात्र तसाच बसलेला होता. काही मिनिटांत प्रीती दोन कप कॉफी घेऊन आली. अर्णव आता बऱ्यापैकी स्वतःला सावरताना दिसत होता.

प्रीती -" घे... कडक कॉफी... "

दोघेही आता कॉफीचा आस्वाद घेत होते. काही मिनिटे शांतपणे गेली.

प्रीती -" आता सांग... काय झालं?"

अर्णव -".. काय सांगू तुला आता???"

प्रीती -" मी नाही का सांगितले तुला सगळं.. तसं तू पण सांग... काल मला इथं घेऊन आलास त्यासाठी धन्यवाद.. "

अर्णवच्या चेहऱ्यावर खूप वेळानंतर हास्य आले होते.

प्रीती -" बरं आता सांगतोस ना.. काय झालंय ते?"

अर्णवने दीर्घ श्वास घेतला आणि पहिल्यापासून सांगू लागला. त्याच्या ऑफिसमध्ये पूजाच्या आगमनापासून ते तिच्या व्यसन सोडवण्यापर्यंत. तिच्या वाढदिवसाच्या त्या रात्री पासून ते तिच्या बाबांना मनवण्यापर्यंत आणि तिच्या अचानक घेतलेल्या बाबांच्या इच्छेनुसार लग्न करण्याचा निर्णय पर्यंत... प्रीतीने सर्व काही शांतपणे ऐकुन घेतले.

प्रीती -" ह्म म् म... तर तिला तुझ्या प्रेमाची जाणीव नाही तर.. "

अर्णव -" कधी अशी वेळच आलेलीच नाही की मी व्यक्त होऊ.. आता सगळं संपलं... "

प्रीती त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाली.

प्रीती -" सर्व काही ठीक होईल.. प्रेम जर खर असेल तर तुला नक्कीच मिळेल. "

अर्णव गप्प बसला होता. तो अपेक्षा सोडून होता. पण पुढे काय होणार होत हे त्याला तर कुठं माहिती होत?

प्रीती -" ते राहु दे... चल मी तयार होते ऑफिससाठी... "

अर्णव -" हो... "

प्रीती उठून बाथरूमकडे गेली. नंतर मागे वळून म्हणाली.

प्रीती -" तुला हरकत नसेल तर तू सुध्दा इथेच तयार होऊ शकतोस... जर तुला हरकत नसेल तर.... "

अर्णव - "बरं... पण कपडे नाही माझ्याकडे... "

प्रीती -" काळजी नको. माझ्या लहान भावाचे कपडे तुला येतील... "

अर्णव -" तुला भाऊ पण आहे???"

प्रीती -" हो... पण तो इथे नसतो. कधी तरीच तो इथं येतो. त्याचेच कपडे इथे आहेत. 😊 😊"

अर्णव फक्त एक स्मित करत होता. प्रीती बाथरूममध्ये फ्रेश होण्यासाठी गेली. अर्णव मात्र वेगळ्याच विश्वात हरवला होता. प्रीती कधी तयार झाली याचे सुद्धा त्याला भान राहीले नाही. प्रीती दोन तीन वेळा हाक मारून सुद्धा तो गप्पच बसला होता. प्रीतीने त्याला हलवले, तर तो अचानक दचकून म्हणाला.

अर्णव -" तू तयार झालीस?"

प्रीती -" हो... तू पण तयार हो आणि तुझ्याजवळ फक्त अर्धा तास आहे आणि मला ऑफिसला लेट झालेला आवडत नाही... "

अर्णव -" हो... "

प्रीती हसून म्हणाली...

प्रीती -" तू निवांत तयार हो"

अर्णव न हसताच तो बाथरूमकडे गेला. प्रीतीला काहीच वाटल नाही. कारण तिला कदाचित माहिती असेल की तो कोणत्या परिस्थीतीमध्ये आहे.

अर्णव तयार होऊन बाहेर आला. बाहेर येताच बघतो तर काय प्रीती टेबल जवळच्या खुर्चीवर बसली होती.

प्रीती -" अर्णव.. ये नाश्ता कर.. "

अर्णव -" नको मला... "

प्रीती - " अरे यार... ये बघू "

अर्णव -" नको म्हणलो ना मी.. "

प्रीती -" बरं.... राहीले... बसून तर घे.. मी नाष्टा करून घेते. मग आपण जाऊयात. "

सगळं काही आटपल्यावर प्रीती आणि अर्णव दोघेही ऑफिसला निघाले.

तिकडे ऑफिसमध्ये रचना आणि रवी दोघेही अर्णवची वाट पाहत होते.

रचना -" कुठे असेल हा??? "

रवी -" एवढं का टेन्शन मध्ये आहेस... येईल तो.. नको काळजी करू.. "

रचना - " अरे काल रात्रीपासून त्याचा फोन बंद लागत आहे. "

रवी -" चार्जिंग नसेल. "

तेवढ्यात पूजा कित्येक दिवसातून ऑफिसला आली. ती खुशीत तर होती पण जरा टेन्शनमध्ये पण होती. कारण ऑफिसला ती उशीराच पोहचली होती.

पूजा - "हॅलो रचना... "

रचना -" हे पूजा. कसं काय मग. किती दिवसातून आली आहेस??"

पूजा -" मी मस्त.. तू कशी आहेस???"

रचना -" मस्तच.. "

पूजा -" आणि रवी. कसा आहेस??"

रवी -" सगळं चांगलं आहे"

पूजा -" ऐका ना तुम्हाला एक बातमी द्यायची आहे... "

दोघेही एकदमच म्हणाले -" कुठली?"

पूजा -" तुम्हाला पटणार नाही, पण माझं लग्न ठरलय... "

दोघांना आता कळून चुकल की का अर्णवचा फोन बंद लागत आहे?

पूजा -" अगं अर्णव आला आहे का ऑफिस का?"

तेवढं म्हणताच ऑफिसमध्ये प्रीती आणि अर्णव दोघेही एकदमच आले. त्या दोघांकडे तिघेही पाहत उभे राहिले. प्रीती अर्णवला घेऊन ऑफिसच्या तिच्या केबिनमध्ये घेऊन गेली.

पूजा -" ही कोण?"

रचना -" ही आपली नवीन एच. आर... म्हणजे काल रात्र भर तो तिच्यासोबत होता??"

रवी -" माहिती नाही.. असेल ही"

पूजा -" तो तिच्यासोबत का होता??"

रवी - " म्हणजे??"

पूजा -" म्हणजे काय??"

रवी -" का राहू नये???"

तीने गप्प राहणंच पसंत केलं. तिचे डोळे खूप काही सांगून गेले, पण ती स्वतः तोंडातून एक शब्दही काढत नव्हती. रवीने तिला पाहून रचनाला इशारा केला. रचनासुद्धा तिला पाहत होती.

रचना -" काहीही असो... अभिनंदन... "

पूजाच मात्र तिच्याकडे लक्ष नव्हतं.

रचना -" पूजा... "

पूजा जरा दचकून म्हणाली.

पूजा -" हं... "

रचना -" मी म्हणाले अभिनंदन... "

पूजा -" ओ... थॅंक्स.. "

रवी -" एक विचारू पूजा?"

पूजा -" विचार ना... "

रवी -" तुझं लग्न होत आहे. पण तू खुश आहेस ना???"

पूजा -" पप्पा खुशीत आहेत ना. मग मला अजुन काहीही नकोय.. "

रचना -" अगं मग तुझ्या सुखाच काय??"

पूजा -" पप्पानी निर्णय घेतलाय म्हणजे माझ्या चांगल्यासाठीच असेल.. "

रवी -" ओह.. "

पूजा -" अर्णव एच. आर च्या एवढं जवळ कसा काय??"

रवी -" म्हणजे??"

पूजा -" म्हणजे एवढे जवळ कसं काय??.. की तो रात्रभर तिच्यासोबत राहतो??. "

रवी फक्त खांदा उडवतो.

तेवढ्यात अर्णव केबिनच्या बाहेर आला. तो पूजाला समोर पाहताच थांबला. पूजा आणि अर्णवची एक क्षण नजरेला नजर भिडली गेली. तो क्षण खूप काही सांगून जात होता. पण ते दोघेही कुणाला काही सांगत नव्हते.

पूजा त्याच्याजवळ गेली आणि त्याला परत एकदा तिच्या लग्नाची गोड बातमी दिली.

अर्णव -" ओह्... अभिनंदन.. "

एवढं बोलून त्याने त्याचा हात पुढं केला. ती त्याला हस्तआंदोलन करत म्हणाली.

पूजा -" धन्यवाद.. आणि मग कसा आहेस??"

अर्णव -" बघत आहेस ना... बरा आहे... "

अर्णव तिला टाळू करू पाहत होता.

पूजा -" बरं.. छान... "

अर्णव - " मग कशी काय चाललीय लग्नाची तयारी???... "

पूजा -" चालू आहे... तू कसा आहेस?. "

अर्णव फक्त एक खोटं स्मित ओठावर ठेवत म्हणाला.

अर्णव -" अगं मस्तच आहे मी... "

पूजा -" ह्म म.... तू आणि...... "

ती वाक्य पूर्ण करणार तेवढ्यात प्रीती केबिनच्या बाहेर आली अन् म्हणाली.

प्रीती -" अर्णव... एक अर्जंट काम आहे... केबिनमध्ये ये... "

अर्णव -" ओके... मॅडम... पूजा प्लीज नंतर बोलू का??... "

पूजाने फक्त आपली होकारार्थी मान हलवली. अर्णव प्रितीच्या केबिनमध्ये कामानिम्मित गेला.

पूजाच्या मनात खूप काही विचार एकदमच चालू झाले होते. पण का तिच्या मनात असं होत आहे हे सुध्दा तिला माहिती नव्हतं.. ती स्वतः खूप काही

कन्फ्युजनमध्ये होती.. का कोण जाणे अचानक तिला वेगळं वाटू लागलं.... न कळत तिच्या डोळयातून अश्रू येऊ लागले... अचानक ती रडत ऑफिसच्या बाहेर गेली. तिला रवी आणि रचना दोघेही पाहत होते... या कथेत अजुन खूप काही बाकी होत....

रचना एकदा रवीकडे आणि नंतर केबिनकडे नजर फिरवून पूजाच्या मागे जाऊ लागली. पूजा आपले ओले डोळे घेऊन तशीच वेगाने पुढे जात होती आणि मागे मागे रचना होती... पूजा कुठे जात होती हे तिला सुद्धा माहिती नव्हतं. रस्त्याच्या कडेला तीने एक रिक्षा थांबवली. मागून रचना येऊन तिला म्हणाली.

रचना -" मी पण येऊ शकते का?"

पूजा रचनापासून लपवत डोळे पुसली आणि म्हणाली.

पूजा -" हो... का नाही?... "

दोघींही रिक्षामधून जात होत्या. रचनाने रिक्षावाल्याला पत्ता सांगितला आणि परत ती पूजा कडे वळली.

रचना -" अरे तू ऑफिसमध्ये सगळयांना का नाही भेटलीस?"

पूजा -" अगं.. एक महत्वाचं काम लक्षात आलं म्हणून... "

रचना -" म्हणून डोळ्यातून पाणी आलं वाटत... "

पूजा -" नाही ग... खरंच एक महत्त्वाचं काम आहे. "

रचना -" बरं बरं... माझ्यासाठी तुझ्याकडे १० मिनिटे आहे का?"

पूजा -" का ग?"

रचना -" तस नाही... सहजच.. "

पूजा -" म्म म... ओके.. "

रिक्षा अचानक पणे थांबली, उतरायचे ठिकाण आले होते. ते ठिकाण दुसरे तिसरे काही नाही तर बीच होता.

रचना -" चल... "

पूजा -" इथे???"

रचना -" हो... "

बीचवर खुप सारे लोक होते. सगळे आपापल्या धुंदीत होते. कोणी बीचवर फिरत होते. कितीतरी प्रेमाच्या जोड्या तिथे फिरायला म्हणून आलेल्या होत्या. रचनाने पूजाला सुद्धा तिथे आणले होते.. रचनाने पुजाचा हात पकडला व बीचवर फिरायला येण्याची विनवणी केली.

दोघींही बीचवर फिरत होत्या

रचना -" पूजा... एक विचारू?"

पूजा -" हो विचार की.. "

रचना -" तू खरंच या लग्नासाठी तयार आहेस काय?"

पूजा -" असं का विचारत आहेस?"

रचना -" अग तू उत्तर तर दे... "

पूजा मान खाली घालून म्हणाली

पूजा -" हो... "

रचना -" खरंच??"

पूजा -" हो ग... "

रचना -" मग ऑफिसमधून रडत का आलीस?"

पूजा -" मी कुठ रडत आले?"

रचना -" पूजा बस कर... किती फसवशील???... तू मला नाही तर स्वतः ला फसवत आहेस... "

एका क्षणासाठी पूजा शांत बसली. समुद्राच्या त्या लाटांन कडे पाहत ती म्हणाली.

पूजा -" ॲक्च्युअली आय लव अर्णव... "

रचना हे ऐकूनच उडाली. तिला कधी एकदा अर्णवला फोन करू असं झालं होत... पण तीने ठरवले की नको, प्रत्येक्षातच त्याची प्रतिक्रिया कशी असेल ते पाहूया.... म्हणून रचनाने आपल्या मनाला सावरले.

पूजा मात्र शून्यात पाहत होती. न राहवून रचना म्हणाली.

रचना -" मग प्रॉब्लेम काय आहे?"

पूजा -" त्याच्या मनात माझ्याबद्दल काय आहे माहिती नाही... आणि बहुतेक तो दुसऱ्या कुणासोबत जर रिलेशशिपमध्ये असेल तर.... "

रचना -" तुला असं का वाटलं?"

पूजा -" कारण आज ऑफिस मध्ये बघितलीस ना... की बॉस त्याला एका मिनिटासाठी पण सोडत नव्हती आणि याचा अर्णवला काहीच प्रॉब्लेम नव्हता... "

ही गोष्ट रचनाला सुद्धा पटली, 'तो काल रात्री कुठे होता?.. कुणासोबत होता?... माहिती नाही... आणि आज सकाळी अचानक तो प्रीती (बॉस) सोबत आनंदात येतो.. म्हणजे दाल में कुछ काला है.... ही गोष्ट फक्त एक जण स्पष्ट सांगू शकतो. तो म्हणजे खुद्द अर्णव... मी त्याच्याशी कन्फर्म केल्याशिवाय पूजाला काही सांगू शकणार नाही... ' हा ठाम विचार रचनाने मनामध्ये केला.

पूजा खाली मान घालून बसलेली होती. तिच्या गालावरून अश्रू खाली येत होते. ही वेदना रचना सुद्धा अनुभव करू शकत होती. रचनाला खुप वाईट वाटले, तिने पुजाच्या खांद्यावर हात ठेवला आणि तिला दिलासा देत बोलली

रचना -" डोन्ट वरी... सगळं काही ठीक होईल... "

पूजा तिच्याकडे बघू लागली आणि स्मित करत म्हणाली.

पूजा -" रचना एक विचारू?"

रचना -" विचार ना.. "

पूजा -" माझ्यासोबतच असं का होत ग?... लहानपणापासूनच माझ्याजवळ बाबा नव्हते. नंतर मग आयुष्याच्या वेगळयाच वळणावर मी गेले. तिथून मग तुम्ही आणि अर्णव एक नवीन उमेद घेऊन माझ्या जीवनाची दिशाच बदलली. मग मला बाबासुद्धा मिळाले. पण एका अटीवर ज्यात माझी मर्जी नाही.. पण बाबांचं प्रेम मिळवण्यासाठी मी काहीही करायला तयार आहे... पण या प्रेमाचं काय???... एक प्रेम मिळवण्यासाठी मला दुसरं प्रेम गमवावे लागणार आहे.. "

पूजा हुंदके देत रडु लागली. रचना तिला मिठीत घेऊन समजावू लागली...

रचना -" पूजा... श्श... शांत हो बघू... सगळं ठीक होईल... "

तेवढ्यात मोबाईलची रिंग वाजली. पूजाच्या मोबाईलवर बाबांचं फोन आला होता. ती पटकन डोळे पुसू फोन उचलली.

पूजा -" हा बाबा... हो आलेच... "

पूजा फोन ठेवत म्हणाली.

पूजा -" रचना... चल बाय... काम आहेत... परत भेटू... लग्नाला यायचं हं... निघते... "

रचनाला मात्र अजिबचं वाटलं.

रचना -" ओके... अँड टेक केअर.... सगळं चांगलं होईल... "

पूजा -" नशिबात काय लिहिलंय माहिती नाही रचना... "

एवढं बोलून ती गेली. इकडे मात्र रचना आता बीचवर विचार करत बसली होती. शेवटी ती सुद्धा ऑफिसला निघाली. पण रागात... अर्णव चा तिला खूप राग आला होता... ती त्याला आता जाब विचारणार होती...

रचनाने रिक्षाने ऑफिस गाठले व ती रागा रागात ऑफिसमध्ये जाऊ लागली.

रचना -" आता बघतेच त्या अर्णवच्या बच्चुला... ”

रचना अर्णवला शोधू लागली. मात्र तो कुठेच नव्हता. रचना रवीच्या केबिनजवळ येऊन रवीला म्हणाली.

रचना -" रवी.... अर्णव कुठे आहे?.. 😬 😤 "

रवी तिच्या रुद्र अवतार बघून थबकलाच.

रवी -" का?"

रचना -" तू सांगणार आहेस का नाही?.... नाहीतर तू मार खाणार आहेस.. "

रवी -" अगं झालं तरी काय???... "

रचना -" तू आधी सांग... तो कुठे आहे?"

रवी -" अगं तो अजुन बॉसच्या केबिनमधेच आहे. "

रचना -" काय???"

रवी -" हो... "

रचना -" एवढ्या उशिरापर्यंत काय करत आहेत आत दोघं??... "

रवी -" काम असेल ग... "

रचना -" अरे पण एवढं... थांब त्याला येऊदेच सांगते बरोबर त्याला... "

रवी -" अगं पण झालं तरी काय?. "

रचना - " तो आल्यावरच कळेल तुला... "

रचना आणि रवी दोघेही अर्णवची वाट पाहू लागले... न राहवून रचना म्हणाली...

रचना -" रवी... चल आपण जाऊयात केबिनमध्ये... "

रवी -" अगं काय एवढी घाई... येईल ना तो.. "

रचना -" तू येणार आहेस का नाही?"

रवी -" बरं बाबा... चल.. "

दोघेही केबिनमध्ये जात असतानाच त्यांना मागून एक आवाज आला. " रचना बेटा... "

पूजाचे बाबा ऑफिसमध्ये आले होते.

रचना -" अंकल... तुम्ही इथे???"

अंकल -" का??... येऊ नये का?"

रवी -" नाही... तसं नाही... पण अचानक आलात ना.. म्हणून विचारले.. "

रचना -" हो अंकल.. "

तिघेही बोलत असताना अर्णव केबिनमधून बाहेर आला.

अर्णव -" अरे अंकल... तुम्ही इथे??"

रचना मात्र त्याला मारण्याच्या नजरेने पाहत होती.

अंकल -" अरे विशेष नाही... तुम्हाला माहितीच असेल की.. पूजाच लग्न ठरलंय ते... "

पूजाच लग्न अस म्हणाल्यावर अर्णवचा चेहरा मात्र उतरला.

रवी -" हो माहिती आहे ना... आजच सकाळी ती पत्रिका देण्यासाठी आली होती. "

अंकल -" हो का?... पण मग मला ना लग्नासाठी कपड्याची शॉपिंग करायची होती... अर्णव तुझ्या ओळखीची कोणती कपड्याची दुकाने आहेत का??"

अर्णव -" हो आहे ना... "

अंकल -" मग चल जरा आपण तिथेच शॉपिंग करूयात... "

अर्णव -" हो... चला मग... "

रवी -" अंकल तुम्ही व्हा पुढे आम्ही येतोच... "

अंकल -" ओके ओके... या लवकर मी गाडी काढतो.. "

अंकल गेल्यावर तो अर्णव ला म्हणाला.

रवी -" अर्णव... तू पूजाच्या लग्नाचं शॉपिंग करण्यासाठी जात आहेस??. "

अर्णव -" हो... "

रवी - " पण का??"

अर्णव -" मला वाटतं ना ती कुठं पण असो, पण सुखी असो... आणि आपल्या नशिबातच ती नाही आहे तर... काय करणार??"

रचना मनातल्या मनात म्हणाली ' ह्म म... नशिबात आता वेगळीच आली आहे ना म्हणून.. "

अर्णव -" कमीतकमी पूजाच्या लग्नासाठी तर काही काम करूयात... "

तेवढ्यात ऑफिस समोर गाडी आली. अंकल हॉर्न वाजवू लागले.

अर्णव -" रवी येणार आहेस??.. "

रवी रचनाकडे पाहत म्हणाला..

रवी -" हो आम्ही दोघेही येत आहोत... "

रचना त्याच्याकडे रागातच पाहू लागली. तिघेही गाडीत बसले. अर्णव अंकलला दिशा दाखवत होता. शेवटी ती गाडी दुकानाजवळ येऊन थांबवली. काही वेळानी पूजा सुद्धा तिथे आली. पूजा आणि अर्णव ची एका क्षणासाठी नजरेला नजर भिडली. नंतर लक्षात आल्यावर अर्णव सगळयांना दुकानात घेऊन गेला.

दुकानात खूप सारे लोक खरेदी साठी तिथे आले होते. लग्नाचा सीजन असल्यामुळे तिथे खूपच गर्दी झाली होती. अर्णवने सलीम भाई ला बोलावून घेतले आणि सर्व काही सांगितले की अंकल ओळखीचे आहेत. जरा सांभाळून वगैरे... काही काळानंतर पाहुणे मंडळी सुद्धा आले.

त्यात नवरा मुलगा सुद्धा आला होता. तो मात्र एकदम चकचकीत होऊन आला होता... त्याच नाव करण... दिसायला बरा होता.. उंची सुद्धा बरीच होती.

सगळे शॉपिंग करत होते. इकडे मात्र रचना अर्णवला रागातच पाहत होती.

सगळे काही मजेत चालले होते. पण दोन जीव असे पण होते की ते एकमेकांना सोडून जगू शकत नव्हते. अर्णव आणि पूजा नजरेचे लपंडाव खेळत होते. पण पूजाच लग्न ठरलं होत. करण पूजा जवळ जाऊन उभा राहिला. ती त्याला बघून स्मित करू

लागली होती पण ते खोटं स्मित करत होती. करणने सुद्धा स्मित करत तिला मिठीत घेतले. हे मात्र अर्णवला ते सहन झालं नाही. त्याने नजर दुसरीकडे फिरवली. दोन जीवांची घुसमट होत होती पण ती घुसमट कोणी बोलून दाखवू शकत नव्हते...

दोघेही एकमेकांकडे पाहत सुद्धा नव्हते, पण एकमेकांची ओढ मात्र होती.

तेवढ्यात अर्णव चा फोन वाजला. स्क्रीनवर प्रीतीच नाव झळकत होत... रचनाने ते पाहीले, ती अजुनच रागात आली. अर्णवने फोन उचलला..

अर्णव -" हॅलो... "
प्रीती -" हॅलो... अरे अर्णव... कुठं आहेस????..... पटकन ऑफिसला ये... "

अर्णव -" हॅलो प्रीती... काही प्रॉब्लेम आहे का?"

प्रीती -" तू अगोदर ये बघू.... "

अर्णव -" बरं... बरं.. येतो लगेच... "

अर्णवने रवीला सांगीतले नी तो गेला. जाता जाता त्याची नजर पूजाच्या नजरेला भिडली. जणू तो सांगत होता की मी तुझ्यापासून दूर जात आहे. तिची नजर

मात्र नको म्हणून सांगत होती. पण दोघे मात्र एक शब्द सुद्धा बोलत नव्हते. अर्णव गाडी घेऊन ऑफिसला निघाला. रस्त्यात तो विचार करत होता की काय काम असेल प्रीतीला???... काम असेल का काही????... गाडी वेगात घेत तो ऑफिसला पोहचला.

अगदी गडबडीत तो ऑफिसमध्ये शिरला. रिसेप्शनमध्ये असलेली जसिका म्हणाली.

जसिका-" अरे अर्णव... तू आलास??.. "

अर्णव -" हो... प्रीती कुठे आहे??"

जसिका-" प्रीती??"

अर्णव -" प्रीती मॅडम... "

जसिका-" आपल्या केबिनमध्ये आहेत.. "

अर्णव -" बरं.. तुला नंतर भेटतो.. "

एवढं बोलून तो केबिनमध्ये गेला. केबिनमध्ये प्रीती टेबलावर मान ठेऊन बसलेली होती. केबिन अगदी शांत वाटत होती. अर्णव तिच्या जवळच्या खुर्चीवर बसला. तिला उठवण्यासाठी हात उचलला, पण मध्येच तो थांबला. त्याला खूपच वेगळं वाटत होत.

अर्णव -" प्रीती... "

प्रीती मान वर करून पाहू लागली, ती तिच्या त्या ओल्या डोळयांनी अर्णवकडे पाहू लागली. त्याला पाहताच तिच्या डोळयातील बांध तुटला. ती अर्णवच्या मिठीत येऊन रडु लागली. अर्णव तिच्या डोक्याला थोपटवत म्हणाला.

अर्णव -" शं श... काय झालं???. प्रीती.. शांत हो बघू आधी... "

प्रीती आता शांत होऊ लागली होती. अर्णव टेबलवर असलेला पाण्याचा पेला तिला दिला. ती पाणी पिऊन थोडा वेळ शांत बसली.

अर्णव -" आता सांग काय झालं??... "

प्रीती शून्यात पाहत म्हणाली.

प्रीती -" अर्णव... रोहितचं लग्न ठरलयं... "

अर्णव - " काय???... तुला कधी कळालं??"

प्रीती -" आता माझ्या मैत्रीणच फोन आला होता... ती म्हणाली.. "

अर्णव -" ओ... कधी आहे लग्न???"

प्रीती -" पुढच्या महिन्यात.. "

अर्णव अचानक हसू लागला. प्रीती त्याच्याकडे पाहू लागली.

प्रीती -" काय झालं??... असं का हसत आहेस?"

अर्णव -" आपल नशीब किती मिळतजुळत आहे ना?"

प्रीती -" म्हणजे?"

अर्णव -" म्हणजे बघ की तुझ्या रोहीतचे लग्न आणि पूजाचे लग्न सुद्धा पुढच्या महिन्यात ठरलंय... दोघे कसे आता देवदास टाईप झालो आहोत. "

प्रीती -" तुझं आणि माझं वेगळं आहे अर्णव... "

अर्णव -" कसं???"

प्रीती -" तू अजूनसुद्धा तिला सांगू शकतोस की तुझे तिच्यावर प्रेम आहे म्हणून, पण मी नाही ना सांगू शकत... तुझी अजुन वेळ गेलेली नाही... "

अर्णव -" आता ते शक्य नाही, प्रीती... "

प्रीती -" का???"

अर्णव -" कारण ती तिच्या बाबांचे वचन नाही तोडणार. "

प्रीती -" पण तीच मन तुझ्यात अडकलेला असेल तर???.. "

अर्णव -" तरी सुद्धा ती बाबांना दिलेले वचन नाही मोडणार... "

प्रीती -" मग प्रॉब्लेम बाबा आहेत तर... "

अर्णव -" अगं तस नाही... पण तिला तर माझ्या प्रेमाबद्दल कुठे माहिती आहे?"

प्रीती -" तिला माहिती आहे अर्णव... "

अर्णव -" कसं?"

प्रीती -" तुझ्या डोळ्यात तीच्याबद्दलच प्रेम दिसतं वेड्या.. "

अर्णव -" मग तीने अजून का नाही सांगितले?"

प्रीती -" ती तुझ्या कबुलीची वाट पाहत असेल??"

अर्णव -" मग मी आता काय करू?"

प्रीती -" तुम्हा पोरांना ना सगळं काही सांगावं लागतं, जा आणि सांग बिंनधास्तपणे की पूजा आय लव्ह यू... "

अर्णव -" नक्की???"

प्रीती -" अरे हा... "

तिकडे मात्र पूजाला काही कळत नव्हतं. अचानक अर्णव कुठे गेला होता. पूजाची नजर अर्णवला शोधत होती. शेवटी न राहून ती रवी जवळ आली.

पूजा -" रवी.... अर्णव कुठे गेला रे??... "

रवी -" तो ऑफिसला गेलाय... "

पूजा -" काही अर्जंट काम होत का??"

रवी -" नाही माहिती... थोड्या वेळापूर्वी प्रीती मॅडमचा कॉल आला होता. तो म्हणाला की अर्जंट काम आहे,जातो म्हणून... "

प्रीतीच नाव ऐकताच पूजाचा चेहरा पडला. ही गोष्ट रचना कडून लपुन राहिली नाही. तिला तर अर्णवचा खूप राग आलेला होता. का नाही येणार... ऐकीकडे म्हणतो की पूजाशी प्रेम करतोय आणि दुसरीकडे मात्र तो प्रीतीसोबत मस्त वेळ घालवत होता.

लग्नासाठी जे काही खरेदी करायचं होती ती झाली. सगळे बॅग्स् घेऊन बाबा आणि पूजा निघू लागले.

बाबा -" तुमच्या सगळयांचे खूप खूप धन्यवाद... तुमच्यामुळे मला ही खरेदी शक्य झालं... अर्णव कुठे गेलाय??"

रचना मनातल्या मनात,' तो काय... मस्त असेल प्रीती सोबत.. '

रवी -" काका... तो ऑफिसला गेलाय.. काही अर्जंट काम होत म्हणून... "

बाबा -" ह्मम... चला मग आम्ही निघतो... "

पूजा आणि बाबा दोघेही त्यांच्या कार मध्ये बसून निघाले. खिडकीतून पूजा बाहेर बघत असताना ती अर्णवसोबत घालवलेले क्षण आठवत होती. त्याच आठवणींनी तिची डोळे ओले झाले.

इकडे अर्णवला त्याच्या प्रेमाची कबुली देण्यासाठी लागलेली हुर हूर आणि तिकडे पूजाला अर्णव आयुष्यातून निघून जाईल या जाणीवेने होत असलेलं दुःख, या मध्ये अंतर फक्त एका वाक्याचे होते ' मी तुझ्यावर प्रेम करत आहे'.

पूजा आणि बाबा त्यांच्या घरी पोहचले. घरात मात्र जोरदार तयारी चालली होती. लग्नासाठी किती लोक येणार आणि त्यांचं नियोजन कसं करायचं हे सगळी योजना बाबांचे नोकर करत होते. पूजाला मात्र या मध्ये काडीचाही इच्छा नव्हती. तीच मन तर अर्णवच्या आठवणीत हरवून गेलेले होत. ती तिच्या रूम मध्ये आली. दरवाजा बंद केला आणि बेडवर रडतच पडली. तिचे अश्रू खूप काही सांगत होते, ऐकीकडे मन अर्णवसोबत आहे तर दुसरीकडे तीने बाबांना दिलेली वचनचा सुद्धा विचार करत होती.

रडता रडता पूजा कधी झोपी गेली हे तिला सुद्धा नाही कळाले. सकाळी जेंव्हा तिला जाग आली तेंव्हा तिचे डोळे सुजलेले होते. तिच्या बाबानी तिला पाहताच तिला विचारले की काय झाले का??.. तीने जागरण झाल्याचं कारण सांगून वेळ मारून नेली.

तिकडे अर्णव पूजाला कसे सांगावे की तो तिच्यावर किती प्रेम करतो ते.. त्यात त्याला कल्पना आली की सरळ तिच्या घरी जावं आणि सरळ सरळ तिला विचारावं. म्हणून तो सकाळी तयार होत होता. तयार होत असताना त्याने प्रीतीला फोन केला.

प्रीती -" हॅलो अर्णव... "

अर्णव -" हॅलो प्रीती... "

प्रीती -" क्या बात है... जनाब आज बहूत ज्यादा खुश लग रहे हैं.. "

अर्णव -" कारण कामच तसे करायला चाललोय.. "

प्रीती - " कसलं काम???"

अर्णव -" आज पूजाच्या थेट घरी जातो आणि थेट तिला विचारतो की लग्न करणार का माझ्याशी???"

प्रीती - " ओह... "

प्रीती काहीशी लटकत्या आवाजात म्हणाली..

अर्णव -" काय झालं??"

प्रीती -" काही नाही... "

अर्णव -" ओके ओके... आज ऑफिसला जरा लेट होईल. "

प्रीती -" बरं.. तू ये निवांत.. "

अर्णव आज जाम खुश होता. गाडी काढून तो पूजाच्या घरी निघाला. थोड्या वेळात तो तिच्या घरी पोहचला. घराच्या बाहेर त्याने गाडी थांबवताना तो आरशात बघून थोड केस नीट केले आणि घराकडे निघाला. तो आत जाताच त्याला कळालं की घरी पाहुणे आलेले आहेत. बाबा अर्णवला बघताच म्हणाले.

बाबा -" अरे अर्णव... तू आणि इथे???"

अर्णव स्मित करून त्यांना काहीतरी बोलणारच होता कि तेवढ्यात बाबा म्हणाले.

बाबा -" बरं झाले, आलाच आहेस तर यांना भेट.. हे आहेत करण, पूजाचा होणारा नवरा. "

अर्णवने त्याला पाहताच त्याचा आनंदाचे दुखात रुपांतर झाले. करणने त्याला हात पुढे केला व म्हणाला.

करण -" हॅलो.. मी करण... "

अर्णवसुद्धा त्याचा हात हातात घेत म्हणाला.

अर्णव -" हॅलो, आय एम अर्णव... "

तेवढ्यात पूजा आली. तिच्या हातात ट्रे होता त्यात काही चहाचे कप होते आणि काही बिस्कटेसुद्धा होती. ती अर्णवला पाहताच स्तब्द थांबली. करण तिला पाहताच म्हणाला.

करण -" ही आली... "

ऐवढे म्हणत तो तिच्याजवळ गेला व तिला मिठीत घेतले. त्याच्या घरचे खूप मोकळ्या विचाराचे होते. त्यामुळे हे सगळं काही वाटलं नाही. पण अर्णवला खूप काही वाटलं.. त्याच्या हृदयाचं तर पार तुकडे झाले होते. तेवढ्यात बाबा त्याला म्हणाले.

बाबा -" अर्णव बाळा... आमच्या घरात खूप नोकर आहेत पण आमचे म्हणून कोणीही नाही... मग बाळा तू येशील ना आम्हाला मदत करायला?"

अर्णव -" अहो... असं का म्हणताय येणार की आणि हो रवी आणि रचना तुमचेच बाळ आहेत कि... "

तो बाहेरून चांगला दिसत असला तरी आतून तुटलेला होता.

बाबा -" हो तर.. "

सगळ्यांचे नाष्टा पाणी झालं. अर्णव सगळ्यांचं निरोप घेऊन ऑफिसला निघाला पण त्याच्या मनात खूप काही गोंधळ निर्माण झालं होत. काहीही असो शेवटी ती त्याची खरी प्रेयसी होती. काहीही अपेक्षा न ठेवता तो तिच्यावर प्रेम करत होता. पण त्याला ठाऊक नव्हतं की ती पण तिच्यावर तेवढंच प्रेम करत आहे...

ऑफिसमध्ये सुद्धा तो कुणाला काहीही बोलला नाही. रवी आणि रचनाने सुद्धा त्याला विचारलं तर तो काहीही बोलला नाही.

आपल काम आटपून तो निघणारच होता तर प्रीती तिला हाक मारली तर तो ते न ऐकताच घरी गेला. घरी जाता जाता त्याच्या मनात खूप काही विचार येत होते.

.

घरी पोहचताच तो सर्वात प्रथम पाण्याखाली गेला. अंघोळीच्या पाणी त्याच्यावर पडताच त्याच्या डोळयातून ही पाणी येऊ लागलं. त्याच्या मनातील दुःख तो आता बाहेर काढत होता. तेवढ्यात दरवाजाची बेल वाजली. तो अंघोळ आटपली अन् दार उघडले तर दारात प्रीती होती.

ती आत येताच तिने त्याला विचारले की काय झाले??.. अर्णव तिला पाहताच तिच्या मिठीत जाऊन रडु लागला. ती त्याला शांत बसवत त्याला थोपटत होती.

प्रीती -" काय झालाय अर्णव?"

अर्णव शांत होऊन आज घडलेलं सगळं काही सांगितले. प्रीती सगळं काही ऐकुन घेत होती. काही मिनिटे शांतपणे गेली. अर्णवने त्याच डोकं प्रितीच्या खांद्यावर ठेऊन बसला होता आणि प्रीती त्याच्या डोक्याला थोपटत होती.

तेवढ्यात त्याच्या दारात पूजा आली. तीने अर्णव आणि प्रीतीला असं पाहताच दाराजवळच थांबली. ती त्या दोघांना तसं पाहताच तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले, ते तिच्या गालावरून खाली येऊ लागले. ती आली तशीच मागे फिरली आणि घरी निघाली. घरी जाता जाता तिच्या मनात खूप काही विचार येऊ लागले होते.

अर्णव आता झोपी गेला होता. प्रीती त्याला बेडवर झोपवून निघणार तेवढ्यात अर्णवने तिचा हात पकडला व म्हणाला," पूजा.. मी तुझ्यावर खूप प्रेम करतो". हे ऐकताच का कुणास ठाऊक?? प्रितीच्या ही डोळ्यातून पाणी आलं. ती त्याचा हात सोडवून घरी निघून गेली.

सकाळी होताच तो तयार झाला आणि थेट पूजाच्या घरी गेला आणि बाबांना मदत करू लागला. त्यांना काही काम असेल तर तो करत होता. अगदी मंडप पासून ते गॅस सिलिंडर पर्यंत तो सगळं काही काम करू लागला. पण त्याच्या मनात खूप मोठी पोकळी निर्माण झाली होती.

पूजा बाल्कनीमधून अर्णवला पाहत होती. तिच्यासुद्धा मनात दुःखाचं सागरच निर्माण झाला होता. असेच दिवस जात होते. तिच्या लग्नाची तारीख जवळ येत होती. तशी तशी पूजाच्या मनात नको ते विचार येत होते. एकीकडे बाबांना दिलेलं वचन आणि दुसरीकडे तीच प्रेम... रवी आणि रचना सुद्धा आता बाबांना मदत करायला आले होते.

बघता बघता लग्न दोन दिवसावर येऊन थबकले. आता पूजाच्या मनात तर आत्महत्या सारखे विचार येत होते. असेच विचार करत ती तिच्या बेडवर रडत पडली होती.

खूप सारे आठवणी ती आठवत अशीच बेडवर पडली होती. तिच्या डोळ्यातून अश्रू मात्र तसेच चालू होते. असेच काही क्षण ती आठवणीमध्ये हरवून गेली. त्यानंतर तिचा डोळा लागला. उद्याचा दिवस तिला खूप अवघड जाणार होता. उद्या हळदीचा कार्यक्रम होणार होता. खूप सारे पाहुणे येणार होते.

सकाळची कोवळी ऊन पूजाच्या त्या पडलेल्या चेहऱ्यावर पडत होती. ऊन तिच्या चेहऱ्यावर पडताच ती उठली. थोडा वेळ ती बेडवर बसून राहिली. बाहेरून खूप काही आवाज ऐकू येत होते. पूजा उठून ती दरवाजा उघडून बघती तर काय???.. रचना, रवी, जसीका आणि अर्णव पूर्ण घराच्या सजावटीत व्यस्त होते.

रवी -" अरे अर्णव ते मोठे फुले दे ना???... "

रवी मोठ्या स्टूल वर उभा होता आणि एका खांबाची सजावट करत होता. त्याला मदत म्हणून अर्णव तिथे उभा होता. जसिका आणि रचना पाहुण्यांसाठीच्या वस्तूची लिस्ट करत बसले होते.

पूजा रूमच्या बाहेर येऊन आजूबाजूला पाहत होती. आता कुठं हे घर लग्नाचं वाटत होत. रचना तिला पाहताच तिच्या जवळ येत म्हणाली.

रचना -" अरे पूजा... उठलीस??"

एवढं बोलून रचनाने पूजाला मिठी मारली.

रचना -" अभिनंदन... "

रचना एवढं बोलताच पूजाच्या चेहऱ्यावर मात्र खोटं हास्य पसरले होतं. त्या स्मितच्या मागे खूप दुःख दडलेल होत.

रचनाच्या त्या आवाजाने सगळेजण तिच्याकडे पाहत होते. अर्णव, रवी आणि जसिका सुद्धा तिच्याजवळ आले. रवी आणि जसिका तिला शुभेच्छा देत होते. पण तीच लक्ष फक्त अर्णवकडे होत. तो काय म्हणेल याचा विचार कदाचित ती करत असावी. सगळ्यांचं अभिनंदन देऊन झालं. सगळ्यात शेवटी अर्णव पुढे आला. अर्णव आणि पूजा दोघेही एकमेकांच्या डोळ्यात हरवून गेले होते... अर्णवनी तिचा हात हातात घेऊन होता... त्याला कळत नव्हतं की काय म्हणावं.... तेवढ्यात रवीचा आवाज आला.

रवी -" अरे अर्णव आटप लवकर... "

तेंव्हा कुठे दोघांना जाग आली. दोघंही इकडे तिकडे बघू लागले.

अर्णव -" पूजा... "

पूजा नाव ऐकताच... "हं... " म्हणाली...

अर्णव -" लग्नाच्या खूप साऱ्या शुभेच्छा..... तू जिथे जाणार आहेस तिथे खुशीत रहा... आणि हा, विसरू नको आम्हाला... "

पूजा -" पण अजुन एक दिवस आहे ना??... "

अर्णव -" हो.. पण सर्वात आधी आम्हीच तुला वीश करावं असं आम्हाला वाटलं... उद्या वेळ मिळेल का नाही माहिती नाही... "

पूजा -" असं का म्हणत आहेस??.. "

अर्णव -" काही नाही गं... असंच... "

रवी अजुन एकदा आवाज देऊ लागला..

रवी -" झालं का विश करून तुझं अर्णव... "

अर्णव -" चल नंतर बोलतो... खूप काम आहेत... "

एवढं बोलून तो तिच्या हातातून त्याचा हात काढत जाऊ लागला. तिला मात्र त्याचा हात सोडवत नव्हतं... जणू ती म्हणत होती की,' जाऊ नकोस ना अर्णव प्लीज '.. ती त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत उभी होती.... तिच्या त्या सुजलेल्या डोळ्यातून परत एकदा अश्रू येत होते... ती डोळे पुसतच रूममध्ये गेली... तिची ही अवस्था रचना कडून लपवून राहिली नाही.... पूजा तिच्या रूममध्ये जाताच ती सुद्धा उठून तिच्या रूममध्ये जाऊ लागली...

रचना तिच्या रूममध्ये गेली. पाहती तर काय पूजा तिच्या रूममध्ये नव्हतीच... पण रचनाला मात्र कुठून तरी रडण्याचा आवाज येत होता... ती इकडे तिकडे पाहत होती तर आवाज तर बाथरूम मधून येत होता आणि त्यासोबत शॉवरचा सुद्धा आवाज येत होता... रचना दरवाजाला बडवत म्हणाली.

रचना - " पूजा.... पूजा... तू आत आहेस काय??... "

पूजाकडून कोणताच उत्तर आले नाही. रचनाची चिंता मात्र वाढू लागली. आज तीच हळदीचा कार्यक्रम होता आणि ही तर अजुन रडतच होती...

रचना -" पूजा... शांत हो बघू... "

पूजा -" कसं शांत राहू रचना... तूच सांग... इथे परीस्थीती हातातून बाहेर निघून जात आहे... आणि तू शांत हो म्हणत आहेस.... प्लीज रचना लिव्ह.. मला एकटं सोड... "

रचना -" कसं एकटं सोडू तुला पूजा... आज तुझ हळदीचा कार्यक्रम आहे... आणि तू तर इथे रडत बसली आहेस... तुझा निर्णय पक्का असेल तर का रडत आहेस???... "

पूजा -" अग मी हा निर्णय डोक्याने घेतलेला होता, मनानी नाही.... एकेरी प्रेम करून बसले मी रचना... "

रचना शेवटी वैतागून म्हणाली...

रचना -" कोण म्हणाले की एकेरी प्रेम आहे म्हणून. "

ती रडायच थांबली. पूजाला काहीच कळल नाही. ती आता शांत होऊ लागली. न राहवून ती बाहेर आली.

पूजा -" तुला काय म्हणायचं आहे???... "

रचना -" म्हणजे पूजा तो तुझ्यावर अगोदर पासूनच प्रेम करत होता.. तो तुला हॉस्पिटल पासून ते ऑफिस पर्यंत तुझ्या विषयीच विचार करत होता. फक्त मूर्ख कधी त्याने तुला सांगितलेच नाही... "

पूजा -" होता म्हणजे???... "

रचना -" आता त्याच्या लाईफ मध्ये प्रीती आली आहे. तो तिच्या घरीच असतो आता कित्येक दिवस... "

हे वाक्य ऐकताच परत तिचा बांध तुटला... ती स्वतः च्या डोक्याला मारू लागली.. रचना तिला थांबवत होती... तीने हात पकडून, तिचे डोके बडवणे थांबवले..

रचना -" काय करत आहेस???... "

पूजा -" माझं नशीबच फुटक आहे... पहिला बाबांना गमावले होते आता माझ्या हृदयाला गमावत आहे. "

रचना -" पूजा.. तो आता पुढे गेलेला आहे... तुला पण पुढे जावे लागेल... तुला हे लग्न करावंच लागणार आहे... तू खुशीत रहा... "

पूजा रडतच रचनाच्या गळ्यात पडली. ती खूप रडु लागली.. थोड्या वेळानी शांत झाल्यावर...

रचना -" चल पूजा तयार हो... आजचा महत्वाचा दिवस आहे तुझ्यासाठी... चल रेडी हो.. "

पूजा कसल्यातरी विचारांमध्ये हरवली होती. तसेच विचार करत करत ती स्वतः कधी तयार झाली तिलाच कळाल नाही. बाहेर सगळे आज रात्रीची तयारी करत होते. आज रात्रीचा हळदीचा कार्यक्रम त्यांच्याच बंगल्यात होणार होता. पूजा तयार होऊन तिच्या रूम बाहेर आली,तर काय सगळयांची नजर फक्त तिच्यावर होती... ती आज खूपच सुंदर दिसत होती. आजची रात्रतर मग खूपच सुंदर असंणार होती. त्या सगळयांच्या नजरांमध्ये अर्णवची सुद्धा नजर होती.

ती बाहेर येताच बाबा तिच्याकडे येत म्हणाले..

बाबा -" पूजा.. तयार झालीस बेटा... खूपच सुंदर दिसतच आहेस अगदी तुझ्या आईसारखी... "

बाबांच्या त्या ओल्या डोळयांनी तिचे ते रूप यापुर्वी पाहीले नव्हते. प्रेमाचा ओलावा डोळयातून पाझरत होता. तेवढ्यात करण तिथे आला...

करण -" तू खूपच सुंदर दिसत आहेस, ते वर्णन करण्यास माझ्याकडचे शब्द अपुरे आहेत.. "

एवढं बोलून त्याने तिला मिठीत घेतले. त्याला बघून अर्णवला जळल्या सारखं वाटत होत. पूजा करणच्या मिठीत असली तरी तिची नजर मात्र अर्णवला बघत होती. तिला स्पष्ट दिसत होत की अर्णव जळत आहे ते... तेवढ्यात तिच्या लक्षात आले की अर्णवची ही नजर शेवटची असणार आहे.

सगळे पूजाच्या रूप न्याहाळण्यात असताना तिकडून प्रीती आली...

प्रीती -" हॅलो. कसे आहात सगळे?... "

सगळयांची नजर पूजा वरून प्रीती कडे वळली. तिला पाहून असं वाटत होत की लग्न पूजाच नाही तर प्रीतीचं आहे.. ती तर अप्सरा सारखी दिसत होती. खासकरून रवी आणि अर्णवची नजर तिला बघत होती..

प्रीती -" अभिनंदन पूजा..... "

एवढं बोलून तीने पूजाला मिठी मारली.. पूजाला मात्र तिथे चांगलं वाटणार नव्हतं. कारण तिथे अर्णव आता प्रीतीला न्याहळत होता. तिच्या नजरेत सुद्धा आता जेलिसपणा दिसत होता.

प्रीती -"मी तुझ्यासाठी खूप खुश आहे.. "

पूजा -" थंक्स बॉस... "

प्रीती -" बॉस नाही.... फक्त प्रीती म्हण... बरं वाटेल मला... "

पूजा -" ह्म... "

करण -" पूजा... ही कोण??"

पूजा -" अरे... ही माझी बॉस आहे... आणि प्रीती हा करण ज्याच्याशी माझं लग्न होणार आहे..... "

'लग्न होणार आहे '.. हा वाक्य बोलताना ती अर्णव कडे पाहत होती...

करण -" ओह.... तू पण सुंदर दिसत आहेस प्रीती... "

एवढं बोलून करण प्रीतीचा हात घेऊन त्याने पप्पी दिली. सगळे जण त्याला पाहत होते. प्रीती तिचा हात मागे घेत म्हणाली.

प्रीती -" थेंक्स"

कदाचित ही वागणूक तिला सुद्धा आवडली नव्हती... एवढं बोलून ती सुद्धा तयारीत व्यस्त झाली. कारण अर्णवने प्रीतीला बोलावून घेतले होते.

बघता बघता संध्याकाळ कधी झालं हे कळालच नाही. सगळेजण हळदी साठी तयार झाले होते. पाहुणे लोक आणि पूजाच्या ऑफिस मधले सगळे काम करणारे आणि पूजाच्या बाबांच्या ऑफिसमधले सुद्धा आले होते.. पूजा तर अगदी परीपेक्षा सुंदर दिसत होती... करण सुद्धा तितकाच देखणा दिसत होता...

हळदीचा कार्यक्रम सुरू झाला.. काहीवेळा नंतर पूजाला हळद लावायला सुरुवात झाली... पहिल्यादा तिच्या बाबानी तिला हळद लावली. हळद लावताना मात्र त्यांचे डोळे मात्र ओले होते... होणार पण कसं नाही शेवटी ऐकूलती एक मुलगी होती... पूजाच्या डोळयात पण अश्रू येऊ लागले... सगळे करण आणि पूजाला हळद लावू लागले..

त्यानंतर सगळे ऑफिस मध्यले आले... रचना अगोदर आली ती पूजाला हळद लावत म्हणाली...

रचना -" अभिनंदन... "

पूजा मात्र फक्त हसत तिला धन्यवाद देत होती... शेवटी अर्णव पुढे आला.. तो पुढे येताच पूजाच हृदय मात्र वेगाने धडधडत होते. पूजा अर्णवच्या डोळयात हरवून गेली. अर्णव सुद्धा खूप ओझ्या हातांनी तिला हळद लावू लागला. जेंव्हा तो हळदीचा हात तिच्या गालावरून फिरवत होता तेंव्हा पूजाच्या डोळयातून न कळत पाणी आलेलं होत.. अर्णव न बोलताच मागे फिरला. त्याच्या डोळयातली तिच्या बद्दलच प्रेम त्याला दाखवून द्यायच नव्हतं.

हळदीचा कार्यक्रम संपला. काही लोक अजुन सुद्धा पूजा आणि करण ला अभिनंदन देत होते आणि काही लोक जेवून घेत होते. अर्णव त्याच दुःख विसरून जाण्यासाठी तो स्वतःला कामात व्यस्त करून घेत होता... तो काम करत असताना डोळे अजुन ओले होते... त्याची ही अवस्था प्रितीच्या नजरेतून सुटली नाही... प्रीती त्याच्याजवळ जाऊन म्हणाली..

प्रीती -" अर्णव... जेवलास???"

अर्णव -" नाही... मला अजुन काम आहे... "

प्रीती -" मला तुझ्याशी बोलायचं आहे... "

अर्णव -" तुला दिसत नाही काय??... मी बिझी आहे ते... "

प्रीतीने त्याचा हात धरला, ती ओढतच त्याला घेऊन जाऊ लागली... ती आणि अर्णव जात असताना पूजा त्यांना पाहत होती... तिकडे प्रीती बंगल्याच्या पुढच्या बगीचामध्ये घेऊन आली..

प्रीती -" तुझं काय चाललयं अर्णव??"

अर्णव -" काय नाही... "

प्रीती -" एकतर तू तुझ्या मनातलं काही सांगत नाहीस तिला... "

तिला मध्ये थांबवत अर्णव म्हणाला..

अर्णव -" तिला कुणाला???"

प्रीती -" पूजाला... "

अर्णव -" प्रीती... तीच उद्या लग्न आहे आणि तुला वाटतंय की मी तिला सांगून टाकावं... "

प्रीती -" होय... "

अर्णव -" नको... "

प्रीती -" मग किती दिवस असं तडपडत राहणार??"

अर्णव -" माहिती नाही... पण ती खुश आहे ना???"

प्रीती - " तुझ्या पुढे काही सांगावं म्हणजे डोकं फोडून घ्यावं लागतंय.. चल मी जाते... "

अर्णव -" तू चाललीस???"

प्रीती -" का... तू अजुन जेवला कि नाहीस... "

अर्णव - " नको... मला भूक नाहीये.. "

प्रीती -" काही नाही सांगायचं... तुला जर यायचं असेल तर चल पहिला जेवून घे मग चल... "

अर्णव -" नको... प्रीती... आपण जाऊयात.. "

प्रीती -" पूजाला सांगून जावूया मग आपण.. "

एवढं बोलून ती अर्णवला ओढतच सगळ्यांसमोरून घेऊन जावू लागली. पूजा खुर्चीवर, तर रचना आणि रवी तिथेच उभे होते..

प्रीती -" पूजा... मी निघते उद्या लवकर येईन. "

पूजा तिला बघून फक्त स्मित करत होती.. जेंव्हा अर्णव पुढे आला तेंव्हा पूजाची त्याच्या डोळयात सुद्धा बघण्याची हिम्मत होत नव्हती...

अर्णव -" पूजा... मी सुद्धा येतो. "

पूजा -" एवढ्या लवकर.. ?"

अर्णव -" हो... "

पूजा -" उद्या येशील ना... "

अर्णवने काही न बोलता फक्त होकारार्थी मान हलवली.. तो जसा जाऊ लागला तस तसं पूजाचे डोळे ओले होत होते.. पण ती रडणार नव्हती... कित्येक जण तिथे होते.. अर्णवला थांबवण्यासाठी तिची इच्छा तर खूप होती पण आवाज मात्र निघत नव्हता... इकडे मात्र आपल्या मनावर दगड ठेवत अर्णव सुद्धा जात होता... तिला आपले ओले डोळे दिसू नये म्हणून तिच्याकडे पाठ करून तो जात होता.

कार मध्ये बसून अर्णव आणि प्रीती निघाले.. कारच्या खिडकीतून बाहेर पाहत असलेल्या अर्णवच्या डोळयातून पाणी येत होत. थोड्यावेळाने प्रितीच्या घरी दोघेही पोहचले. घरी पोहचताच अर्णव प्रीतीला म्हणाला

अर्णव -" प्रीती... दारू आहे का???"

प्रीती -" तू घेणार???"

अर्णव -" हो... "

प्रीती एक बॉटल आणि दोन ग्लास घेऊन बाल्कनी मध्ये आली, अर्णवकडे एक ग्लास देऊन, तीने त्यात ड्रिंक्स दिले...

थोडा वेळ असेच शांतपणे गेला... एकदमच अर्णव रडु लागला...

प्रीती -" अर्णव... काय झालं??"

अर्णव -" प्रीती यार... खूप त्रास होतय गं... "

प्रीती त्याला मिठीत घेऊन शांत करू लागली...

प्रीती -" श... "

अर्णव -" ती उद्या कुणाची तर होणार... आणि मी काही नाही करू शकत.. "

प्रीती -" अर्णव सगळं काही ठीक होईल... "

अर्णव -" कसं ठीक होईल.. प्रीती... "

एवढं बोलून तो अचानक झोपी गेला... आज खूप थकून गेला होता. तो प्रितीच्या मांडीवर झोपी गेला... प्रीती त्याच्याकडे बघत म्हणाली...

प्रीती -" उद्या सगळं काही ठीक होईल... अर्णव... "

उद्या नेमके काय होणार हे फक्त नियतीलाच माहीती होत...

-------------------------------------

सकाळची वेळ होती. प्रीती बाल्कनी मधेच झोपी गेली होती. तिच्या तोंडावर सूर्याचा प्रकाश पडल्यावर तिला जाग आली. ती उठल्यावर तिला कळाले की अर्णव कधीचा गेला होता. ती सुद्धा तयार होऊन पूजाच्या घरी गेली. तिथे खूप सारी तयारी चालली होती. त्यांचा बंगला इतका मोठा होता की लग्न करण्यासाठी त्यांना कोणताही मंगल कार्यालयची गरज नव्हती. खूप सारे लोक आताच येत होते.. रवी, रचना, अर्णव तर लग्नाच्या तयारीत मग्न होते..

अर्णव तर स्टेजला सजवत होता.. खूप सुंदर स्टेज दिसत होता. स्टेज वर दोन खुर्ची ठेवलेल्या होत्या. खुर्ची कसली, एक प्रकारचं सिंहासनच होत.. अर्णव आणि रवी दोघेही स्टेज सजावट करत होते.. आता लोकांची गर्दीसुद्धा वाढत होती. अनेक मोठ मोठे व्यावसायिक लग्नासाठी आलेले होते.. प्रीती मात्र अर्णव आणि रवी करत असलेले तयारी पाहत होती, तिला पुजाशी भेटायचं होत. त्यासाठी पूजा कुठं आहे, ते शोधत होती. शेवटी विचारपूस केल्यावर तिला कळाल की पूजा तयार होण्यासाठी तिच्या रूम मध्ये आहे... प्रीती वेळ न घालवता पूजाच्या रूम मध्ये गेली. तिथे

पूजाचा मेकअप चालू होता, अनेक मुली पूजाला तयार करताकरता हास्याची कारंजी उडवत होत्या.....

प्रीतीला बघताच पूजा तिला स्मित केली आणि म्हणाली...

पूजा -" प्रीती... तू कधी आलीस??"

प्रीती - " आत्ताच आले... "

पूजा -" मग मी कशी दिसतेय???. "

प्रीती -" खूप सुंदर दिसत आहेस पूजा... तुला कोणाची नजर न लागो... "

एवढं म्हणत प्रीती तिला काजळाची एक टीका लावली.

प्रीती -" पूजा... तुझ्याशी मला काहीतरी बोलायचं आहे.. "

पूजा -" बोल की... "

प्रीती -" नाही म्हणजे... मला तुझ्याशी वैयक्तिक पणे बोलायचं आहे.. "

पूजाला कदाचित काय बोलणार आहे याची जाणीव होती. तरी ती सर्वांना बाहेर जाण्यासाठी सांगून प्रीतीला म्हणाली...

पूजा - " आता बोल.. काय बोलायचं आहे??"

प्रीती -" पूजा... तू खरंच खुश आहेस??"

पूजा सामान्यपणे बोलू लागली.

पूजा - " हो गं... का??"

प्रीती - " तुला खरच वाटतंय की तू खुश आहेस.... "

पूजाला आता कळून चुकलं की प्रीती काय म्हणत आहे ते.

पूजाच्या डोळ्यातून पाणी येऊ लागलं. प्रीती तिला शांत करत, तिला आपल्या कवेत घेत म्हणाली..

प्रीती - " मला माहिती आहे की तुझ मन अर्णवमध्ये गुंतले आहे... "

पूजा तिच्यापासून दूर जात म्हणाली..

पूजा - " तुला कसं माहिती?"

प्रीती - " तुझ्या डोळ्यात त्याच्याबद्दल असलेलं प्रेम दिसत वेडी... "

पूजा -" तुला माहिती असून तू अर्णव सोबत का असतीस??"

पूजा प्रीतीला थेटपणे विचारात होती... तेवढ्यात रचना तिथे आली...

प्रीती -" म्हणजे??"

पूजा -" म्हणजे तुझ्यात आणि अर्णव मध्ये काय चालू आहे??"

प्रीती पूजाच्या ती अवस्था पाहून हसत होती...

प्रीती - " काही नाही... तुला कोणी सांगितल.. "

पूजा रचनेकडे पाहत होती.. रचनाला कळतचं नव्हतं की काय चालू आहे. प्रीती रचनाकडे पाहत हसू लागली.

प्रीती -" पूजा पूजा.... अगं तुझा काहीतरी गैरसमज झाला आहे... "

पूजा -" असं कसं... रचना तर म्हणत होती की अर्णव तुझ्या घरी एक रात्री राहिला होता.. "

प्रीती -" एका रात्री कसं राहतात??"

पूजा -" म्हणजे तो एक रात्री तुझ्याकडे होता म्हणून... "

प्रीती - " अगं हो... तेंव्हा तो माझ्यासाठी आला होता.. म्हणजे मी जरा जास्त ड्रिंक केले होते. तेंव्हा मला तो घरी सोडण्यासाठी आला होता आणि तो तिथेच राहिला.. आमच्यात असं काहीही झालं नव्हतं.. "

तीचे हे ऐकुन रचना पुढे येऊन म्हणाली...

रचना -" मग तेंव्हा तो शॉपिंगला आल्यावर तेंव्हा का बोलवत होतीस??... "

प्रीती -" तेंव्हा तो फक्त मला आधार देण्यासाठी आला होता... त्याच्यापुढे काहीच नाही रचना... आणि हा जेंव्हा जेंव्हा तो मला भेटायचा तेंव्हा तेंव्हा तो तुझ्याबद्दल बोलत होता.. तू म्हणजे त्याचा जीव की प्राण आहे... मी पण किती वेडी आहे तेंव्हाच तुला सांगायला पाहिजे होत.. आता खूप वेळ निघून गेली आहे... "

तीच हे बोलणं ऐकून पूजाला हुंदके येऊ लागले. तेवढ्यात पुजाचे बाबा तिथे आले. त्यांना काय झालं ते कळलच नाही.. प्रीती त्यांना नंतर येते म्हणून सांगून तिथून निघून आली. ती मागे बघून सुद्धा पाहिली नाही... ती बाहेर येऊन अर्णवला शोधू लागली.. तिला या लोकांच्या गर्दीत तो सापडतच नव्हता.. तो कुठेच दिसत नव्हता... तीने जसिकाला विचारले...

जसिका -" काय माहिती नाही.. त्याच्या डोळयात काहीतरी पडलाय म्हणून सांगत होता... त्याच्या डोळयातून पाणी येत होतं.. तो जरा जाऊन येतो म्हणून सांगून गेला पण तो आला नाही अजुन... "

प्रीतीला कळालं की त्याला सहन झालं नाही म्हणून रडतच बाहेर गेलाय.. ती त्याला फोन लावत होती पण त्याचा फोन बंद दाखवत होता... तिला काळजी वाटतं होती म्हणून ती परत पूजाच्या रूममध्ये गेलीं.. तिथे तर पूजा अजुन रडत होती. तिचे बाबा तिला विचारत होते..

बाबा -" अगं आज तुझं लग्न आहे... काय झालं आहे ते तरी सांग... "

पूजा मात्र अजुन रडतच होती...

बाबा -" अगं... मुहर्तची वेळ येऊ लागली आहे... काय झालं ते तरी सांग... "

अचानक प्रीती म्हणाली..

प्रीती -" अंकल... तिला हे लग्न नकोय.. "

बाबांना धक्काच बसला...

बाबा -" नकोय म्हणजे.. "

प्रीती -" म्हणजे तिला दुसरा मुलगा आवडत आहे... "

बाबा -" कोण??"

प्रीती -" अर्णव... "

अर्णव चा नाव ऐकताच बाबा म्हणाले..

बाबा -" अगं तुझं लग्न ठरलं होत ना... मग हे असं का केलेस??"

रचना -" ते खूप अगोदर पासूनच चालू आहे काका... "

बाबा -" मग मला तेव्हाच का नाही सांगितले.. "

रचना -" कारण तेंव्हा तुम्ही तिच्याकडून वचन घेतले होते.. की तुमच्या आवडीच्या मुलाशी लग्न करणार म्हणून.. तुमच्या प्रेमापोटी तिने तिच्याच प्रेमाची त्याग दिला होता.. "

इकडे मुहर्ताची वेळ निघून जात होता... बाहेर करण आणि बाकीचे लोक वाट पाहत होते... शेवटी न राहवून करण पूजाच्या रूम मध्ये आला.. तिथे पोहचताच तो म्हणाला

करण -" काका. काय चाललंय इथं... तिथे सगळे वाट बघत आहेत... "

बाबा -" अरे करण आम्हाला हे लग्न नकोय... "

हे ऐकताच रूममधले सगळे जण शांत झाले. कुणाला काहीच कळाल नाही की काय झालं आहे ते...

करण -" नकोय म्हणजे??"

तेवढ्यात करणचे आईवडील सुद्धा तिथे आले होते..

बाबा -" माझ्या पोरीला हे लग्न नकोय... मग मला पण नको आहे.. "

करण -" का??"

बाबा -" ती दुसरा मुलावर प्रेम करत आहे... "

करण चे आईवडील त्यांना शिव्या घालू लागले... बाबा मात्र त्यांना शांत करू पाहत होते.. शेवटी करण म्हणाला

करण -" मम्मी पप्पा... शांत व्हा... जर पूजाला लग्न नको असेल तर मला पण नको आहे. आणि हा जे कोणता मुलगा आहे ज्याच्यावर तू प्रेम करत आहेस त्याला इथं बोलून घ्य.. "

बाबा आणि सगळ्यांना कळून चुकलं की करण तर खूप चांगला मुलगा आहे... खूप समजूतदार पण आहे. लोकांना आतापर्यंत सगळं काही समजलं होत. रवी सुद्धा पूजाच्या रूमच्या बाहेर येऊन थांबला होता...

बाबा पूजाला पाहत म्हणाले..

बाबा -" पूजा... अर्णव कुठं आहे त्याला बोलव, त्याच्याशीच तुझं लग्न होणार ते पण याच मंडपात... आणि याच लोकांसमोर होणार... "

ते ऐकताच पूजा बाबांशी बिलगली.. त्यांच्या मिठीत जाऊन रडु लागली... तेवढ्यात प्रीती म्हणाली..

प्रीती - " पण काका... अर्णव कुठंही दिसत नाहीये... "

पूजा -" दिसत नाही म्हणजे??"

प्रीती -" त्याला खूप शोधले पण तो कुठेच नाही सापडत आहे... त्याचा फोन सुद्धा स्विच ऑफ दाखवत आहे... "

बाबा -" पूजा... तो कुठेही असो त्याला शोधून आण.. "

पूजा अर्णवला फोन लावू लागली. अजुन स्विच ऑफ सांगत होता... तेवढ्यात पूजाला काहीतरी आठवलं. ती जसिकाला म्हणाली..

पूजा -" जसिका मला तुझी स्कूटी मिळेल का??"

जसिका -" हो घेऊन जा ना... "

पूजा त्या स्कुटीची चावी घेऊन तिथून पळतच सुटली... ती बाहेर जाताना पाहून रवी म्हणाला..

रवी -" अगं थांब पूजा मीही येतो... "

पूजा तेवढ्यात स्कूटी काढून गेली पण होती...

रचना -" अरे रवी, थांब मीही आले... "

रचना आणि प्रीती मागून पळतच रवीच्या मागे गेले... रवीने कार काढली. कारमध्ये रचना आणि प्रीती बसले. तो पूजाच्या मागे कार चालवत होता. पूजा मात्र खूप वेगाने जाऊ लागली.. अर्णव कुठे असेल ही तिला माहिती होत. ती खूप वेगाने चालवत होती.. ती एवढ्या वेगात चालवत होती की रविला ती दिसेनाशी झाली. ती खूप पुढे गेली होती...

रवीला कळतच नव्हतं की ती कुठे आहे ते... पूजा मात्र दुसरा रस्ता धरून जाऊ लागली. तेवढ्यात तिची स्कूटी खूप हलू लागली. तिला कळतच नव्हतं की काय होत आहे... ती स्कूटी थांबवली आणि बघितली तर कळाल की स्कुटी च्या मागचा चाकाची पूर्ण हवाच गेली होती... तिला कळत नव्हतं की आता काय करू...

ती विचार करू लागली... तीच मन तिला म्हणत होत की.. ' पूजा उठ... जा... नाहीतर अर्णव तुझ्या आयुष्यातून गेलाच म्हणून समझ... उठ आणि जा त्याच्याकडे... नाहीतर परत एकदा त्याला गमवावा लागेल.. उठ... उठ.. ' ती उठली आणि पळत सुटली... इतक्या जड साडीतून ती पळत सुटली. तिला इतरांची काही

एक पर्वा नव्हती. ती पळत सुटली तिच्या एकूलत्या एक प्रेमासाठी... तिला कुणाचीही पर्वा नव्हती... ती पळत सुटली तिच्या अर्णवसाठी ज्याने तिला सावरले होते, त्या ड्रग्स आणि दारूच्या व्यसनेतून... ती पळत सुटली तिच्या अर्णव साठी जो तिला तिची आई नसताना तिला आईसारखे सांभाळले होते.. तिला खूप दम लागत होता, पण ती मात्र थांबत नव्हती... ती थोड्या वेळासाठी गुढग्यावर हात ठेवून उभी राहिली.. पण तिचे अंर्तमन म्हणत होते ' पळ पूजा... शेवटचा पळ... तुझं प्रेम तुला मिळवण्यासाठी... पळ.. "

ती परत धावू लागली... शेवटी ती पोहचली.... चौपाटीवर... जिथे अर्णवने पूजाचं वाढदिवस साजरा केला होता... जिथे तो त्याच्या प्रेमाची कबुली देणार होता... तो तिथेच होता... समुद्राकडे तोंड करून बसला होता... एकटाच त्या समुद्राच्या दिशेने दगड फेकत बसला होता... तो रडतच होता... पूजा त्याच्याजवळ पळतच सुटली...

. तेवढ्यात रवीची कार सुद्धा तिथे आली... पूजा अर्णवच्या मागे येऊन थांबली... ती खूप थकली होती...

पूजा -" अर्णव.. "

अर्णव मागे वळला तर तिथे पूजा अगदी लग्नाच्या साडीमध्ये उभी होती... त्याला काहीच कळत नव्हतं... तो उभा राहिला... पूजा त्याच्याजवळ आली आणि त्याला गालावर प्रेमाने थोबाडीत मारल्या आणि रडु लागली...

अर्णव -" आऊच...... मी काय केलंय???.... आणि अगं तू इथे काय करत आहेस???... "

पूजा -" तुला आधीच सांगता येत नव्हतं... की तु देखील माझ्यावरच प्रेम करत आहेस ते... "

अर्णव - " मला वाटलं तुला कळेल. "

पूजा आणखीन एक थोबाडीत मारली... आणि त्याच्या मिठीत गेली...

पूजा -" मी तुझ्यावर प्रेम करत आहे. अर्णव... आय लव्ह यु.. "

अर्णव सुद्धा तिला मिठीत घेऊन म्हणाला...
अर्णव -" आय लव्ह यू टू.. "

थोडा वेळ ते एकमेकाच्या मिठीत होते. लांबून रवी, रचना आणि प्रीती पाहत होते... त्यांना खूप समाधान वाटत होते. पूजा अर्णवपासून दूर झाली आणि तिने तिच्या हातातून अंगठी काढली आणि ती गुडघ्यावर बसली...

पूजा -" माझ्याशी लग्न करशील.. अर्णव... "

रचना तेवढ्यात हळूच म्हणाली," किती गोड"

अर्णव -" हो... "

पूजा त्याच्या बोटात अंगठी घातली. आणि म्हणाली...

पूजा -" चल... लग्न करूया.. "

अर्णव -" एवढं लवकर... अगं घरी तर कळवू देत... "

पूजा -" काही गरज नाही... खूप छळलास मला... चल.. "

एवढं म्हणत तीने त्याचा हात हातात घेऊन... त्याला ओढतच रवीच्या कारमध्ये बसवले... रवी थेट गाडी पूजाच्या बंगल्यात घेऊन आला... पूजा अर्णवचा हात घेऊनच तिच्या बाबांजवळ घेऊन आली... बाबा त्यांना हसतच बघत होते...

बाबा -" बहुतेक उचलून घेऊन आले... अर्णव तू आधीच सांगितले असतास तर ही वेळ आली नसती... जाऊ देत... चल रेडी हो मंडप तुझी वाट बघत आहे... "

पूजा आणि अर्णव दोघेही तयार झाले... दोघेही आता स्टेजवर आले...

बाबा -" वाटतात ना एकदम राम आणि सीतेची जोडी... "

करण, रवी, रचना, प्रीती, जसिका आणि बाकीचे लोक सुद्धा खुश होते... त्यांना पूजाच्या वडिलांबद्दल आदर अजुन वाढलेला होता. ते स्वतः च्या मुलीसाठी एवढं केलेले होते.. अक्षता वाटण्यात आल्या... शेवटी त्या दोघांवर अक्षता पडत होत्या. दोघेही खूप खुश होते...

अक्षता टाकत असताना रवी प्रीतीला म्हणू लागला...

रवी -" Thanks a lot... प्रीती... तू नसतीस तर पूजाला तिच्या प्रेमाची जाणीव झाली नसती आणि हो तिच्या मनातले प्रेम सुद्धा निर्माण झालं नसतं... "

प्रीती -" धन्यवाद.. "

रचना -" म्हणजे??"

रचनाला काहीच कळत नव्हतं...

रवी -" रचना... तुला म्हणालो होतो ना की " किसी चीज को तुम चाहो तो पुरी कायनात उस्से तुम्हे मिलानी की साजिश मे लग जाती है... " ती साजीश मी केली होती... प्रीती दुसरी तिसरी कोणी नसुन ती आपल्या कंपनीच्या मालकाची एकलुती एक मुलगी आहे... आणि हो ती माझी शाळेतली मैत्रीण सुद्धा... तिला मी अर्णव बद्दल सर्व काही सांगितलं... तीने स्वतःची बदली आपल्या ब्रांच मध्ये करून घेतली... आणि अर्णवच्या सोबत राहून पूजाच्या मनात प्रेम निर्माण केलं... म्हणजे आधीपासून तिच्या मनात होतेच पण तिला जाणीवही करून दिली... कारण जेलीसी पेक्षा कोणतीही फिलिंग प्रेमाची जाणीव करून देत नाही... त्यामुळे धन्यवाद प्रीती..."

प्रीती - " बस कर पगले, अब रुलायेगा क्या??.. मित्रासाठी एवढं सुद्धा करू शकत नाही का आता???"

रचना -" तू मला का नाही सांगितलास रवी... "

रवी -" मी म्हणलो... सस्पेन्स ठेवावा आणि नंतर सांगावे... शेवटी अर्णवची लव्ह स्टोरी सक्सेस झाल्याशी मतलब होता ना... "

रचना -" खरंच रवी... मित्र असावा तर तुझ्यासारखा... माझं सुद्धा सेटिंग तूच करून द्यायचं.. "

सगळे हसू लागले... आणि स्टेज कडे पाहू लागले... पूजा आणि अर्णव एकमेकांकडे पाहत होते... जणू संपूर्ण जीवन सोबत जगण्याचं वचन देत असावेत..

********************************

समाप्त

ही कथा येथे संपत नाही. या कथेचा दुसरा भाग मिळवण्यासाठी संपर्क साधा. तसेच ही कथा कशी वाटली तेही कळवा.

या कथेचे चित्रपट हक्क मिळण्यासाठी संपर्क साधा..

ऋषिकेश मठपती

(Instagram – @rushi. 278)

फोन नंबर - 7972076796

ईमेल - mathapati278@gmail. com

चार बुकं वाचून शहाणपण येतंय होय?

हो! आम्ही म्हणतो येतं.

वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

www.esahity.com

esahity@gmail.com

whatsapp: 9987737237